
# माणूस

शनिवार
१२ जून १९७१
पन्नास पैसे

१९ जिल्ह्यातील
१२० तालुक्यांच्या ठिकाणी
हे ६० हजार ग्रामीण
श्रमिक का धडकले ?
—पुढील अंकी
दत्ता देशमुख यांची
'माणूस' प्रतिनिधीने घेतलेली
खास मुलाखत



| माणूस | शनिवार | १२ जून १९७१ | पन्नास पैसे |
| --- | --- | --- | --- |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशाची वर्गणी |
| अकरा | दोन | पंचवीस रुपये | पंचेचाळीस रुपये |

# माणूस

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**सहाय्यक**
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**सप्रेम नमस्कार....**

¤ २५–५–७१ च्या वृत्तपत्रात अनिल बर्वेंना अटक झाल्याचे वाचले. त्यांच्याकडे लोकशाहीविरोधी प्रचार पत्रके आणि नक्षलवादी साहित्य मिळाले. यापूर्वी कु. नवलकर व इतर दोघांना याच आरोपावरून शिक्षा झालेली आहे. प. बंगाल, बिहार, आंध्र नंतर येथेही नक्षलवादी दिसू लागले आहेत.

चारदोन नक्षलवाद्यांना शिक्षा करून वा अटकेत ठेवून ही प्रवृत्ती नाहीशी होईल काय ? नक्षलवादी आपले सर्वस्व गमावून वा आपण पकडले गेल्यास काय होईल याचा विचार करूनही असे का वागतात ? बहुतेक सर्व नक्षलवादी सुविद्य व तरुण आहेत. चांगल्या वा मध्यम स्थितीतील आहे. नक्षलवादी होण्यात त्यांचा वैयक्तिक फायदा काहीही होणार नाही याची त्यांना जाणीव असलेली दिसते. होणाऱ्या परिणामांची कल्पनाही त्यांना असते. ज्याविरुद्ध ते लढण्याची भाषा बोलतात त्यांच्याशी वैयक्तिक मतभेद नसतात. मग तरीही ते नक्षलवादी का होतात याचा गंभीर विचार करणे आवश्यक आहे.

केवळ देशाला बदनाम करण्यासाठी आपल्या आयुष्यातील चांगला काळ ते असा घालवतात ? सुखाने रोटी मिळत असतानासुद्धा अशा स्थितीत राहतात ? सरकारचा, समाजाचा रोष पत्करून घरेदारे सोडून बेईमान होतात ? जर देश बदनामच करायचा तर हे सर्व न करताही देश बदनाम करता येईल. समाजात प्रतिष्ठेने राहूनसुद्धा देशाचे वाटोळे करता येते हे समजण्याएवढे ते निश्चितच हुषार असतात.

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ‘ माणूस ’ साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

मग ते असं का वागतात ? अशा प्रवृत्ती का वाढत आहेत याचे निदान करून उपाय योजले तरच त्या प्रवृत्ती खलास होतील. नुसत्या लाक्षणिक उपायांनी (Symptomatic treatment) रोग बरा होत नसतो.

आजकाल सर्व तरुणांत वैफल्य आहे. त्यांच्यापुढे आदर्श नाहीत हे सर्व पक्षांचे नेते मान्य करतात. जनतेची त्यांच्यावर असलेली जबाबदारी त्यांनी पार पाडली नाही. चुकांची माफी मागून क्षमा होत नाही, चुकांची दुरुस्ती केल्यास ती होऊ शकते.

समाजातील महत्त्वाची बाब म्हणजे व्यक्ती. त्यांना अनेक ठिकाणी जगण्याइतकेही मिळत नाही. सर्वांना जरुरीइतके मिळाल्याखेरीज कोणालाही जरुरीपेक्षा जास्त मिळता कामा नये. आज अर्धपोटी, अर्धनग्न अवस्थेत दिवसभर कष्ट करून झोपड्यात राहणारे हाडांचे सापळे एकीकडे दिसतात. तर प्रासादातून तीनचार वेळा आहार घेऊन विश्रांती घेत पहुडणारे ' सुखंच मे शयनं च मे ' स्थितीत राहणारेही आढळतात. ही परिस्थिती पाहिल्यावर कोणत्या तरुणास वैफल्य, अगतिकता वाटणार नाही.

आज, मध्यावधी निवडणुकांनंतर आपल्या अपेक्षा उंचावल्या आहेत. आपला देश कधीतरी सुसंपन्न होईल अशी आशा वाटत आहे. याच वेळी सर्वांनी दक्ष राहिले पाहिजे. पक्ष कार्यकर्त्यांनी जागरुक राहिले पाहिजे. पण हे अजूनतरी दिसत नाही. पांढरी टोपी घालून ' गरिबी हटाव ' अशी घोषणा करीत फिरतानाच स्वत.च्या मुलाच्या लग्नासाठी लाखो रु. खर्च करण्यातच भूषण मानणारे आढळतात. त्यांना मंत्र्यांचे आशीर्वाद असतात. वृत्तपत्रातून प्रसिद्धी मिळते. 'पाणी थंड राहण्यासाठी विहिरीत बर्फ टाकण्यात आले होते. १ लाख २५ हजार माणसे जेवली. अमूक इतक्या भेटवस्तू मिळाल्या', अशी रसभरीत वर्णने केली जातात. गरिबी हटाव व समाजवाद याचा जप करणारांना हे शोभते काय ? पूजा करून वा भिसमिल्ला म्हणून हत्या केल्याने हिंसा कमी ठरते का ? असंतोषाची, अगतिकतेची कारणे हीच आहेत.

जेव्हा विनोबाजी म्हणतात की, ' मतपेटीवर माझा विश्वास नाही, मतदान करू नका,' त्यात आम्हाला गैर वाटत नाही. बाळ ठाकरे देशाला हुकूमशहाची गरज असल्याचे प्रतिपादन करतात यात लोकशाहीविरोधी काही नसते. डी. एम्. के राष्ट्रध्वज जाळतो वा आमचे पूर्व पाकिस्तानसारखेच होत आहे असे म्हणतो यात देशाच्या ऐक्याला धोका नसतो. मग नक्षलवादी क्रांती करा असे म्हणतात, त्यांना ठेचले पाहिजे असे का ?

म्हणजेच काय बोलले यापेक्षा कोण बोलले याकडे आम्ही लक्ष देतो.

मला नक्षलवाद्यांचे समर्थन मुळीच करायचे नाही. त्यांचे मार्ग अत्यंत चुकीचे आहेत हेही मी मान्य करतो. पण सरकार, समाज, वृत्तपत्रे–सर्वांचा विरोध असूनही त्यांच्याबद्दल कोणीही असे बोलल्याचे, लिहिल्याचे आठवत नाही, की, ' नक्षलवादी जमिनदाराला ठार करून त्याची जमीन स्वत:साठी ठेवतात. भांडवलदाराचा खून करून पैसा स्वत: खर्च करतात वा त्यांच्या कुटुंबियांवर अत्याचार करतात ' आणि म्हणूनच मला वाटते की, नक्षलवादी जिद्दी, त्यागी, प्रामाणिक पण वाट चुकलेले तरुण आहेत.

**३१ मे, १९७१** **मोरेश्वर दाते, सोलापूर**

# सोमनाथची स्वेदगंगा बरकीच्या जंगलात !

प्रा. चंद्रकांत शं. पाटगावकर

'जगी जे दीन पददलित,
जगी जे हीन, अति पतित,
तया जाऊन उठवावे,
जगाला प्रेम अर्पावे !'–

पूज्य सानेगुरुजींची ही भावमधुर प्रार्थना धीरगंभीर आवाजात गाईली जात आहे. पहाटे ५॥ चा सुमार आहे. या प्रार्थना गीताने श्रमसंस्कार शिबिरात सामील झालेल्या शाळा, कॉलेजातील विद्यार्थ्यांना जाग आणली जात आहे. तिकडे अरुणोदयाची प्रभा डोंगरांच्या कुशीत झोपलेल्या बरकी गावातल्या झोपड्यांना जाग आणीत आहे अन् कड्याकपारीतील घनदाट जंगलातून तऱ्हेतऱ्हेचे पक्षी आपल्या मंजूळ किलबिलाटाने रात्रभर सुस्तावलेल्या वनश्रीला साद घालीत आहेत !

६॥ वाजता सर्वजण शिबिर निवासस्थानापुढील मोकळ्या जागेत – इठलाई देवीच्या प्रांगणांत जमले आहेत. विनोबाजींनी तयार केलेली सर्व धर्मीय प्रार्थना सर्वजण एक सुरात, एक तालात तन्मयतेने म्हणत आहेत–

ओम तत् सत् श्री नारायण तू
पुरुषोत्तम गुरु तू
...रहीम ताओ तू...

६॥ ला नाश्ता चालू झाला आहे. युनिवर्सिटीच्या, सरकारच्या किंवा एन. सी. सी. च्या शिबिरात चमचमीत ब्रेकफास्ट खाणाऱ्या कॉलेज विद्यार्थ्यांना बरकी जंगलातल्या या आडवळणी गावातल्या शिबिरात साधासुधा नाश्ता दिला जात आहे. काल रात्री उरलेला भात फोडणी देऊन वाढला जात आहे. मुलेही घरच्याप्रमाणे समजुतदारपणाने व खेड्यातल्या परिस्थितीची जाणीव ठेवून हा नाश्ता आनंदाने मिटक्या मारीत खात आहेत !

७ ते १०। श्रमकार्याची वेळ आहे. शाळा-कॉलेजचे विद्यार्थी व खेडूत असे शिबिरार्थी एकूण पन्नास आहेत. त्यांचे दोन गट दोन वेगवेगळ्या प्रकल्पावर काम करीत आहेत. एक गट बरकी गावासाठी बांधायच्या एका खोलीच्या शाळेच्या इमारतीचा पाया खोदीत आहे. शाहूवाडी तालुका कोयना भूकंपाच्या परिसरात येत असल्याने या शाळेच्या इमारतीची लोखंडी पिलरची खास रचनाच जिल्हा-

परिषदेने मंजूर केली आहे व त्यानुसारच विद्यार्थी पाया खोदीत आहेत. बरकी गावचा एकूण उंबराच पाऊणशे. वस्ती चार-साडेचारशेच्या आसपास त्यामुळे व्हरांड्यासह एका खोलीचीच शाळेची इमारत बांधायचे ठरले आहे. इठलाईचे देऊळ लांब असल्याने सध्या शाळेतली पोरे पाटलाच्या खोपटीतल्या अंगणातच बसताहेत.

दुसरा विद्यार्थी गट बरकी ते मोसुम कुंभ्याची वाडी या जोडरस्त्याचे कामावर खपत आहे. गटारासाठी खाच खोदून मुरुम रस्त्यावर टाकला जात आहे. हा कच्चा रस्ता डोंगराळ चढउतारांतून करीत पुरा झाल्यावर जिल्हा परिषद खडी टाकून रोलर फिरवून तो पक्का करणार आहे. हा रस्ता ही गावच्या विकासाची निकडीची गरज आहे. रोहिणी नक्षत्रापासूनच पावसाला तोंड लागले आहे. आता पावसाळ्यात कासारी नदी भरून वाहू लागली की गाव वेढले जाणार आणि जगापासून चार महिने बेटासारखे वेगळे पडणार! रॉकेल नाही, मीठ नाही, धान्य नाही ही नेहमीची कुचंबणा बरकी ग्रामस्थांना सहन करावी लागणार! पूर्वी संस्थानी कारकीर्दीत शाहू महाराजांनी येथून जवळ असलेल्या सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरील अणुस्कुरा येथे महारोग्यांची वसाहत उभी करायचे ठरवले होते. कासारी नदीवर धरण होणार होते. मग हे सर्व जोडरस्ते व हमरस्ते आपोआप झाले असते. पण तिकडे भोगावती नदीवर राधानगरीला धरण झाले आणि हा शाहूवाडी तालुका विकासाच्या दृष्टीने उपेक्षित राहून मागे पडला!—

७ ते ९ श्रमकार्य झाल्यानंतर मध्ये थोडा वेळ विश्रांती सर्वजण घेत आहेत. झाडांच्या सावलीत बसून सामूहिक श्रमगीते गात आहेत. विश्रांती घेऊन पुन: जोमाने कामाला लागत आहेत. अहमहमिकेने गाणी म्हटली जात आहेत. गाता-गाता श्रम करीत आहेत. श्रम करता करता गात आहेत!—

**एक तास, एक तास;**
**द्या देशाला एक तास!**
**करा करा श्रम एक तास!**

१०। पर्यंत काम केले तरी बाबा आमटेंच्या सोमनाथ श्रमसंस्कार शिबिराप्रमाणे उन्हाचा त्रास होत नाही. चांदा जिल्ह्यांत सोमनाथ जंगलातही उन्हाळा भयंकर. तसा कोल्हापूर जिल्ह्यातल्या बरकीच्या जंगलात भासत नाही. लागोपाठ दोन तीन वर्षे सोमनाथला जाऊन आल्यानंतर बाबा आमटेच म्हणाले होते, 'आता सोमनाथ छावणी म्हणजे काशी प्रयागसारखी तीर्थयात्रा बनवू नका! आपापल्या जिल्ह्यात अशी श्रमसंस्कार शिबिर आयोजित करा! सोमनाथच्या जंगलातला संदेश ठिकठिकाणी नेऊन पोचवा!' त्यानुसारच सोमनाथच्या जंगलातली स्वेद गंगा बरकीच्या जंगलात प्रकट होऊन राहिली आहे!

डोंगर चढणीवर एका बाजूला खूप उंचवटा आहे, दुसऱ्या बाजूला उतार आहे.

गटार खोदून मुरुमाचा भराव टाकून उतार उंचावण्याचे प्रयत्न चालू आहेत. खूप मुरुम टाकूनही रस्ता समपातळीत येत नाही. थकलेल्या विद्यार्थ्यांचा आपसात संवाद चालू आहे. एक जण म्हणतो आहे, 'XXX ! कितीही भराव टाकला तरी लेव्हल काही येत नाही !'

'अरे ही उंचवटयाची बाजू अशीच उंच ठेवून भराव टाकीत गेलो तर लेव्हल यायला खूप काळ लागेल खूप कष्टही पडतील. त्यापेक्षा उंचवटयाची उंची छाटून कमी केली तर ? लेव्हल लवकर येईल. आपण सराना विचारू या !'

आणि मग सर सांगताहेत, 'हा उंचवटयाचा भाग छाटलाच पाहिजे व छाटलेल्या भागाचा मात्र उताराकडील बाजूकडे टाकला पाहिजे. म्हणजे रस्त्याची सम-पातळी लवकर येईल. समाजातसुद्धा श्रीमंताकडील सर्व संपत्ती त्यांचेकडेच ठेवून गरिबांना त्यांच्या पातळीला आणू म्हटले तर त्याला अनंत काळ वाट पाहावी लागेल ! जमीन धारणा, शहरी संपत्ती यांच्या कमाल मर्यादा ठरवून त्यांचेकडील जादा संपत्ती ' नाही रे ' वर्गाला दिली तरच ' गरिबी हटाओ ! ' 'समाजवाद ' 'सर्वोदय ' ही सारी स्वप्ने प्रत्यक्षांत येणार आहेत !'

विद्यार्थ्यांचे श्रम चालू आहेत. श्रम करता करता संस्कार होत आहेत !

आता १०॥ वाजले आहेत. सर्वजण कासारी नदीतल्या छातीएवढया पाण्यात मनसोक्त डुंबत आहेत. श्रमाचे सारे श्रम दूर होत आहेत. पण नदीहून परतताना खूप अंतरामुळे विद्यार्थ्यांची भूक वाढली आहे. वाटेत डोंगरावरल्या जाळीतली करवंदं मनसोक्त ओरबाडून ते खात आहेत. गावात ओढयाला पाणी नसल्याने एवढया दूरवर नदीला आंघोळीला येण्याशिवाय गत्यंतरच नाही. ओढयात खड्डे खणून तासन् तास बादली बादलीने पाणी भरून शिबिरासाठी पिण्याच्या पाण्याची कशीबशी सोय केली जात आहे. स्वराज्यात वीस वर्षानंतरही अशी खेडी आहेत की ज्यांची प्यायच्या पाण्याचीसुद्धा सोय अजून झालेली नाही !

दुपारी १ चा सुमार आहे. जेवणे आटोपलेली आहेत. १ ते ३ विश्रांती आहे. पण तरुण म्हटला की विश्रांती कुठली ? बहुतेकजण दूर डोंगर कपारीतल्या घनदाट जंगलात घुसले आहेत. 'डोंगरची मैना ' त्यांना साद घालीत आहे ! काळीभोर करवंद अन् टपोरीं जांभळे फस्त करीत.

जंगलात मुक्त भ्रमण चालू आहे. या भागात गौरेडे, वाघ सांबरे, हरणे खूप आहेत. तरीही कुणी गिर्यारोहण करीत आहेत. पिकलेले, पाडाला आलेले आंबे फस्त करीत आहेत. बाहेरच्या साऱ्या जगाचा त्यांना जणू विसर पडला आहे. शहरी जीवनात दुर्मिळ असलेले हे मुक्त, स्वच्छंदी, निरागस, आनंदमय जीवन-सुख ते मन-सोक्त लुटत आहेत. अन् एवढयात इठलाईच्या देवळातली घंटा घणाणू लागत आहे ! तीन वाजले आहेत. दुपारच्या बौद्धिकासाठी व्याख्यानासाठी परत येण्याची ती सूचना घंटा आहे.

३ ते ४ एक व्याख्यान, ४ ते ४।। पेयपान अन् ४।। ते ५।। दुसरे व्याख्यान असा कार्यक्रम आहे. आज कोल्हापूरहून कुणी व्याख्याते आले नाहीत. म्हणून शिबिर प्रमुख ' मार्क्स ते विनोबा ' ही क्रांतीची वाटचाल शिबिरार्थींना समजावून सांगत आहेत. इठलाईच्या देवळाचे पिछाडीस उंचचउंच व गर्द झाडांच्या वनराईत शांति निकेतनच्या रम्य परिसराची शोभा आली आहे. निसर्गाच्या सान्निध्यात आधुनिक विचार-प्रवाहाची ओळख विद्यार्थी करून घेत आहेत.

५।। ते ६।। बरकीची ग्रामीण तरुण मंडळी व शिबिरार्थी विद्यार्थी एकत्र खेळत आहेत. कुणी गावात गेले आहेत. झोपड्या झोपड्यांतून जाऊन विचारपूस करीत आहेत. बरकी गावच्या लोकांनी ग्रामदान केले म्हणजे काय केले ते काही उत्सुक तरुण समजावून घेत आहेत. सरकारचा कायदा होण्याची वाट न पाहता किंवा नक्षलवाद्यांच्या बंदुकांचा आधार न घेता बरकी ग्रामस्थांनी आपल्या गावातील भूमिहीनांना कशी जमीन वाटून दिली हे समजावून घेत आहेत. असलेली भाकरी वाटून घ्यायला गरीबच कसे प्रथम पुढे येतात याचे दर्शन शहरी तरुणांना होत आहे. मुंबई-दिल्लीचे कायदे होण्याची किंवा चाओ-माओच्या दहशतवादाची वाट न पाहता विनोबाजींच्या मार्गाने बरकी गावच्या ग्रामस्थांनी जो रोख समाजवाद व रोख सर्वोदय आणला त्या लोक पुरुषार्थाचे जवळून दर्शन शिबिरार्थी तरुण घेत आहेत !

रात्रीची जेवणे आटोपली आहेत. गटागटाने भोजन वाटप, सफाई, दिवाबत्ती इ. कामे विद्यार्थी पार पाडीत आहेत. आज ज्या गटाकडे भोजन वाटप आहे, त्याने वेळेवर सारी कामे आटोपली आहेत. त्यामुळे रात्रीचा चर्चेचा कार्यक्रम बरोबर आठ वाजता सुरू झाला आहे. ही चर्चा विद्यार्थीच चालवीत आहेत. अध्यक्ष विद्यार्थीच आहे. विषय विद्यार्थ्यांनीच निवडलेला आहे. ' आजची शिक्षणपद्धती कुचकामी आहे ! ' हा विषय आहे. सर्वजण शिक्षणपद्धतीवर तुटून पडत आहेत. शिक्षण संपादन केल्यानंतर येणाऱ्या बेकारीवर सर्वांचा अधिक जोर आहे.

आता ९ वाजले आहेत. ९ ते १० करमणुकीचा कार्यक्रम आहे. काल विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या सिनेमानटांच्या नकला, गाणी-नाट्यप्रवेश करून दाखवले होते. आज बरकी ग्रामस्थ मंडळी आपली कला दाखवीत आहेत. जुनी भारुडं, वग म्हटले जात आहेत. तुणतुणे, टाळ, ढोलकी ही वाद्ये आहेत. मृदुंगही आहे. काही लावण्या शृंगारिक आहेत तर बहुतेक गीतावर धार्मिक प्रभाव आहे. आधुनिक राष्ट्रीय किंवा सामाजिक जागरणाचा त्याला स्पर्शसुद्धा दिसत नाही.

रात्रीचे १० वाजले आहेत. झोपण्यापूर्वीची प्रार्थना सर्वजण एकसुरात गात आहेत.

**सर्वांशी सुख लाभावे तशी आरोग्य संपदा**
**कल्याण व्हावे सर्वांचे कोणी दुःखी असू नये !**

□ □ □

## भारत-पाक-सिलोन संघराज्य

डॉ. अर्नाल्ड टॉयेन्बी हे प्रख्यात ब्रिटिश राजनितीज्ञ आहेत ! इतिहासकार आहेत !! त्यांच्या विचारांना, राजनैतिक भाकितांना म्हणूनच नैतिक वजन आहे. " आसाही शिमबुन " ह्या जपानी वृत्तपत्राला टोकियोला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी अनेक चालू घडामोडीवर भाष्य केलं, ते म्हणूनच विचारात घेण्यासारखे आहे. त्यांच्या भाष्याचा सार —

" ...ब्रिटिश राज्य गेल्यानंतर भारतीय उपखंडात भाषिक चळवळींना ऊत आला. ' बाँगला देश ' हा त्यातलाच एक भयानक प्रकार आहे. तत्पूर्वी भारतीय राज्य-संघातही अनेक भाषिक चळवळीच झाल्या. भाषावर प्रांतरचनेनं भारतीय नकाशाचं मूळ स्वरूप बदलून टाकलं. द्राविडी प्रांतातनं हिंदी विरोधाचा आगडोंब उसळला... पूर्व बंगालमध्ये बंगाली भाषा व लिपीवरून उद्रेक माजले, प. पाकिस्तानात सिंधी, पठाण, बलुचि जमातींनी पंजाबी आणि उर्दू वर्चस्वाविरुद्ध आवाज उठवले...... सिलोनमधल्या उठावांच्या मुळाशीही प्राय: बहुसंख्य सिंहलीविरुद्ध अल्पसंख्य तामिळी असाच संघर्ष आहे म्हणूनच भारतीय उपखंडात शांतता नांदायला हवी असेल तर, अनेक भाषिक राज्ये असलेलं ( धार्मिक नव्हे ! ) भारत-पाक-सिलोन ह्याचं एकच एक असं संघराज्य हाच माझ्या मते एकमेव उपाय आहे .."

इतर आशियाई देशाकडे वळून ते म्हणतात, "... जपान व चीन हे अधिकाधिक जवळ येतील तर, जपान-अमेरिका संबंध दुरावतील...चीनचं नशीब सर्वांत बल-वत्तर आहे असं मी म्हणेन. चीन लौकरच, मॉन्च्युरियन कालांतल्या वैभवाप्रत पोचेल तर, रशिया, अमेरिका, युरोप आदि राष्ट्रे मागे पडून, युरोपीय उत्थापनापूर्वीच्या अवस्थेत जाऊन पडतील .."

## ईजिप्त : रशियाचा नवा पवित्रा !

अरब प्रजासत्ताकाच्या अध्यक्षांनी गेल्या पंधरवड्यात बरेच नवीन राजकीय पवित्रे घेतले. अंतर्गत डागडुजी हा त्यांचा मुख्य उद्देश होता. त्यातच त्याचं स्वत:चे सामर्थ्य वाढवायचा त्यांचा प्रयत्न होता. उपाध्यक्ष आले. साब्री ह्यांच्या पदच्युतीनं त्यांनी ह्या प्रक्रियेला प्रारंभ केला आणि नंतर, अरब सोशॅलिस्ट युनियन ह्या ईजिप्त-मधल्या एकमेक राजकीय पक्षाच्या शुद्धिकरणाला त्यांनी प्रारंभ केला. शासकीय डोलाऱ्याचीही डागडुजी करून, एकेकांचं उच्चाटन करायला त्यांनी प्रारंभ केला.

पृष्ठ ६३ वर

सौ. तारा पंडित

# हे कलकत्ता

## पासपोर्टची गरजच काय ?

पाकिस्तान निर्माण झालं नि जीनांची समस्या सुटली. त्यांना हवं होतं ते मिळाले. त्या वेळी ते म्हणाले होते– 'एकाच देशात दोन राष्ट्रे कशी असू शकतात ?'... परंतु एकाच राष्ट्रात दोन देश तरी कसे असू शकतात' असं मात्र त्यांना कधीच कोणी विचारलं नाही. शेवटी भारत पाकिस्तान वेगळे झाले. आजपर्यंतच्या २३ वर्षांच्या काळात अनेक उलाढाली झाल्या. भारताचे अनेक प्रश्न सोडवायचे राहिले तसेच पाकिस्तानाचे देखील राहिले. पाकिस्तानची दोन्ही अंगे विभक्तच राहिली. त्यांचे एकीकरण झालेच नाही. १९४७ साली भारताचे दोन भाग झाले नि आज ते तीन झालेले दिसताहेत. आणि हे असंच चालत राहिलं तर पाकिस्तान कदाचित् आणखी कांही नव्या राष्ट्रांचा जन्म होण्यास कारणीभूत ठरू शकेल. १९४७ मध्येच आपल्या थकल्या भागलेल्या वयोवृद्ध नेत्यांनी राज्याची सूत्रे कर्तबगार तरुणांच्या हाती सोपवली असती तर आजचे चित्र पार बदलले असते. कदाचित् भारत हा अविभक्तच राहिला असता...

हे विचार आहेत एका बंगाली तरुणांचे नि त्याच्या आप्तेष्टांचे व मित्रांचे ! विचारांच्या तंद्रीत ही माणसे स्वप्नांच्या सप्तरंगात पार बुडून जातात. त्यांना वाटते, असे झाले असते–म्हणजे भारत हा एक राहिला असता तर–काय काय झाले असते बरे ?

–तर सकाळच्या गाडीने कलकत्त्याहून निघून दुपारपर्यंत आम्ही आपल्या खेड्यातल्या घरी पोचलो असतो. मग पद्मा नदीतून आणलेले ताजे मासे जेवणात यथेच्छ खाल्ले असते. आंब्यांच्या दिवसात कच्च्या कैऱ्या तिखटमीठाबरोबर खाल्ल्या असत्या. पावसाळ्याच्या दिवसात केळीच्या बुंध्याची तात्पुरती बोट बनवून सहल केली असती नि त्याच वेळी एका लहानशा गळाने मासेसुद्धा पकडले असते. पूजेच्या सुटीत कलकत्त्याच्या बाहेर राहून मजा करू शकलो असतो...

हे त्याचं स्वप्न लक्षावधी लोकांचंही स्वप्न आहे, जे पाकिस्तान निर्माण झाल्यानंतर जन्मलेले आहेत, असा त्याचा पक्का विश्वास आहे. आणि हा खरा असल्याचं एका अनुभवावरून सिद्ध झालं आहे. मुंबईच्या वास्तव्यात एक पंधरा वर्षांची बंगाली मुलगी ह्या तरुणाला भेटली. तिने बांगला देश कधीच पाहिलेला नव्हता. पण सिआल्दा स्टेशनला गाडी पकडून आपल्या खेड्यात कसं पोचायचं हे मात्र तिने

अचूक वर्णन करून सांगितलं. 'काय मजा येते तिथे !' हा तिचा उद्गार !

'पण ते गाव आता पाकिस्तानात आहे ना ?'

'हो. आहे खरं.' –ती उत्तरली.

'तू तर तिथे कधीच गेली नाहीस, खरं ना ?'

'छे ! कधीच नाही. पण मला तिथे जायला खूप आवडेल.' –ती म्हणाली.

'तू जर तिथे गेलीच नाहीस तर मग त्या लहानशा गावाचं एवढं वर्णन तुला सांगितलं कोणी ?' –ह्या तरुणाने विचारलं.

'माझ्या बाबांनी !' केवढ्या तरी अभिमानाने तिने उत्तर दिलं !

–अनेक आईवडिलांनी अशाच रेंगाळणाऱ्या मधुर आठवणी आपल्या मुलाबाळांना सांगितल्या आहेत. आता त्या आठवणीच फक्त शिल्लक आहेत. कारण तो प्रदेश त्यांना कधीचाच दुरावलेला आहे. ठिकठिकाणी हाच अनुभव येईल यात शंका नाही.

हा तरुण पुढे म्हणतो–

इथे राहणाऱ्या आम्हा लोकांना जसं वाटतं की एकदा तरी बांगला देश बघायला जाऊन यावं तसंच बांगला देशच्या अनेक लोकांना एकदा तरी कलकत्त्याला जाऊन यावं असं वाटतच असलं पाहिजे. वादळाच्या जोरदार प्रहाराने बेजार झालेल्या अनेक लोकांपैकी तीन कोळी लोकांना भारतीयांच्या बोटीने वाचवले व त्यांना कलकत्त्यात आणले तेव्हा त्यांना केवढा तरी आनंद झाला होता. साऱ्या कलकत्त्यात ते मनसोक्त भटकले होते. प्राणीसंग्रहालयापासून तो सारे काही त्यांनी पाहून घेतले होते...

पुढे तो म्हणतो–

कदाचित् एखादे वेळी असाही दिवस उजाडेल की जेव्हा आम्ही अगदी राजरोसपणे बांगला देशात जाऊ शकू नि बांगला देशचे लोकही कलकत्त्याला येऊ शकतील... आणि मग पासपोर्टची गरजच उरणार नाही !

## बासरीवाला

बासरीच्या आवाजाने त्याचं मन आकर्षून घेतलं. त्याने खिडकीतून डोकावून पाहिलं. बासरी विकणारा एक माणूस खांद्यावर अडकवलेल्या पिशवीत बासऱ्याचा गठ्ठा घेऊन उभा होता नि एक बासरी तो स्वतः वाजवीत होता. घराच्या पायरीवर उभा राहून छोटा सतीश लक्ष देऊन ते वाजवणे पाहात होता–ऐकत होता. बापाकडे दृष्टी जाताच सतीशने बासरी हवी म्हणून मागणी केली आणि बासरी घरात आली.

पण नुसती बासरी विकत घेऊन भागलं नाही. कारण सतीशला ती काही वाजवता येईना. तो हिरमुसला. आईकडे गेला नि वाजवून दाखव म्हणून हट्ट करू लागला. आई कसली बासरी वाजवणार ? तिने त्याला बाबांकडे जा म्हणून

पिटाळलं. आता बाबांची परीक्षा सुरू झाली. त्यांनी वेडेवाकडे सूर काढले, पण बासरीवाल्यासारखं गाणं काही जमेना. सतीशला तर ते हवं होतं. ही बासरी चांगली नाही, उद्या आपण दुसरी घेऊ म्हणून बाबांनी त्याची कशीतरी समजूत घातली. दुसऱ्या दिवशी बासरीवाला त्याच बाजूने जात असताना सतीशने त्याला बोलावलं आणि बाबांना वर्दी दिली. सतीशच्या बाबांनी म्हटलं, 'कसली बासरी दिलीस, ही नीट वाजतदेखील नाही.' पण काय आश्चर्य! बासरीवाल्याने तीच बासरी छान वाजवून दाखवली. तेच ते ठराविक गाणं नि तेच सूर. मग म्हणाला, वाद्य वाजवायला प्रथम थोडं शिकावं लागतं. मग सतत प्रॅक्टिस करावी लागते. मोठ्या मुष्किलीने तो एक गाणं वाजवायला शिकला होता आणि तेवढ्या भांडवलावर त्याने बासरी विकण्याचा धंदा सुरू केला. 'मी रोज तेच ते गाणं वाजवतो हे लक्षात नाही आलं तुमच्या?' – त्याने विचारलं. 'तेच ते गाणं?...म्हणजे तुला इतर गाणी वाजवता येत नाहीत?' सतीशचे बाबा आश्चर्याने म्हणाले. पण त्याचा चेहरा एखाद्या राजकारणी माणसासारखा निर्विकार दिसला म्हणून आणखी काहीही न विचारता ते घरात निघून आले.

## तालबद्ध घोषणा

भगवी वस्त्रं परिधान केलेले सन्यासी रस्त्याने हिंडतात तेव्हा त्यांच्यावरोबर काही ढोल वाजवणारेही असतात. 'बाबा तारकनाथेर चरने सेवा लागे' (भगवान् शंकराच्या नावाने दान करा) असे तोंडाने ओरडत ते चालत असतात. त्यांचे हे शब्द अगदी तालासुरात ऐकू येतात. ढोलकाची साथ असतेच. दारोदार अशी भिक्षा मागत ते हिंडत असतात, ते चैत्रातल्या अमावास्येपर्यंत. असेच एका घरापाशी ते सन्यासी थांबले. घरातल्या तरुण माणसाने गमतीने म्हटले–'यावर्षी तारकनाथ वगैरे काही नाही. त्याऐवजी 'जय बांगला' म्हणा.' हे ऐकून ते सन्याशी लोक गोंधळले. मग एकजण म्हणाला–'पण जय बांगला तर सरहद्दीपलीकडे आहे ना?' यावर तरुण उत्तरला–'अहो, तारकनाथ जसा सगळीकडे भरून राहिला आहे, तसाच बांगला देखील. पलीकडे काय अन् अलीकडे काय. उलट तुमच्या बाबा तारकनाथापेक्षा ह्याचंच महत्त्व आज अधिक आहे. तेव्हा–'

नेतृत्त्व करणारा सन्यासी मोठा हुषार होता. तो ओरडून म्हणाला–

'जय बांगलार चरने सेवा लागे ऽऽऽ...'

## खासा न्याय!

एकदा एका ट्राममध्ये एक म्हातारं जोडपं चढलं. त्यांचे बरोबरच ोन तरुणही चढले. ह्या सर्वांजवळ सेकंड क्लासची तिकीटं होती आणि ते बसले होते फर्स्ट क्लासमध्ये.

पान चवळत गप्पा करीत असलेल्या त्या दोघा तरुणांपर्यंत कंडक्टर येऊन पोचला व त्यांची तिकीटे पाहून दहा पैसे आणखी द्या असं म्हणूं लागला. त्या तरुणांनी पंधरा मिनिटे कंडक्टरबरोबर हुज्जत घातली. शेवटी नाईलाजास्तव पैसे काढून दिले. तरीपण त्यांची बडबड मुळीच थांबली नाही. कंडक्टर दुसऱ्या माणसाकडे वळला. त्याच वेळी त्या म्हाताऱ्या जोडप्याकडे मात्र त्याने जाणूनबुजून दुर्लक्ष केलं. त्यातला माणूस केव्हाचाच स्वतःचं नि बायकोचं अशी दोन्ही सेकंड क्लासची तिकीटं हातात धरून बसला होता. ट्राम कंडक्टरचा हा न्याय वधा. त्याने तरुणांना जबरदस्तीने जास्त पैसे द्यायला लावले. म्हाताऱ्यांना मात्र अवाक्षरही बोलला नाही.

## डासांची बदमाष जात


कलकत्याचे डास प्रसिद्ध आहेत. त्यांची एक विशिष्ट जात आहे. ती खास कलकत्याच्या लोकांच्या चांगलीच परिचयाची आहे. जगातील सात आश्चर्यांप्रमाणे सात भयानक गोष्टी प्रसिद्ध असत्या तर कलकत्यातील डासांचे नाव अग्रभागी झळकले असते.

अहो, हे डास इतके बदमाष आहेत की श्वासागणिक ते आत जातात. उच्छ्वासाबरोबर कधी मेलेले बाहेर निघतात. कधी त्यांना बाहेर काढावे लागते, कृत्रिम शिंका आणून !

तुम्ही दीर्घश्वसनाचा व्यायाम घेऊ लागलात की डासांची पलटण आत घुसते आणि ट्रकचं टायर फुटावं इतक्या जोराने त्यांना बाहेर काढावं लागतं. इतकंच नव्हे, पाच सहा डास तोंडात गेल्याखेरीज बोलणं, गाणं म्हणणं आणि खाणं ह्या गोष्टीसुद्धा अशक्य होऊन बसल्या आहेत. एकदा गृहस्थ म्हणाले–अहो, मिठाची एक बाटली सतत जवळ बाळगत चला. डासांनी तोंडात प्रवेश केला की एक चिमटभर मीठ खात जा. मग छान चव लागते बघा त्यांची–आपले खारे काजू असतात ना, तसे हे खारे डांस ! salted masquitoes हा प्रयोग अजून तरी करून पाहिला नाही.

अहो, मच्छरदाणीचा देखील काही उपयोग होत नाही. मच्छरदाणीत घुसण्याची कला त्या बदमाषांना चांगली अवगत आहे. शिवाय अतिशय गर्मी असते तेव्हा मच्छरदाणीमुळे वरच्या पंख्याची हवा मिळणंच मुष्किल होतं...हा प्राणी जरा मोठा असता तर बरं झालं असतं असंही कित्येक वेळा वाटतं. निदान त्याची तंगडी तरी तोडता आली असती. पण ते इतके बारीक असतात की केव्हा नि कसे तुमच्या शरीरात घुसतात याचा पत्ताच लागत नाही. पण ते असेच चावू लागले की तेवढा भाग सुजून येतो. अन् एखादे वेळी संपूर्ण शरीरही फुलून निघण्याची शक्यता असते. त्याला अर्थात् इलाज नाही. कलकत्याच्या रोजच्या जीवनाचाच हा एक भाग आहे, एवढं खरं !

□ □ □




जागेअभावी
अनेक दिवस
मागे राहिलेले
कविता
हे सदर
या अंकापासून
सुरु होत आहे.

## सांग आता

तुझ्या अभंगाची गोडी
येते भंगल्या राउळी
हळव्या मनात माझ्या
भक्ति तुझी वास करी
तुझ्या टाळाचा रे नाद
वेडावितो माझ्या मना
विणा मृदुंग सांगतो
माझ्या देवाच्या कथा
राउळाच्या कळसाशी
नाते जडले रे प्रभु
सांग आता केव्हा येऊ
तुझ्या चरणी लिन व्हाया !

रमेश नेवसे

## काचपात्र

चाणवले म्हणून
नेहमी लपवले
मनाचे काचपात्र
अंधारात ठेवले !
तेवढाच दिलासा
चकवले जगाला
तडा काचपात्राचा
कळणार कुणाला ?

यशवन्त भिमाले

## मी माझ्यावरती फिदा

इंद्रधनूचे रंग लेऊनी मिरवित असते सदा,
सखे, मी माझ्यावरती फिदा–
कधि बनते हिरवी वनराणी,
हिरवा शालू मरवा वेणी
हिरवा शेला अंगावरि अन् हाती हिरवा चुडा ॥
संध्येच्या रंगात न्हाउनी
गुलाल भांगी, लाल पैठणी,
लाजेची वरि लाल ओढणी, ओठी रंगतो विडा ॥
कधि बनते मी त्यागि विराणी,
सफेत साडी हिम गौरांगी,
दंतपंक्ति या कुंदकळ्या जणु
हास्य फुलवितो सदा ॥
कधी निशेशी मैत्री जुळते
चंद्रकळा मज फार शोभते
काळी नागिण पाठी रुळते, माझी निराळी अहा ॥

सौ. कुसुम रा. अभ्यंकर

---

## आस्वाद

यशवंत भिमाले यांची दोनच कडव्यांची 'काचपात्र' ही छोटीशी कविता. पण तिच्यात एक चमत्कृती आहे. पहिल्या कडव्यात, अंधारात ठेवलेल्या मनाच्या काचपात्राची हकीगत आहे. हे सरळ सरळ रूपक आहे. पण या साध्या विधानातच पुढल्या अर्थचमत्कृतीचे बीज आहे. कारण हे काचपात्र जाणीवपूर्वक लपलेले आहे !

या लपण्यामुळे अंधार मोठा गूढ आणि अर्थपूर्ण असल्याचे कवीला भासवायचे आहे. कारण त्यामुळेच जगाला चकवून काचपात्राचा तडा कुणाला दिसू न दिल्याचे समाधान त्याच्या मनाला मिळालेले आहे. हा तडा काही फार विदारक नाही. कारण मनाच्या काचपात्राने तो निमूट सोसलेला आहे. फक्त हे सोसणे जगाला दिसू नये एवढीच त्याची धडपड आहे. ते विफलतेतले समाधान आहे.

'मी माझ्यावरती फिदा' या कवितेत सौ. कुसुम रा. अभ्यंकर यांनी एका सौंदर्य-लुब्ध देहस्विनीच्या विविध रंगवृत्तींचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. निसर्गातल्या काही रंगछटा आणि त्यांशी समांतर अशा वेषभूषेतील रंगवृत्ती यांचे वर्णन येथे आहे. तथापि अशा ठिकाणी जी उत्कट संवेदनक्षमता असावयास हवी, ती प्रस्तुत कवितेत फारशी प्रतीत होत नसल्याने या वर्णनाला शब्दांच्या कलाकुसरीचे दुय्यम रूप आलेले आहे. हिरवा, लाल, पांढरा आणि काळा या रंगांच्या श्रृंगाराचे वर्णन कुठेच उत्कटतेचे टोक गाठत नाही. नाथांच्या रंगांच्या गवळणी अथवा शाहिरांच्या रंगलावण्या यांची आठवण झाली म्हणजे हे स्पष्ट होईल. प्रस्तुत कवितेतील सौंदर्यलुब्ध वृत्ती मात्र विलोभनीय आहे.

रमेश जि. नेवसे यांनी आपल्या भावदैवताची आळवणी अभंगाच्या भाविकतेने केलेली आहे. भंगल्या राउळात अभंगाची गोडी घेण्याच्या त्यांच्या अनुभूतीच्या उल्लेखाने कविता प्रारंभीच कितीतरी उंचावते. पुढे मात्र या भावनेच्या उंचीची अपेक्षा कवितेत राखली जात नाही आणि कविता निवेदनाच्या पातळीवर खाली उतरते. राउळाच्या कळसाशी नाते जडल्याचा उल्लेख पुन्हा आर्तता उंचावतो, पण पुन्हा कविता अतिशय साध्या असुंदर निवेदनाने संपून जाते. साध्या शब्दात भाव साकार करण्याचे सामर्थ्य या कवीने जाणलेले आहे; पण अजून त्या सामर्थ्यावर प्रभुत्व मिळवलेले नाही हे या कवितेतून जाणवते.

—रसिक



# पुन्हा ते डाक्का



सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक बांगला देशाची घोषणा !

—अखेर पेपरचाच मथळा तो. जंबो जेटच्या या युगात अक्षांश-रेखांशाच्या कचाटच्यातून कोणते राष्ट्र सुटले आहे? केवळ राज्य या व्याख्येची परिपूर्णता व्हावी म्हणून सार्वभौमत्वाची घोषणा करायची. खर तर जनतेपासून दूर गेलेल्या अवामी लीगला किंवा पिंडी सरकारला, दोघांनाही बांगला देशवर अधिकार सांगण्याचा काडीमात्र अधिकार नाही.

एका आम्रकुंजात अठराव्या शतकाच्या मध्याला नबाब सिराज उधौला

साम्राज्यवाद्यांकडून पराभूत झाला होता आणि आता दोन शतकानंतर अशाच एका आम्रकुंजात दहा एप्रिल एकाहत्तरला स्वतंत्र बांगला देशाची घोषणा झाली. एकंदरित मराठ्यांच्या इतिहासात जे स्थान खेडशिवापूरच्या आमराइला – तितकेच महत्व कुश्तीया जिल्ह्यातील मेहेरपूर सब्डिव्हिजनमधल्या 'मुजीबनगरच्या' या आमराइला बंगालचे इतिहासात येणार तर !

सार्वभौम बांगला देशाच्या वॉरकॅबिनेटच्या अध्यक्षपदी शेख मुजीब उल रेहमान होते. उपाध्यक्ष सय्यद नझरूल इस्लाम – पंतप्रधान ताजुद्दीन अहंमद. परराष्ट्र मंत्री मुस्ताक अहंमद या चौघांबरोबरच कॅप्टन मन्सूर अली आणि ए. एच. कमरुझमान हे ही या 'वॉरकॅबिनेट'मध्ये होते. हे वॉर कॅबिनेट पक्षांतर्गत लोकशाही पद्धतीने निवडले गेलेले नव्हते तर काही पुढाऱ्यांकडून लादले गेले होते. या वॉर कॅबिनेटचे अध्यक्ष शेख मुजीब हे उपाध्यक्ष नझउल इस्लाम यांना पंचवीस मार्चपासून भेटलेच नव्हते. वा स्वातंत्र्य सोहळ्यालाही हजर राहिले नव्हते आणि तरीसुद्धा शेख मुजीब अली रेहमान हे मुक्त असून भूमिगतरीत्या मुक्तीफौजेस मार्गदर्शन करीत असल्याचा बकवा चालू होता. 'गार्डीयनने' मात्र शेखसाहेब अटकेत असल्याचे फोटो प्रसिद्ध केले होते आणि सर्वसामान्य जनतेलाही शेखसाहेब अटकेत असून त्यांचे नेतृत्व सध्याच्या चळवळीला नाही हे स्पष्ट समजत होते.

शेख मुजीब यांचा पर्सनॅलिटी कल्ट वाढवण्याचा पद्धतशीर प्रयत्न अवामी लीग नेत्यांकडून चालू होता. वस्तुतः हजारो लाखो लोकांचे बलीदान झाले असताना कुश्तीया जिल्ह्यातील त्या छोट्या गावाला 'मुजीबनगर' हे नाव देण्याचे काय कारण होते ? खरं तर प्रथमपासून शेखसाहेबांचा या सशस्त्र लढ्यास विरोध होता. जी गोष्ट शेख साहेबांच्या दैवी 'व्यक्तिमत्वाविषयी'तीच अवामी लीगच्या 'प्रचंड सामर्थ्याविषयी.' स्वतंत्र, सार्वभौम सरकारच्या घोषणेचा वग भारतीय सरहद्दीनजीकच्या कनातीत पार पाडला गेला. प्रत्यक्षात सामर्थ्य असते तर एखाद्या जिल्ह्याच्या ठिकाणी किमान तालुक्याच्या ठिकाणी, हा 'स्वातंत्र्यसोहळा' पार पाडण्यात आला असता. □

–जिना करकरला. मिश्यांवर दोन लिंब झेलणारा एक अजका उभा-आडवा चिरेबंदी देह समोर उभा ठाकला – बीरेन नाग ! ऐंशी वर्षांचे वृद्ध स्वातंत्र्य योद्धे ऐंशी गोळ्या छातीवर झेलण्याची दंतकथा त्यांच्या संबंधीच प्रचलित होती. त्यांचे बरोबर सादीकखान आणि माजी 'हिंदू मंत्री' धीरेनदत्त यांचे चिरंजीव संजीवदत्त आले होते.

बिरेन नाग हे ब्राह्मणबारीयाचे राहणारे. शिक्षण फारसे झालेले नाही पण सेवावृत्ती आणि त्यागाने अवामी लीगच्या जबाबदार नेतृत्वात मोडत होते. बिरेननाग यांच्याविषयी हिंदु-मुस्लीम दोहो जमातीत मोठ्या आदराची भावना आहे.

# थोडक्यात ही बंगाली भांडवलदार विरुद्ध पंजाबी भांडवलदार अशी लढाई आहे....

**अनिल बर्वे : लेखांक – सात**

५२ च्या भाषा प्रश्न चळवळीत नंतर भारत-पाक युद्धाच्या काळात तसेच ७० च्या सहा कलमी चळवळीत अशी तीनदा अटक झालेली. त्या आधी स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी अनेकदा यांना तुरुंगात डांबले होते. समृद्ध अनुभव – प्रामाणिक विधाने यामुळे त्यांच्या बोलण्यातला रांगडेपणा जाणवत नव्हता – सहा कलमी कार्यक्रमाचा काथ्याकूट चालू होता.

'आमचा जगण्याचा अधिकार' या ६८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या शेख मुजीब अल् रेहमान यांच्या पुस्तकात हा सहा कलमी कार्यक्रम आहे. त्याप्रमाणे–

१ : पाकिस्तानची राज्यघटना प्रौढमतदान पद्धतीवर आधारलेली लोकशाही पद्धतीची आणि संघराज्यात्मक असेल.

२ : केंद्रीय सरकारकडे केवळ परराष्ट्र आणि संरक्षण ही दोन खाती राहतील बाकीचे बाबतीत सर्व अधिकार राज्याकडे असतील.

३ : पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानसाठी दोन स्वतंत्र चलने असावीत आणि हे शक्य नसल्यास एकच चलन ठेवावे परंतु पूर्वेच्या पैशाचे पश्चिमेत स्थलांतर होणार नाही याची तरतूद करण्यात यावी.

४ : कर आकारणी वसुली हे अधिकार राज्यसरकारकडे असतील आणि केवळ केंद्र सरकारच्या खर्चासाठी राज्य सरकारे आवश्यक ती रक्कम केंद्राच्या सुपूर्द करतील.

५ : राज्य सरकारांना आपले व्यापारी प्रतिनिधी आणि व्यापार याबाबत स्वायत्तता राहील व ते जगातील कोणत्याही राष्ट्राशी संबंध प्रस्थापित करू शकतील. केंद्र सरकारला लागणाऱ्या परकीय चलनाचा वाटा दोन्ही विभाग सम-समान उचलतील.

६ : सैन्यामध्ये स्वतंत्र पूर्व पाकिस्तानी सैन्य उभारून ते पूर्वपाकिस्तानातच

ठेवण्यात यावे. दारूगोळयाचे कारखाने पूर्व पाकमध्येच ठेवावेत किंवा स्वतंत्र ' मिलिशिया ' उभारण्यास परवानगी असावी.

—याह्याखानाने सैन्याचा वापर केला यात काहीच गैरवाजवी केले नाही. मी म्हणालो, आज अगदी स्पष्टच बोलायचे ठरवले होते. तुमच्याकडे पैसा अन् समृद्धता आहे म्हणून ही ' सहा कलमी ' अरेरावी काय ? पंजाब्यांकडे सत्ता व सैन्य आहे. आता आपापसात लढा. बळी तो कान पिळी या न्यायाने काय ठरायचे असेल ते ठरेल.'

या सहा कलमी कार्यक्रमाने तुमचे स्वरूप उघडे पडते. एक तर तुम्ही सेक्युलर नाहीत, कारण या सहा कलमी कार्यक्रमात तसा उल्लेख नाही. तसेच तुम्ही समाजवादीसुद्धा नाहीत कारण या सहा कलमी कार्यक्रमात त्याचा पुसटसासुद्धा उल्लेख नाही. थोडक्यात ही बंगाली भांडवलदार विरुद्ध पंजाबी भांडवलदार अशी लढाई आहे. जनतेला यात काहीही स्थान नाही. तिचा तुम्ही विचार केला नाही. आणि एक तर ही फुटीरतेची चळवळ आहे. स्वतंत्र चलन आणि मिलिशिया मागणारे व व्यापारासकट इतर बाबतीत ' सार्वभौमत्व ' मागणारे लोक संघराज्य मागतात असे म्हणणे धारिष्टचाचे होईल. थोडक्यात प्रामाणिकपणे बोलायचे झाल्यास खरच तुम्ही ' मीरजाफर ' आहात. या अशा कार्यक्रमावर कोणताही राज्यकर्ता तडजोड करावयाचा नाही. हिंदुस्थान सरकारदेखील अशा प्रसंगी सैन्यच वापरेल. संघराज्य व एकत्मतेबाबत गांधी म्हणाले होते—

' समान उद्दिष्ट, समान ध्येय व समान दुःखे असण्यात खरी एकता आहे. असे समान ध्येय गाठण्याकरिता सहकार्याच्या मार्गाने एकमेकांच्या दुःखात वाटेकरी होऊन व परस्परांविषयी सहिष्णुतेची भावना बाळगून आपणाला एकता उत्तम प्रकारे सिद्ध करता येईल. '

—परंतु तुम्ही मात्र बिगर बंगाल्याविरुद्ध द्वेष पेटवलात. प्रांतीय भांडवलदारांच्या हितासाठी, तुम्ही बंगाली संस्कृतीच्या नावाखाली जनतेचा बळी देत आहात. तुम्ही हिंदुविषयी सहिष्णुता दाखवता कारण—' बंगाली व्यापार उद्योग धंद्यात अजूनही हिंदूंचेच वर्चस्व आहे म्हणून होय. ' केवळ राष्ट्र श्रीमंत होऊन जनता सुखी होत नाही. गेल्या तेवीस वर्षात हिंदुस्थानात उत्पादनवाढ झाली आणि संपत्ती वाढली पण जनता उपाशीच राहिली. फक्त भांडवलदार गबर झाले. जनतेसाठी लढा असेल तर आर्थिक आणि सामाजिक न्यायाची मागणी पाहिजे. परंतु तुम्ही ती करत नाही. कारण तुम्हाला स्वतःच्या स्वार्थाची काळजी आहे. जनतेच्या सुखदुःखाची नाही.

माझ्या या आकस्मिक हल्ल्याने सारेजण स्तंभितच झाले. एका भारतीय पत्रकाराकडून अशी उलट तपासणी होईल याची त्यांना कल्पना नव्हती. माझी सरबत्ती मात्र चालूच होती—

'तुमच्याजवळ स्वातंत्र्या 'साठी बांगला देशाच्या आर्थिक कार्यक्रमाची योजना आहे काय ? ज्या 'स्वातंत्र्या 'साठी हजारो लाखोंचे बळी देत आहात त्या जनतेचे काय ? चितगाव हील ट्रॅक्समधून राहणाऱ्या आदिवासींची पिळवणूक बंगाली व्यापारीच करतात ना ? भूमिहीन किसानांचा प्रश्न सोडवण्यासाठी तुम्ही जमीनदारी नष्ट करणार आहात काय ? आज पंजाबी तुमचे शोषण करीत आहेत, तेच उद्या परराष्ट्रे करतील. त्या परराष्ट्रांविरुद्ध तुम्ही लढणार आहात काय ? की 'कम्युनिस्ट विरोधा'साठी तुमचे 'स्वातंत्र्य योद्धे' शेख मुजिबअल रेहमान व्हीएतनामी स्वातंत्र्ययोद्धयांना चिरडण्यासाठी अमेरिकेला तळ देणार आहेत ? आज तुम्ही लष्करी अत्याचाराविरुद्ध आरडा ओरडा करीत आहात-मग, सिलोनच्या क्रांतीकारकासाठी का नाही सहानभुतीचे चार शब्द बोलत ?

माझ्या प्रश्नांना त्यांचेजवळ उत्तरे नव्हती. बीरेन नाग पडलेल्या सुरात एवढेच म्हणाले.–' मी या गोष्टींबाबत विचारच केला नाही.' एकंदरीत मी पंजाब्यांचा पाठिराखा आहे अशी त्यांची कल्पना झाली तेव्हा पुन्हा स्पष्टीकरण करावे लागले–

'पश्चिम पाकिस्तानने बांगला देशचे शोषण केले याची मला पूर्ण जाणीव आहे. परंतु आर्थिक शोषणांविरुद्ध आर्थिक मागण्या करूनच लढले पाहिजे होते–नोकऱ्यात स्थानिक जनतेस विशेष सवलत–व्यापारातील गळचेपी विरुद्ध आवाज बंगाली भाषेस महत्त्व याकरता आंदोलन करण्यास पाहिजे होते. जवळजवळ फुटून निघणारी ही सहा कलमी योजना मांडावयास नको होती.'

आर्थिक शोषणाविरुद्ध आर्थिक समानतेचा म्हणजेच समाजवादाच्या लढा पाहिजे. बंगाली जनतेने तेवीस वर्षापूर्वी शोषण करणाऱ्या हिंदु व्यापारी-जमीनदाराविरुद्ध काफर म्हणून चढाई केली पण शोषण संपले नाही. आज पश्चिम पाकच्या लष्करी टोळक्याविरुद्ध स्वातंत्र्याच्या नावाखाली लढाई चालू आहे. पण स्वातंत्र्य तरी खरच मिळणार आहे का सत्तांतर ठरणार आहे ?

पाकिस्तानचे तुकडे व स्वतःचे आर्थिक स्वार्थ या करता भारत सरकार तुम्हाला आज पाठिंबा देते आहे. पण जर तुमची चळवळ जनतेच्या मुक्तीसाठी, भांडवलदारी समाजरचनेच्या विरुद्ध उभी ठाकली तर सिलोनच्या क्रांतिकारकांना चिरडण्यासाठी ज्याप्रमाणे भारतीय आरमार-हवाईदल रवाना झाले त्याप्रमाणेच याह्याच्या सेबर-जेटच्या मदतीला भारतीय नॅटस् धावून येतील याची तुम्हाला कल्पना आहे काय ?

सादीकखान आता चांगलेच विचारमग्न झाले होते. त्यांनी मग कबुलीच दिली–'महंमद तुहाचे अनुयायीसुद्धा पंजाबी सैनिकांविरुद्ध लढत आहेत. त्यांची लढण्याची पहिल्यापासून तयारी असल्याने तेच खेडुतांचे रक्षण करू शकतात. त्यामुळे आमच्यावरचा जनतेचा विश्वास उडत चालला आहे व तोहाला पाठिंबा मिळतो आहे. अर्थात आमच्या कार्यकर्त्यांना लष्करी शिक्षण मिळाल्यावर ही अडचण दूर होईल.'

मग मी हसत हसतच सादीकखान यांच्या पुढे पेपर धरले.

पाकिस्तान सरकारने मौलाना भाषाणी आणि मोहंमद तोहा यांना पकडण्या-साठी दहा हजार रुपयांची बक्षीसे जाहीर केलेली होती–' पहा, जर अवामी लीगचे नेतृत्व स्वातंत्र्य चळवळ चालवत आहे तर तिच्या नेत्यांना पकडण्यासाठी का बक्षिसे लावली जात नाहीत ?' मी विचारले.

कारण उत्तर अगदी स्पष्ट होते. परदेशात जाऊन परदेशी सरकारच्या कृपेने 'स्वातंत्र्य युद्ध' चालवणाऱ्यापासून पाकच्या लष्कर शहांना काहीही धोका नाही. या उलट 'परकीय हस्तक्षेपाचा' आणि 'पंचमस्तंभीयत्वाचा' आरोप अवामी-लीगवर करणे त्यांना सोपे आहे. यापेक्षा तोहा-भाषाणींची परिस्थिती वेगळी. त्यांच्या संघटना शेतकऱ्यात, आदिवासीत भक्कम आहेत. युद्ध चालू झाल्यापासून दोघांचे अनुयायी जमिनीवर पाय रोवून हाती असलेल्या साधन सामुग्रीनिशी लढत आहेत. अवामीलीगसारखे सैरावैरा पळून गेले नाहीत. जी 'पीपल्स आर्मी' उभार-ण्यात अवामी लीगच्या नेत्यांना अपयश आले, किंवा त्यांना उभारायचीच नव्हती ती 'पीपल्स आर्मी' उभारण्यात माओवादी तोहाला मात्र यश प्राप्त होत आहे !

फ्रान्समधील 'ला एक्सप्रेस'पासून पुण्यातील 'केसरी'पर्यंत आणि 'करंट'-पासून 'लोकसत्ते'पर्यंत अनेक वृत्तपत्रांनी बांगला देश चळवळ माओवाद्यांच्या आणि नक्षलवाद्यांच्या हातात जात असल्याची भीती व्यक्त करण्यास सुरुवात केली आहे. जर 'बांगला देश' लाल झाला तर भांडवलशाही समाजाला भीती




वाटणे साहजिकच आहे.

महंमद तोहा आणि नुरुप कादर हे पूर्व पाकिस्तानचे प्रमुख नक्षलवादी नेते. सिल्हेट आणि चितगाव हील ट्रॅकच्या काही भागात आणि नौखालीच्या फेणी विभागात नक्षलवादी चळवळीचा चांगलाच जोर आहे. नक्षलवादी नेता 'नुरुल कादर' ज्याच्या एका जवळच्या सहकाऱ्याने मला नक्षलवादी चळवळीची माहिती दिली त्याचे म्हणण्याप्रमाणे–

पूर्व पाकिस्तानात गनिमी पद्धतीने लढणाऱ्या नक्षलवाद्यांच्या फाइटिंग स्क्वाड्सची आणि त्यातील एकंदर क्रांतिकारकांची संख्या दहा हजाराचेवर आहे. हे दहा हजार अधिक वीस हजार इ. पी. पी. आणि इ. पी. आर. व त्याच बरोबर मौलाना भाषाणींचे पन्नास हजारावर निःशस्त्र परंतु कडवे अनुयायी मिळून पाकच्या लष्करशहांचा पराभव करून–'लाल बांगला देश' उभा करण्याची जिद्द नक्षलवाद्यांनी धरली आहे. पूर्व पाकिस्तानातील दोन्ही कम्युनिस्ट पक्षांचा या सशस्त्र लढ्यास पाठिंबा असल्याने तेथे कम्युनिस्टांतर्गत फाटाफूट नाही, तसेच सर्व सामान्य जनतेचीही या लढ्यास सहानभूती आहे. खंदे नेतृत्व मिळाले तर मोठ्या प्रमाणावर जनताही या 'लाल मुक्ती फौजेत' सामील होईल.

सशस्त्र क्रांतीसाठी नक्षलवाद्यांना पूर्व पाकिस्तानात फार अनुकूल परिस्थिती आहे. जो फायदा माओला जपानी साम्राज्यवाद्यांविरुद्ध मिळाला तोच येथील नक्षलवाद्यांना पंजाबी लष्करशहाविरुद्ध लढून मिळत आहे. तसेच नक्षलवादी नेते हे पहिल्यापासून भूमिगत राहत असल्याने युद्ध चालू झाल्याने त्यांचेवर काहीच ताण पडला नाही. या उलट अवामी लीगच्या भाषणबाज पुढाऱ्यांची मात्र ससेहोलपट झाली, नक्षलवादी पहिल्यापासून गनिमीपद्धतीने तुकड्या तुकड्यांनी लढले. त्यामुळे मनुष्यहानी न होताही त्यांना शस्त्रास्त्रे मात्र भरपूर मिळवता आली. या उलट अवामी लीग 'तळहातावर शीर' घेऊन उभी ठाकल्याने त्यांची जबर मनुष्यहानी आणि पराभव झाला. या पराभवाने निराश आणि संतप्त झालेला तरुण मुक्ती सैनिक अवामीलीगची आघाडी सोडून नक्षलवादी नेतृत्वाखाली जमा होऊ लागले आहेत. युद्धकाळात पाकिस्तानी सैन्याला भिऊन अवामी लीग नेते व सैनिक माघार घेऊ लागले व पळून जाऊ लागले.

ग्रामीण जनतेस संरक्षण देण्यात ते कुचकामी ठरले. या उलट नक्षलवाल्यांनी मात्र ग्रामीण जनतेस डोंगर कपाऱ्यातून हालवणे, आवश्यक ते नागरी प्रशासक उभे करणे, व्यापाऱ्यांच्या काळ्याबाजारास ठेचून काढणे इ. कामे केल्याने जनतेचा विश्वास नक्षलवादीच संपादन करू शकले. अर्थात ही कामे काही सराइतासारखी पार पाडली गेली नाहीत. सुसूत्रीकरण – निश्चित राजकीय भूमिका घेण्यात नक्षलवाद्यांचा फार वेळ वाया गेला. तरी पण माओ–गुंव्हेरा यांचे लष्करी मार्गदर्शन अभ्यासलेला नक्षलवाद्यांना स्वतःची बाजू सावरण्यास फारसा वेळ लागला नाही.

या व्यतिरिक इतर राजकीय फायदेही नक्षलवाद्यांना मिळाले. नक्षलवाद्यांनी प्रथम पासूनच ' सत्ता ही बंदुकीच्या नळीतून जन्म घेते ' या माओ वचनाचा घोषा चालवला होता नि निवडणुकींवर बहिष्कार टाकला होता. ही त्यांची कृतीच जास्त बरोबर होती हे लोकांना उमजून आले आहे. पारडे असेच जड होत गेले तर चीन निश्चितच स्वत:ची भूमिका बदलणार. आजपर्यंत जगातील सर्वच स्वातंत्र्ययुद्धांना चीनने सक्रीय मदत केली आहे. आज चालू असलेल्या सिलोनमधील बंडखोरांना चीननेच उत्तर कोरियाच्यामार्फत मदत दिली हे आता जगजाहीर आहे आणि जेव्हा चीन बंगालमधील ' जनतेच्या मुक्ती चळवळीस ' पाठिंबा देईल, तेव्हा आज अवामीलीगच्या ' भांडवलदारी स्वातंत्र्य चळवळीस ' पाठिंबा देणारी भांडवलदारी राष्ट्रे चीनविरुद्ध भूमिका घेतील आणि भारताच्या पूर्वेला नव्या व्हिएटनामचा जन्म होईल !

केवळ ग्रामीण विभागातच नव्हे तर शहरी विभागातही नक्षलवादी ' अर्बन गुरीला ' तयार आलेले आहेत. नुरुल कादर हा चौतीस वर्षाचा तरुण नेता केंब्रिज विश्वविद्यालयाचा पदवीधर असून उठावापूर्वी पावना जिल्ह्यात मॅजिस्ट्रेट होता. तरुणांच्या ज्या शहरातून भूमिगत संघटना उभ्या राहिल्या त्यांच्या मागचा तो एक प्रमुख सूत्रधार होता. बंगालमधील नक्षलवाद्यांचा वाढता जोर पाहता, आम्ही आत्मपरीक्षण करायची वेळ आली आहे. खरच भारतीय जनता व सरकार स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहेत काय ? असल्यास बंगालमधील बंगला देश चळवळ नक्षलवाद्यांच्या हातात गेली तर तिला आम्ही पाठिंबा देणार आहोत काय ?

सांधे बदलत बदलत विषयाची गाडी पुन्हा अवामी लीगवर आली. बिरेन नाग सांगू लागले —

' सात डिसेंबरच्या सार्वत्रिक निवडणुकात अवामीलीगने अभूतपूर्व विजय मिळवला तेव्हा अवामीलीग सहा कलमी कार्यक्रम अंमलात आणेल या भितीने याह्याखानाने नॅशनल अॅसेंब्लीची बैठक पुढे ढकलण्यास सुरुवात केली. तेव्हा दोन मार्चपासून शेख मुजीब अल रेहमान यांनी असहकाराची चळवळ पुकारली. पस्तीस आदेश जाहीर केले. त्याप्रमाणे सरकारी कार्यालये, न्यायालयावर हरताळ पडला. डाक, तार घरातील सेवक फक्त बंगाली लोकांचीच तारपत्रे वाटू लागले. रेडिओ-टेलिव्हिजन लष्करी हुकूम नाकारून अवामीलीगची धोरणे-विचार प्रक्षेपित करू लागले. प्रादेशिक-स्थानिक करवसुली ' बांगला देश ' खात्यात जमा होऊ लागली. ढाक्का–कोमील्ला–जेस्सोर कॅंटोनमेट वगळता सर्व बंगालभर अवामीलीगचेच राज्य प्रस्थापित झाले, तेव्हा १७ मार्चला याह्याखान डाक्क्याला रेहमान यांचे बरोबर चर्चेसाठी आला. १७ तारखेपासून २४ तारखेपर्यंत चर्चा चालू होती. पण त्या आधीच शेख मुजीबने चार अटी घातल्या होत्या. अखेर चर्चा फिसकटली. पंचवीस तारखेलाच सकाळी लष्कराने सर्वत्र ताबा घेण्यास सुरुवात केली. सव्वीसला याह्या-

खानाने अवामीलीगवर बंदी घालून शेख मुजीबला देशद्रोही ठरवले व आजच्या लढाईस प्रारंभ झाला.

कशावरून याह्याखानानेच चर्चा फिसकटवली ? कदाचित् आपल्या पस्तीस आदेशांचा परिणाम पाहून शेख मुजीबनेच एखादी भूमिका घेतली असावी. चर्चा कशावर चालू होती, कोणत्या कारणावरून फिसकटली याची माहिती देऊ शकाल काय ?

विरेननागसह सर्वांनी नकारार्थी माना हालवल्या. संजीवदत्तनी मात्र थोड्या निराशसुरात विचारले—"तुम्ही इकडे अवामीलीगच्या विरुद्ध का ?"

—" हे, पहा मी काही अवामीलीगचा विरोधक नव्ह. पण स्तुती पाठकही नव्हे. मला बंगालच्या चळवळीचे योग्य मूल्यमापन करायचे आहे आणि हे मूल्यमापन करताना अवामीलीगचे दोष नजरेआड करता येत नाहीत. एक मात्र खरे की बंगालच्या इतिहासात अवामीलीगचे स्थान अनन्य साधारण आहे. कारण अवामीलीग ही बंगाली असंतोषाची जनक आहे."

— केवळ अत्त्याचाराने किंवा संघटनेतून क्रांती होते काय ? तर अर्थातच नाही. जगात ऐंशी देशात कम्युनिस्ट पक्ष आहे. त्या देशातून क्रांत्या झाल्या काय ? १७ साली रशियात क्रांती झाली त्याआधी तिथे काही आबादीआबाद नव्हते. तरी पण सतरा सालीच क्रांती का झाली ? भारतात हजारो वर्षे शोषण-अन्याय चालू आहे. मग भारतात का क्रांती होत नाही ? वर्गीय संघटना हे क्रांतीचे एकमेव हत्यार होऊ शकत नाही. भारतात कम्युनिस्टांच्या काय कमी वर्गीय संघटना आहेत ? टिळकांकडे काय वर्गीय संघटना होत्या ? तरी पण ते राष्ट्रीय नेते होऊ शकले. का ? कारण टिळक हे 'असंतोषांचे जनक' होते.

जोपर्यंत समाजात असंतोष निर्माण होत नाही तोपर्यंत क्रांती होऊ शकत नाही आणि म्हणूनच तत्वनिष्ठेने जगणाऱ्या कामगार कार्यकर्त्यापेक्षा, सेवाभावाने झिजणाऱ्या सर्वोदयवाद्यापेक्षा, संतापाने चार आगी लावणारा दोन बॉंबफेकणारा नक्षलवादी क्रांतिकारक परिणामकारक ठरतो. कारण तो समाजात असंतोष निर्माण करत असतो.

◘ ◘ ◘

---

अनिल बर्वे यांना पोलिसांनी नक्षलवादी पत्रके छापण्याच्या आरोपावरून नुकतीच अटक केलेली असल्याने यापुढचा समारोपात्मक लेख ते लिहू शकले नाहीत. तेव्हा लेखमाला आता येथेच 'समाप्त' होत आहे. —संपादक

---

रवींद्र पिंगे

## शतपावली

# राजाचं काळोखी गाव

इन्स्पेक्शनसाठी पार्टी निघाली. तिच्यात माझीही भरती झाली. कीर्रर्र काळोखाचं दाट रान तुडवीत आम्ही नारायण हरींचं कोरेगाव मागे टाकलं. कोरेगावच्या वेशीबाहेर सडकेच्या कडेला एका हातात घुरकटलेला कंदील आणि दुसऱ्या हातात दप्तराची झोळी पेलवीत उभे राहिलेल्या सरकारकुनांना आम्ही आमच्या जीपमध्ये कोंबलं. घारीने झेप मारावी तशी त्यांनी वातीवर जोरकस फुंकर मारली. जीपमध्ये गुडूप काळोख झाला. राजाच्या गावाच्या दिशेने आम्ही काळोख कापायला पुन्हा सुरुवात केली.

'ह्या भागात इतका मीट्ट काळोख कसा हो?' मी आश्चर्याने विचारलं.

'इथे काळोखच असणार, साहेब! इथे दुसरं काय असणार? दोन हजार वर्षं इथे काळोखच आहे, साहेब.' सरकारकून शांतपणे म्हणाले.

जीपने बऱ्याच गिरक्या घेतल्यानंतर शहरवस्तीची किंचित चाहूल लागली. काळोखात वाटं बुडवीत सरकारकून सांगू लागले, 'ही रेसिडेन्सी. इथे जेकबबापू रहायचा. ह्या डोंगराच्या पलीकडे रामोश्यांची वस्ती सुरू होते...इथे अंतुबुवा जोश्यांचं दत्तमंदिर आहे...ती राजाची दिपमाळ...' आम्हाला अर्थबोध होत नव्हता. पहावं तिकडे काळोखाचा काळा कातळ पसरलेला होता.

अशा कभिन्न काळोखात पृथ्वीचा हा कोपरा गेली दोन हजार वर्षं गुदमरत पडला आहे? असेलही. राजाचं गाव सातवाहनकालात वसल असं ग्रंथ सांगतो. ते राजाचं काळोखातलं गाव जवळजवळ येऊ लागलं.

जीप डाक बंगल्यासमोर उभी राहिली. डाकबंगला दरवेश्याच्या अस्वलासारखा अंग ऐसपैस ताणून काळोखात पहुडला होता. कांबळीत गुरफटलेले एक म्हाताबुवा

बत्ती दाखवीत सामोरे आले. तिच्या डुचमळत्या फिक्कट क्षीण प्रकाशात आम्ही बंगल्यात आलो. बंगल्यात दिवे नव्हते. मधल्या प्रशस्त दालनात एक ऐसपैस शिसवी मेज होतं. त्याच्यावर आमच्या बॅगा ठेवल्याबरोबर ते डुगडुगलं.

इतकं सुधारलेलं म्हणतात त्या ह्या राजधानीच्या गावात वीजेचे दिवे कसे नाहीत ?' मी सरकारकुनांना विचारलं. शांतपणे ते म्हणाले,

'येतील—येतील. जरा सावकाशीनं येतील, पण येतील हे मात्र नक्की.'

कांबळीत गुरफटलेल्या म्हातारबुवांनी कांबळ सावरीत माझ्यासाठी एका कडेच्या खोलीत बिछाना अंथरून दिला. त्यावर बसलो तर तो तडतडीत लागला. चापून पाहिला तर हाताला काथ्या लागला. विचारलं, तर म्हातारबुवा म्हणाले,

'ह्या थंडीच्या पट्ट्यात काथ्याच बरा पडतो. बरं, काथ्याला मरण नाही. कितीही तुडवा, उड्या मारा, धांगडधिंगा करा काथ्याला मरण नसतं.'

'काय सांगताय राव! अहो, ह्या डाकबंगल्यात कोण कशाला धांगडधिंगा करणार आहे? गादी ही मऊ कापसाचीच पाहिजे.'

'पी. डब्ल्यू. डी. जवळ बोललं पाहिजे.'

'उन्हाळ्यात सालटी निघत असतील ह्या काथ्याच्या गाद्यांवर झोपणारांची.'

'कशापायी साहेब? उन्हाळ्यात बंगल्यात निजायचं कामच नाही. सगळे साहेबलोक बाहेर अंगणात झाडाखाली कॉटा टाकून आराम करतात की.'

उघड्यावर झाडाखाली झोपायला मिळणाऱ्या त्या भाग्यवंतांचा हेवा करीत काथ्याच्या गादीवर आडवा झालो. क्षणभर पायपुसण्यावरच आपण झोपलो आहो-तसं वाटलं. पण अंमळशानं काथ्याची ऊब जाणवली.

'तुम्ही इथं किती वर्षं काम करताहात दारवान?'

'आपली ह्यातच इथं गेली, साहेब.'

'तुम्ही इथलेच का?'

'इथलेच तर काय! जेकबबापूकडे आमचे बापजादे नोकरीला राहिले. आम्हीही मग वाड्यावरच वाढलो.'

'पूर्वीची राजवट नि आताचे स्वातंत्र्याचे दिवस ह्यात फरक जाणवतोय की नाही?'

'आता ते तुम्ही साहेबलोकांनी ठरवायच. आमचं गरीबांच कसल काय आलंय? आला दिवस ढकलायचा कसाबसा.'

'तरी पण फरक म्हणून काही जाणवतोय की नाही?'

'आम्हाला आपलं जुनं ते सोनं साहेब. पंबाबा लाख माणूस होता. सोटा मारायचा. पण पोटात दया होती. आता दिवस बदलले साहेब. आता सोटा पण मारीत नाहीत नि पोटाकडं पण पाहात नाहीत. फक्त आपल्यापुरतं पाहातात नि ते पण बरोबर आहे. दोष नाही कुणाचा. काळच बदलला तिथं माणूस काय करील?

झोपा तुम्ही आता. मी बाहेर पडवीत आहे.'

डोळे मिटतांना दुरून कुठून तरी घड्याळाचा फक्त एकच टोला पडलेला त्या शांत काळोखात ऐकू आला. त्यावरून आजूबाजूला कुठे तरी घरं आहेत ह्या विचाराने मनावरचा ताण जरा सैल झाला. मग पाच दहा मिनिटाने त्याच घड्याळाचा आणखी एक टोला पडलेला ऐकू आला. आणखी दहा मिनिटांनी पुन्हा त्याच घड्याळाचा एकच टोला पडला! हे काय गौडबंगाल आहे? सकाळी म्हातारे दारवान म्हणाले,

'ती एक गंमतच आहे बघा! ट्रेनिंग कॉलेजमधलं पी. डब्ल्यू. डी.चं घड्याळ आहे ते. गेली पंचवीस वर्षं असेल आडनाड टोले देतंय. नि दर वेळेला फक्त एकच टोला देतं. काही काही ऑफिसरं रात्रीची जाम चक्रावून जातात बघा टोले ऐकून. मागे एक कस्टमवाले आले होते. ते रातभर टोले ऐकत जागत बसले. त्यांना कळेच ना, की ही काय भुताटकी आहे!"

'मग कुणी तक्रार नाही करत?'

'छे! एका रात्रीच्या वस्तीला यायचं नि तक्रारी करीत बसायचं – सांगितलंय कुणी साहेब? शिवाय, आता आपलं राज्य आलंय. आता कुणाचा कशावर विश्वास नाही साहेब.'

'म्हणजे?'

'म्हणजे असं की बंगल्यावर कम्प्लेंटबुक असेल हेच मुळी खरं वाटत नाही. समजा बुक दिलं, तरी शेरा साहेबापर्यंत पोहोचेल असं वाटत नाही. नि पोहोचलाच तरी त्या शेऱ्याचा उपयोग होईल असं पण वाटत नाही. मग कोण कशाला यातायात करतो?'

'तुमच्या अंगावरला हा कोट कुठून पैदा केलात?'

'हा होय? हा कोट जेकबबापूंचा. त्यांनी तो माझ्या बापाला दिला. आता मी वापरतोय. थंडीत जाम उपयोग होतो बघा. विलायती कापड आहे. विलायतवाल्यांची कापडं तीन तीन पिढ्या टिकताहेत.'

'जेकबबापू हे काय चमत्कारीक नाव आहे हो!'

'ते दिवाण होते. जेकब त्यांचं नाव. दिवाणाला संस्थानात बापूसाहेब म्हणत. म्हणून जेकबबापू. हा डाकबंगला हा मूळ त्यांचाच बंगला. त्यांच्यामागून हा राजेसाहेबांकडे आला. तेव्हा बंगल्यात फर्स्टक्लास आरास होती. मग तुम्ही म्हणालात ते आपलं राज्य आलं. तेव्हापासून पाऊल मागेच आहे बघा. चार आण्याची कंदीलाची काच मागितली तरी पी. डब्ल्यू. डी. पन्नास प्रश्न विचारतंय नि वर काच देण्याचं नाव नाही ते नाहीच. आम्ही म्हणतो तुमचा तो कंदीलही आम्हाला नको नि तो उजेडही नको. आमचा आपला पहिलीला पगार मोजा, म्हणजे तुम्हीही मोकळे नि आम्हीही मोकळे. असा जमाना आला आहे साहेब! मात्र तुम्ही आलात,

आम्हाला आनंद झाला. आता मुख्य म्हणजे ह्या बंगल्याच्या आवारातली झाडं बघून घ्या. जेकबबापूंनी लावली आहेत ती. ह्या मुलखात अशी झाडं दिसायची नाहीत. मेणवलीला नाना फडणीसांची बाग आहे म्हणतात एक. पण आपण काही पाहिलेली नाही. आमची ही बापूंची बाग म्हणजे फर्स्टक्लास काम आहे. "

आवारात धुकं तरंगत होतं. हवेत गारवा होता. झाडांचे उंच शेंडे धुक्यात बुडा-लेले होते. जमिनीवर पायतळी अशोकाच्या, बुचाच्या, चंपकाच्या कळयाफुलांचा सडा पडलेला होता. फुलांचा मंद गंध धुक्यालाही येत होता. उगवत्या सूर्याचे तिरपे नारिंगी किरण धुकं पिंजून दवाने ओल्या झालेल्या पालापाचोळयावर पडले होते. पाखरं जमिनीवर उतरली होती. बंगल्याच्या पिछाडीला चिर्वाचिवणारी मोठी घळ माजलेली होती. तिच्यावर रानफुलांचे झेले बहरलेले होते. हौसेने लावलेल्या फुल-झाडांचे वाफे सुकून वाळले होते. खारी पळत होत्या. फुलपांखरं इतस्ततः तरंगत होती. तो प्रसन्न, गार निरव प्रभातकाळ डोळयात अश्रू तरळावा, तसा थरथरत होता.

'आमच्या न्याहारीचं काय ?' मी धीर करून सरकारकूनांना विचारलं.

'त्याचं काय आहे की त्या गावात हॉटेल नाही. पण ह्या दारवानाची घरवाली आल्यागेल्यांची सोय पाहाते.'

'असं कसं ?'

'असंच आहे साहेब. राजेसाहेबांना कुणी चहाकॉफी प्यालेलं आवडत नव्हतं. तेव्हापासून हॉटेल नाही ते नाही. एक कोंगाटयांचं खोपट आहे. पण ते काही खरं नाही.'

'पण इथे दिवसाकाठी दोन चार तरी मोटारी येत-जात असतील.'

'येतात ना. त्या आल्या की तीच म्हातारी किटली घेऊन गाडीवर जाते. एक दोन सिंगल चहा खपतो.'

'पण तुम्ही हे सरकारात कळवलं पाहिजे. गावात आलेल्या अधिकाऱ्यांना चहा मिळत नाही म्हणजे काय ?'

'नाही मिळत असं कसं होईल साहेब ? ह्या बाईकडे न्याहारीसाठी चार अंडयांचा भगरा नि चार दशम्यांची ऑर्डर मी दिलेलीच आहे. जेवणाचा डबाही तिच्याकडूनच येईल. तीन वेळा चहा येईल. तसे बंदोबस्तात आम्ही कमी नाही पड-णार साहेब. हं; जुन्या जमान्यातली माणसं आहोत आम्ही. अधिकारी, मग तो कुणीही असो, त्याचा मानसन्मान झालाच पाहिजे असं आम्ही मानतो. आज तुमची म्युझियमला व्हिजीट ठेवलीय. त्यावेळी गेटावर तुम्हाला बंदूकाचा गार्ड ऑफ ऑनर कसा मिळतो ते पहा !'

सरकारकुनांचे डोळे आशेने लखलखत होते.

'मला म्युझियममध्ये काहीही रस नाही.' मी ठामपणे सांगितलं.

'असं कसं ? तुम्हाला राजा रविवर्म्याची ओरीजीनल चित्रं बघायला मिळतील.'

'त्याची गरज नाही.'

जेकबबापूच्या ओसाड बंगल्यात सकाळच्या वेळेचे चिठोरे–चिठोरे केले.

बाहेर रख्ख उन्हांचा पिसारा फुलला होता. काम दुपारी करायचं होतं. सरकारकूनांना घेऊन गावात चक्कर मारायला बाहेर पडलो. एका धुरोळा माखलेल्या जीर्ण भिताडाकडे बोट दाखवीत त्यांनी सांगितलं, 'हे पंडित सातवळेकरांचं घर.' भितीची पडझड झाली होती. गिलाव्याची ढेपळं निखळून भोकं झाली होती. पाखरांनी तिथे गवताच्या काड्या ठेऊन आपली घरं सजवली होती. भींतीच्या फटींमधून रानरोपटी उगवली होती. ह्या भींतीवर माणसाची सावली दोन तपं तरी पडलेली नसणार हे उघडच होत. सरकारकून म्हणाले, 'गांधीवधात ह्या घराची वाट लागली.' हे खर होतं. त्या चौथऱ्यावरचा ज्ञानदीप विझलेला होता. फिरता फिरता एक माडी लागली. तिकडे बोट दाखवीत सरकारकून म्हणाले, 'इथे ऐतिहासिक कागदपत्रांचे गठ्ठे बांधून ठेवलेले आहेत. पूर्वी राजवाडे इथे कागद लावायला मुक्काम करायचे.' आम्ही माडीवर गेलो. तिथे मांजरपाटाच्या जाड कापडात जुन्या ऐतिहासिक कागदांचे हजारो गठ्ठे रचून ठेवलेले दिसले. त्यांच्यावर मणभर धूळ साचलेली होती.

'इथली देशभाल कोण करतं ;'

'एक अर्धवेळ कारकून फेरी टाकतात.'

'ते काय करतात ह्या कागदांचं ?'

'काय करणार ? ते कागद राखतात.'

'पण ह्या कागदांचं वाचन कोण करतं ?'

'कुणीच येत नाही इकडे. क्वचित वर्षा–दोन वर्षातून एखादा पीएच. डी. चा संशोधक–विद्यार्थी आला तर येतो.'

'हे कारकूनच का नाही काही कागद वाचत ?'

'त्यांना एकतर मोडी येत नाही. नि समजा ते मोडी शिकले, तरी त्यामुळे प्रमोशनसाठी त्यांची केस स्ट्राँग होईलच अस नाही.'

'म्हणजे हे कागद असेच बासनात गुदमरून राहाणार म्हणायचे !'

'साहेब, माणसांना जगणं मुष्कील झालंय, तिथे कागदांच काय? अर्ध्या वेळच्या चाकरीचे माणसाला पैसे सुटणार तरी किती, नि त्याच्याकडून अपेक्षा तरी काय करायच्या ?'

त्या अंधाऱ्या माडीवर आणखी मूठभर काळोखाची भर पडली. त्या ऐतिहासिक कागदांच्या भवितव्याकडे आणि अर्धवेळ कारकुनाच्या प्रारब्धाकडे पाठ वळवून रस्त्याला लागलो. एका वळणावर झाडीत एक देऊळवजा वास्तू दिसली.

'इथे नमस्कार करा !' सरकारकून म्हणाले.

'का ?'

'कारण इथ दत्तांची वस्ती आहे.'

'इथे शुकशुकाट का?'

'कारण इथे दत्तांची वस्ती आहे.'

'म्हणजे?'

'दत्त हे फार प्रखर आणि सोवळं दैवत आहे. दत्त कधीही गर्दीगोंधळात नसतात. त्यांची वस्ती अशी एका बाजूला एकांतात असते. दत्तांची उपासना करणाऱ्यालासुद्धा सर्वसंगपरित्याग करून एकटं-एकटं रहावं लागतं. दत्तोपासना संसारीक माणसांसाठी नाही. इथे अंतुबुवा जोशी वस्तीला असायचे. अंतुबुवांचं नाव ऐकलं आहे?'

'आहे.'

अंतुबुवा म्हणजे खुद्द पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांकडून जोरकस ग्वाल्हेरी गायकीचा खानदानी किता गिरवलेले प. अनंतराव जोशी. पन्नास वर्षांपूर्वी त्यांनी गिरगावात पोर्तुगीज चर्चच्या शेजारच्या दांडेकर बिल्डिंगच्या माडीवर 'श्रीदत्तगुरु संगीत सेवा मंडळ' नावाचा गायनवादनाचा वर्ग चालवला होता. पुढे निवृत्त होऊन ते ह्या गावी आले आणि घनघोर तपश्चर्या करून त्यांनी ग्वाल्हेरी गायकीच्या पोटातच खास स्वतःची अशी 'अंतुबुवांची गायकी' म्हणून एका नव्या अनवट अंगाच्या गायकीचं खातं सुरू केलं. सध्या आग्रेवाल्यांकडे झुकलेले पं. गजाननबुवा जोशी हे अंतुबुवांचे चिरंजीव आणि शागिर्द, दोन्हीही!

'सध्या इथे कोण असतं?'

इथे कोण येणार? जो तो आपापल्या संसारात आहे.'

'अंतुबुवांची उपासना कोणी चालवतो का?'

'ती अलबत्या गलबत्यांची कामं नव्हेत.'

देवळात अंधार होता.

'अंतुबुवा इथेच आतल्या बाजूला रहायचे. त्यांचा तंबोरा असेल आत. पहायचाय?' सरकारकुनांनी उत्साहाने विचारलं.

'नाही.'

मुख्य रस्त्याच्या कडेला काळोखाने तुटुंब भरलेला तालीमखाना लागला.

'राजेसाहेब इथे व्यायामाला यायचे. आत येणार'?

'नाही.'

'ती पलीकडे इमारत दिसत्याय नं शाळेसारखी, ते बोर्डिंग आहे. सानेगुरुजी इथेच शिकले.'

'आनंद आहे? पण गावाला वळसे मारण्यात मला आनंद नाही.'

'I am sorry, sir!'

'आपण कुठेतरी उघड्यावर जाऊं या.'

' आनंदाने—आपण उत्तरेला जाऊं या.'

' दक्षिणेला का नको?'

' दक्षिणेला माळावर तमासेवाले उतरले आहेत.'

' त्यांची आपल्याला भीती नाही.'

' त्यांच्या बापालासुद्धा भिण्याचं कारण नाही खरं तर. पण त्यांची धनगरी कुत्री फार तिखट असतात. निष्कारण पाठीमागे लागतात. आणि पाठीमागे लागली तर जीव घेतल्याशिवाय सोडत नाहीत. बरं, इथे कुत्र्याच्या चाव्यावर दवापाण्याचीही सोय नाही. म्हणजे सुई टोचायला थेट सोलापूरपर्यंत यात्रा करावी लागेल.'

आम्ही उत्तरेच्या दिशेने गावाबाहेर पडलो. दोन फर्लांगावर एक जुनाट बुटकी अंधाराने माखलेली वास्तु लागली. तिच्या जुन्या भिंतींना कुबट वास येत होता. सरकारकून म्हणाले,

' हा गिरीपुरी मठ.'

' आता कोण चालवतो?'

' परमेश्वर जाणे बुवा! पण सध्या आत महादेवाची पिंड आहे. लोक मात्र ह्यालासुद्धा दत्तमंदिरच म्हणतात.'

' चमत्कारच आहे! म्हणतात दत्तमंदिर, आत आहे पिंड महादेवाची, नि नाव गिरीपुरीबाबाचा मठ!'

' हो, पण प्रत्यक्षात हा मठ स्थापला म्हणे ज्योतीलिंगबाबा नावाच्या गोसाव्याने! हे गिरीपुरीबाबा कुठले कोण ते हरी जाणे! आत येणार? पण नकोच.'

' का?'

' कारण पाहाण्यासारखी चीज प्रवेशद्वारावरच आहे.'

' कोणती?'

' दाराच्या पट्टीवर रतिक्रीडेची चित्रं आहेत. पाहाणार?'

' पुढच्या वेळी.'

' जशी आपली मर्जी. पण तुम्हाला एक गंमत सांगतो. इथून हाकेच्या अंतरावर ह्या मठाच्या मालकीची ' चावर ' नावाची ओसाड जमीन आहे. तिला कधीही नागर म्हणून कसा तो लागलेला नाही!'

मी क्षणात भारावून गेलो. नांगर न लागलेली अनाघ्रात भूमी अजून ह्या गावात शिल्लक आहे? कुठली संस्कृती इथे नांदत होती? ती Virgin Soil नजरेला पडण्याच्या अद्भुत कल्पनेने माझं मन आरपार पालवून गेलं.

' ह्या चावरचं वैशिष्ट्य असं आहे साहेब की अजूनही तिथे पुराणकाळातल्या फाडग्या मडक्यांचे रंगीत अवशेष दिसतात. चला, आपण काही अवशेष गोळा करू या.'

माळरान तुडवत आम्ही चाललो होतो. सभोवार डोंगरांची पाळ कोमट उन्हात

निश्चल उभी होती. हळूहळू मोठे ढग जमा झाले. सूर्यप्रकाश लुप्त झाला. ढगाळ वातावरणातच. आम्ही 'चावर' जमिनीवर आलो. एक आम्रवृक्ष होता. त्याच्याखाली उभे राहिलो. हीच ती मठाची अनाघ्रात भूमी. सरकारकून म्हणाले,

'आता जशी फुलं वेचतात, तशा खापऱ्या गोळा करायच्या. बहुतेक रांजणाचे काठच असतील. एखाद-दुसरी बांगडीसुद्धा मिळेल. अगदी हळूवार हाताने मातीची ढेपळं दूर करायची. मातीच्या पहिल्या थराच्या खाली पॉटरीचा दुसरा थर लागेल. एक मात्र संभाळा, कुठलाही तुकडा फोडू नका. अभंग, रगीत तुकड्याला महत्त्व आहे.'

मातीची ढेकळं दूर करून आम्ही त्याच्या खालची जमीन तपासू लागलो. भराभर रांजणाचे, मडक्यांचे गाडग्यांचे चित्रविचित्र कांठ आम्हाला मिळू लागले. अनिर्वचनीय अशा मुक्त आनंदाने भिजलेले असे ते क्षण होते, कारण दोन सहस्त्र वर्षांपूर्वीच्या गृहिणींच्या संसाराचे अवशेष माझ्या ओंजळीत आले होते? ह्याच जमिनीच्या तुकड्यांवर उभारलेली आपली आर्यकालीन कुटीर, त्या सुहासिनींनी, होमहवन आणि मृगया हे दोनच पुरुषार्थ गाजवणाऱ्या आपल्या मालकांसाठी आनंदकंद केली असतील. ह्या, त्याच भूमीच्या तुकड्यांवर त्यांची बाळं रांगली असतील, त्यांचे पाळणे हालले असतील. आणि ह्याच भूमीच्या तुकड्यावर संसार करताना सृष्टीची चेष्टिते पाहून, हातावर पोट असणाऱ्या त्या स्त्री-पुरुषांनी मनात दाटलेल्या भितीच्या भावनेतून देवदेवतांच्या अस्तित्त्वाच्या कल्पनेचे बी-बियाणे रुजत टाकले असणार! त्या उगवत्या संस्कृतीच्या गंगोत्रीतलेच जणू काही थेंब ओंजळीत घेऊन मी उभा होतो!

'आपण आता बंगल्यावर परतुया.'

'हो. नंतर मी काम करीन. संध्याकाळी मला कुणी भेटायचं नाही. मी बोलावलं तरच यायचं.'

'जशी आज्ञा.'

जेकबबापूच्या बंगल्यातली काळोखी संध्याकाळ नुसती खायाला आली. ग्रॅहॅम ग्रीनने म्हटलं आहे, निरव शांततेचा आक्रोश असह्य असतो. ते खरं आहे.

म्हातारे दारवान हात जोडून आले. म्हणाले,

'साहेब, ह्या म्हाताऱ्याचं म्हणणं ऐकणार का?'

'बोला.'

'सरकारकुनांची बदली करा.'

'का?'

'फार छळतो. सगळी घरची कामं करून घेतो.'

'दुसरा माणूसही तसंच वागेल.'

'अधिकाऱ्यांनी समजून वागलं पाहिजे.'

'ते स्वतंत्र देशातच शक्य आहे. आपल्याकडे आणखी पन्नास वर्षं जावी लागतील.'

'साहेब, आपला देश स्वतंत्रच आहे. कालच तुम्ही म्हणालात.'

'स्वतंत्र आहे असं म्हणणं, आणि स्वतंत्र असणं ह्यात फरक आहे. अजून एक पिढी खपावी लागेल. तोपर्यंत तुमचं काम होणार नाही.'

'जशी आपली मर्जी!'

'माझ्या मर्जीचा प्रश्न नाही.'

खरोखरच माझ्या मर्जीचा प्रश्न नव्हता. प्रत्येक समाजाचं म्हणून काही संचित असतं. त्या संचिताचा हिशेब आपल्याकडे अजून पुरा व्हायचा आहे.

रात्री राजवाड्यावर बोलावणं होतं. मला टांग मारायची होती. पण सरकारकून म्हणाले,

'काही करा, पण या. माझ्यासाठी कळ सोसा.'

'पण राजाला भेटायचा जुलूम काय म्हणून?'

'कारण तुम्ही निघून गेल्यानंतर आम्हाला इथेच दिवस काढायचे आहेत.'

राजवाड्यावर काळोख होता. फक्त चावडीवर बत्ती भडकत होती. मी गेलो. दारवानाने हटकलं. सरकारकुनांनी त्याच्या कानात काहीतरी सांगितलं. तेव्हा दारवानाने मुजरा केला. पण म्हणाला,

'साहेब, आपली टोपी कुठे आहे?'

'मी टोपी घालीत नाही.'

'मग महाराजांची भेट होणार नाही.'

'फार उत्तम.'

'महाराजांचा हुकूम आहे, की कुणालाही बोडक्याने वर सोडायचं नाही.'

'मग मी येऊन गेलो म्हणून सांगा.'

'थांबा. आमच्याकडे टोप्या आहेत. त्यातली एक घालून जा आणि काम झालं की येताना परत करा.'

'हा काय जुलूम आहे!'

'साहेब, माझ्यासाठी थोडी कळ सोसा.'

वीस, पंचवीस टोप्यांचा जुडगा माझ्या पुढ्यात आला. त्यातली एक सर्वात मोठ्या आकाराची डोळ्यावर येणारी बीन इस्त्रीची सफेद टोपी घालून मी दिवाणखान्यात राजाची वाट पाहात बसलो. दिवाणखान्यात थोडासा काळोखच होता. मी टोपी मुद्दामच आणखी खाली ओढली. तिचे काठ माझ्या कानाखाली आले. समोरचा भाग भुवयांवर आला.

मग उंच, देखण्या व्यक्तिमत्त्वाचा, गोंडस अंगलटीचा, गोरापान राजा झपझप चालत आला. त्याने रेशमी कफनी आणि गांधी टोपी घातली होती. वय पंच-

वीशीच्या आतलं होतं. मलखांबासारखा तो माझ्यासमोर ताठ उभा राहिला. शिसवी लाकडाच्या देव्हाऱ्यात विष्णुची मूर्ती ठेवलेली असावी, तसा तो मला क्षणभर भासला. त्याची कांती मोत्यासारखी होती. ह्या राजबिंड्या तरुणाजवळ मी काय बोलणार ?

'कसं काय ? ठीक आहे ?' मी विचारलं.

राजा नुसता मंद हसला.

'आपण इथे कसा काय वेळ घालवता ?' मी.

'मी विलायतेला असतो.'

'मग इकडे केव्हा आलात ?'

'नेहरूंनी बोलवलं म्हणून नुकताच आलो.'

'काय म्हणतात नेहरू ?'

'म्हणतात, तुम्ही राजकारणात या.'

'तुम्ही काय म्हणालात ?'

'म्हटलं येईन.'

मग राजा खिडकीतून बाहेर काळोखाकडे निरखून बघायला लागला. त्याचं माझ्याकडे लक्ष नाहीसं पाहून मी टोपी आणखीनच डोक्यावर ओढली नि म्हणालो,

'बराय येतो तर मी.'

राजाने प्रत्युत्तर केलं नाही. चांदीच्या समईतल्या ज्योतीसारख्या नजरेने तो माझ्याकडे उभा राहून पाहू लागला.

मी टोपी सावरीत निसटलो. रस्त्यावर ठार काळोख होता. म्हणून उभा राहिलो. पाच मिनिटांनी सरकारकून काळोख दूर करीत आले.

'तुम्ही मागे काय करीत होतात ?' मी विचारलं.

'राजाला मुजरे करावे लागतात. परंपराच आहे ती इथली, त्यासाठी वेळ लागला.'

'पण आता आपण स्वतंत्र झालोत. तुम्ही ह्या परंपरा मोडा.'

'असं कुठे झालंय साहेब ? राजा तो राजाच. त्याचा मान त्याला पोचवलाच पाहिजे. संस्थान खालसा झालं म्हणजे राजाही संपला असं नाही. राजा आहेच. स्वातंत्र्य काय, आज आहे उद्या नाही. पण राजा अमर आहे !'

बंगल्यावर परत आलो. तिथं दारवानाने अंधारातच आनंदाने फेसाळत विचारलं,

'काय साहेब, महाराज खूष झाले ?'

वाटलं, दोन हजार वर्षे वयाच्या ह्या माणसांची हृदयं फोडून त्यात राजसिंहासन नेमकं कुठे मांडून ठेवलंय ते एकदा पाहून घ्यावं. पण तेवढं त्राण उरलेलं नव्हतं. रात्र चढत होती. डोळे मिटत होते. काळोख वाढत होता.

□ □ □

# मी त्या मुलाचा बाप होऊ का?

कानिशाथ घोडे

सकाळचे दहा वाजतात. आता मायाला मोकळीक असते. सकाळची भाऊगर्दी संपलेली असते. वकीलसाहेबांना भेटण्यास आलेले परत गलेले असतात, मुलांनी शाळेची वेळ साधलेली. मॉंटिसरीची बस येऊन छोटया चंदाला घेऊन गेलेली. घर रिकाम. माया, सैंपाकीण आणि काम करत असलेली मोलकरीण, इतकीच घरात वावरत असलेली दिसतात.

त्यावेळी मायाला उसंत मिळते. सकाळची वर्तमानपत्रं, एखादं दुसरं मासिक ह्यात ती रमते. सोफ्यावर पडल्या पडल्या ती रमत वाचत असते. नोकरांवर नजर ठेवणं, मुलांचं क्वचित उण पाहाणं आणि नवऱ्याच्या आवडीनिवडी संभाळणं.

दरवाज्याला असलेली घटी खणाणते. कुणीतरी आलं असल्याचं दिसतं. ती थोडयाशा कंटाळ्यान उठून बाहेर येते.

मायाला वेगळंच काही दिसत. दारात एक गोरीपान तरुणी असते. डोळयात भरण्यासारखी. रेखीव बांध्याची. निटनेटकी वेशभूषा असलेली. डोळयात चमक. चटकन आपुलकी निर्माण होण्यासारखी, रसरसीत देहयष्टीची. माया जवळ जाते.

"कोण पाहिजे ?"

"वकीलसाहेब आहेत ना ?"

"एक तासापूर्वी ते कोर्टात गले ? आत या. उन्हातून आलात. थोडी विश्रांती घ्या !"



ती तिच्याबरोबर आत जाते. दोघीही सोफ्यावर बसतात. मायाला तिच्याबद्दल एक प्रकारचा आदर वाटतो.

मग सरबत आणलं जातं. मायाचं वागणं मोठ्या अस्थेचं असतं. ती बोलण्याचा प्रयत्न करते.

आलेली तरुणी मंगळसूत्र चाचपते. सरळ करते. वरून दिसेल असं करते.

"पुन्हा नाही का येता येणार? पाच नंतर ते भेटतात! काही निरोप? मी सांगू शकेन!"

ती बोलत नसते. पण डोळे भरून आलेले असतात. तोंडावर हाताचे पंजे पसरून ती मुसमुसू लागते.

मायाला काय करावं हे समजत नसतं. ती तिला जवळ घेते. पाठीवरून हात फिरवते, पदरानं डोळे पुसते.

"काय झालं? सांगता येईल का?"

ती गप्पच असते.

"तुमचं नाव ?"

"मिरा देसाई !"

"यजमानांकडून आलात ?"

"नाही !"

"मग ? सांगण्यासारखं नाही का ?"

"मी मोठ्या संकटात आहे ! अडचणीत सापडले आहे !

"वकीलसाहेबानाच सांगण्यासारखं असेल ? तसं असेल तर जाऊ दे ! तुम्ही येऊन गेलात असं मी म्हणेन !"

"तसं नाही. त्यांनीच मला नोटीस दिली आहे. म्हणजे तसं एक पत्र पाठवलं आहे. संसाराचा चिचका चालवला आहे !"

"सरळ सांगता येईल का ?"

"आणखी काय सरळ सांगायचं ! नवऱ्याच्या घरी जाऊ नको असं म्हणतात. मार देऊन बाहेर घालवलं जाईल. कारणं सांगितली नाहीत. पण आपणाला भेटण्याला हरकत नसावी असं म्हणतात !"

"ह्याचा अर्थ ? नवऱ्याचं आणि तुमचं पटत नसतं ? भांडणं झालीत ?"

"मुळीच नाहीत !"

"तसा त्यांचा स्वभाव ? भांडखोर ! घुसमुसळा ! किंवा तुम्ही त्याला आवडत नपता ?"

"तसं कधीच दिसलं नाही ! शांत स्वभाव. अबोल वृत्ती. कधीच भांडणं नाहीत."

"मग असं कसं घडेल ? तुमच्याकडून काही आगळीका होत असतात का ?"

"असं कसं होईल ! माझ्या दोन मासिक पाळ्या चुकल्या आणि ह्या स्थितीत ते मला घटस्फोट घे म्हणतात ! मी काय करावं ?"

"भारीच नवल ! गोरोपान, देखण्या आणि रसरसीत तरुणीचा कुणाला झाला तरी हेवाच वाटायचा. नवरा अरसिक दिसतो !"

ती बोलत नसते. पायाच्या अंगठ्यान ती जमीन दाबण्याचा प्रयत्न करते. मायाला हे सगळंच वेगळं वाटतं. एक बाजू तिला समजली. ह्याला दुसरी बाजू असू शकते, ह्याची तिला जाणीव असते. कुणीही झालं तरी एक बाजू रंगवील. तिला हे समजून घेण्याची उत्सुकता असते. मिराबद्दल तिला आपुलकी वाटू लागली. कसंही करून मोडत असलेला संसार सरळ चालावा आणि त्यासाठी आपण खटपट करावी अशी तिची भावना झाली. मग तिनं तिचे हात दाबले. प्रेमाचा ओलावा दिला. आपली सहानुभूती दाखविली.

"वकीलसाहेबांना मी विचारीन. काही तरी तोड निघेल. अशा गोष्टीत त्यांचा

हातखंडा आहे. शिवाय मला तुमच्याबद्दल आपुलकी वाटते. तुमचं काम हे मी माझंच समजेन. माझी एक चांगली बहीण दुःखात असलेली पाहाणं मला पसंत नसतं !"

ती उठली. तिनं मायाचे पाय धरण्याचा प्रयत्न केला. पण तिनं तिला तसं करू दिलं नाही. तिला जवळ घेतली. पाठीवरून हात फिरविला.

"थांबायचं असलं तर इथं राहा, ते आल्यानंतर मी त्यांना सगळं विचारीन. कसंही झालं तरी उभा असलेला संसार मोडता उपयोगी नाही. अडचणी ह्या येतातच. भांडण ही नेहमीची. असं अधून मधून होत असतं म्हणून कुणी डोक्यात राख घालून घेत नाही. समजून उमजून पडतं घेण्याची एकमेकांनी तयारी ठेवली पाहिजे. मीही पण एक स्त्री आहे. अडचणीं ह्या आल्याच होत्या. गैरसमज हे पसरलेलेच असतात आणि मग संशय अशा गोष्टींचा डोलारा उभारतो. तुम्ही काळजी करू नका. काहीतरी नक्की होईल. मग थांबता ना आमच्या घरी ?"

"नाही ! मला आता थांबता येत नाही. चार दिवसात मी येईन. काहीतरी करा आणि मला जन्माच्या उपकारात ठेवा. मी एक आपली धाकटी बहीण असं समजा. आता मी निघते !" असं म्हणून ती उभी राहिली. काहीशी स्थिर झाला. नमस्कार केला आणि जाताना म्हणाली,

"येते हं !"

मिरा गेली. माया तिच्याकडे पाहात राहिली. दिसण्यात जशी रसरशीत तशंच वागण्यात सुसंस्कृत दिसली. तिला तिच्याबद्दल आस्था वाटली. तिचं अडलेलं गाडं नीट रस्त्यावर यावं असं वाटू लागलं. सबंध दिवस तिच्या डोक्यात हेच विचार चाललेले होते. ◻ ◻

जेवणखाण आटोपल्यावर वकीलसाहेब आपल्या अभ्यासिकेत बसतात. दुसऱ्या दिवसाच्या कामाची जुळणी होत असते. कधी कधी बऱ्याच उशिरा ते झोपायला जात असतात. कुणालाच त्यांचा त्रास होत नसतो. ह्यावेळी माया आणि मुलं बिछान्यात पडलेली असतात. पण आज माया निराळी झाली होती. सकाळपासून ती मिरासंबंधी सारखा विचार करीत होती.

माया येऊन शेजारच्या खुर्चीवर बसली. नवऱ्यानं एकदा तिच्याकडे पाहिलं. कधीच आत न डोकावणारी माया आज आत येऊन बसली होती. त्यांनी तिच्याकडे आणखी एकदा पाहिलं.

"माया, आज तू इकडे ? फिर्याद वगैरे दाखवायाची आहे का ?"

"हो ! तुमच्याविरुद्ध ! मिरा देसाईंना तुम्ही नोटिस म्हणजे धमकीचं पत्र पाठवलं आहे ना ;"

"मग ?"

"आज ती भेटण्यासाठी आली होती. तिनं मला सगळं सांगितलं. तिचा संसा-

राचा विचका झालेला आहे. शिवाय ती भरल्या शरीराची आहे असं म्हणत होती।"

"आणखी काय म्हणाली ?"

"मला तिचं दुःख पाहवलं नाही. सुसंस्कृत आणि रसरसीत देहाच्या एका तरुणीवर असे प्रसग यऊ नयेत. नुसते संशय असावेत. तुम्ही काहीतरी करून तिचा ससार मोड देऊ नका!"

"अरसं! अस्सं! एकंदरीत तू तिची वकिली घेतलीस वाटतं. मग इथंच तिचा निकाल लागू शकेल। नवऱ्यावर ती आग पाखडीत नव्हतो ?"

"नाही! तो चांगला असल्याचं म्हणत होती."

म्हणूनच असं घडून आलं. निराळ्या वृत्तींचा असता तर घरात धुसमुसळेपणा आला असता. वादळं उठली असती. मुलंबाळं झाली असती आणि त्यात ती गुरफटून राहिली असती. पण तसं व्हावयाचं नव्हतं. तू एक बाजू ऐकलीस. आता दुसरी बाजू समजून घे. तू स्त्री आहेस! तुला तो अभिमान आहे. अवश्य असावा. पण माणसाला मर्यादा, सीमा म्हणून असतात आणि त्या ओलांडण्याचा प्रयत्न झाल्यास, त्याचे बरे वाईट परिणाम भोगण्यास त्यानं तयार असलं पाहिजे।"

वकीलसाहेब उठून उभे राहिले. त्यांनी कपाटातून एक फाईल काढली. मायाच्या हातात देत ते तिला म्हणाले, "हे सगळं वाचून काढ. विचार कर! आणि मग तू म्हणशील त्याप्रमाणं मी करण्याचा प्रयत्न करीन!"

माया आत गेली. बिछान्याजवळचा दिवा लावला आणि मग हळूहळू ती वाचावयास लागली. तिला केव्हा झोप लागली हे समजलंच नाही.

मिरेचा नवरा जयंत देसाई तिच्या स्वप्नात आला होता आणि तो आपलं सगळं आयुष्य सांगून गेला.

एक साधा, शांत आणि अबोल माणूस. घरी तो आणि वयस्क आई. स्वभावानं मिळतं जुळतं घेणारा. हट्ट हा कधीच नाही. शिक्षणही फार कमी. पण व्यवहारात चोख आणि वागण्यात गोड. बाजारात चांगल्या स्थितीत चालणारं कपड्याचं दुकान.

लग्नाचं वय होऊन दिवस अधिक होत होते. आईला काळजी होती. तो शांत होता. ती खटपट करी. कुंडलीत मंगळाचा प्रभाव फार मोठा. त्यामुळं तशी जुळणारी कुंडली क्वचित मिळे. लग्नाशिवाय भराभर दिवस जात होते.

कुंडलीच्या जोरावर मिरा त्यांच्या घरात आली. तिलाही तसाच मंगळ होता. चांगली गोरीपान, साधारण शिकलेली, पण हुंडा न पेलणारी मुलगी असल्यानं जयंताशी तिचं लग्न झालं.

खरं म्हटलं म्हणजे गोऱ्यापान मिरेला तसाच सुरेख आणि देखणा नवरा मिळावयास पाहिजे होता. पण व्यवहारात सावळ्या आणि साधारण देखण्या तरुणाबरोबर तिला संसार करावा लागला.

तिला हे मनातून नको होतं. कादंबऱ्या आणि सिनेमा पाहून तिला एक दृष्टी आली होती. आपला नवरा कसा असावा हे तिनं ठरवलं होतं. शेजारी कामतांचं

घर होतं. त्यांच्या विजयची तिला भारी ओढ. तो तिच्याचसारखा देखणा आणि गोरापान होता. तरुणींवर वजन पाडण्यासारखा. तो तिला फार आवडे, शिवाय थोडासा समवयस्क. लग्नापूर्वी त्यांच्या गाठीभेटी होत. एकमेकांच्या घरी जात येत. विजयचं लग्न होऊन गेलं, पण जुनेपणा अद्याप निवळला नव्हता. केव्हा केव्हा ती एकांतात पुष्कळ वेळ घालवीत.

मिरेचं लग्न झालं. पण तिच्या वागण्यात फरक पडला नाही. उलट ती नवऱ्याचा मनातून द्वेष करू लागली. चेहऱ्यावर गोडवा आणायचा. शब्दात साखर पेरायची. वागण्यात सफाई असायची. ती कशी आहे हे जयंताला कधीच समजलं नाही.

"इतकी वर्षं आसूसलेलं जयंताचं शरीर मिरेला जवळ घेण्यास उत्सुक होतं. तिनं आपल्यासाठी पुष्कळ करावं असं वाटे. त्यानं तिला जवळ घेतली. तिनंही पण गळ्यात मिठी घातली. आणि हळूहळू सोडवीत ती दूर झाली.

"डोकं दुखतं. बरं वाटत नाही. आता केव्हातरी!"

जयंताचा निरुपाय झाला. मन खट्टू झालं. त्यानं ते दाखवलं नाही. वेळ मारून नेली. मिरा घरात आहे. दोन दिवस तिला विश्रांती पाहिजे. पुढं ती आपलीच आहे.

पण ती त्याची नव्हती हे त्याला कळावयाचं होतं. तिच्या गोड वागण्याचं आणि बोलण्यानं तो भारून जात होता. तिच्यापाशी हेच नाही तर सौंदर्यही होतं. त्या धुंदीनं तो भारून गेला होता.

ती पंधरा दिवस राहिली. मग ती वडिलांबरोबर माहेरी गेली. जयंतही तिच्या बरोबर गेला. आणि दुसऱ्या दिवशी तो घरी परतला.

पण जयंताला जे सुख पाहिजे होतं ते त्याला कधीच मिळालं नाही. मिरा अनेक अडचणी दाखवी. खरी खोटी कारणं सांगे. त्या दिवशी परत जाताना ती म्हणाली.

"माझी प्रकृती बरी नसते. आमच्या नेहमीच्या डॉक्टराना दाखवीन म्हणते. पंधरा दिवसात मी येईन!"

जयंताला नाही म्हणता आलं नाही. ती माहेरी राहिली. विजयचा सहवास तिला आवडू लागला. वेळी अवेळी तो तिच्या घरी येऊन चकाट्या पिटीत राही.

आईला हे आवडत नव्हतं. पण मिराचं म्हणणं अगदी उलट. ती चढाईच्या धोरणानं वागे. लग्न झालेल्या मुलीनं असं करू नये, असं म्हणताच ती अंगावर धावे. मग तितकंच राही.

पंधरा दिवस संपण्यापूर्वी ती घरी आली. फार आनंदानं वागू लागली. जयंताला हे पाहून आनंद झाला. आता सगळं सुरळीत होईल असं त्याला वाटू लागलं.

पण तो त्याचा भ्रम होता. पूर्वीचीच आवृत्ती आता होत होती. असं का होते याचं त्याच्यापाशी उत्तर नव्हतं. आणि मिराला तसं विचारल्यास ती गोड बोलण्यानं त्याला भारून टाकी. त्याच्या शांत आणि अबोल स्वभावाला हा एक प्रश्न होता.

आता आठ दिवस झाले. ती कुणाला न सांगता माहेरी निघून गेली. झोपण्याच्या खोलीत असलेल्या टेबलावर एक चिठ्ठी ठेवली होती.

" आई आजारी असल्याचा निरोप आल्यानं मी तिकडे जात आहे. लवकर येईन."

जयंताला तिच्या वागण्याचा धक्का बसला. घरात आई होती. दुपारी तो जेवण्यास येणार होता. पण कुणाचीही पर्वा नसल्यासारखी ती वागली. आई मुलाला दुःख झालं. जगात न बोलण्यासारखं दुःख. तेही त्यानी गिळलं.

चार दिवसात ती परत आली. काहीच न घडल्यासारखं तिनं दाखवलं. आणि जयंताशी वागताना ती पूर्वीचीच राहिली.

आता ती अधिक धीट झाली. निमित्त असो किंवा नसो, ती बोटभर चिठ्ठी ठेऊन, माहेरी निघून चार दिवस राही आणि मग परते.

मांजर डोळे मिटून दूध पितं. त्याला वाटतं की, कुणी आपणाला पाहात नाही. मिराही तसच समजे. पुन्हा पुन्हा ती माहेरी का जाते, हे जगाला समजू लागलं, लोक कुजबूजू लागले. जयंतालाही समजलं

आता सगळ्या गोष्टींची सीमा झाली. मिरा माहेरी जाऊन एक दिवस झाला होता. जयंत घरी होता. तो मुद्दामच घरी राहिला. खाटखाली तिची ट्रंक होती. किल्ली अर्थात तिने बरोबर घेतली होती. तो तिची अतिशय काळजी घेई. त्यात काहीतरी निराळं असावं असं त्याला वाटलं. त्यानं कुलूप तोडून टाकलं.

आत सगळं रहस्य भरलं होतं. जवळजवळ पन्नास पत्रं व्यवस्थित लावून ठेवली होती. सोबत एक फोटो होता. तो विजयचा होता. तो तिला वारंवार पत्र पाठवून बोलवत होता. आणि शेवटच्या पत्रात तो तिला चुकलेल्या पाळीवर औषध घेण्यास बोलवीत होता.

आता सगळं स्वच्छ झालं. जयंताशी ती अशी का वागत होती ह्याची कारणं समजली. आता त्याचं रक्त तापलं. तिला घरात घेऊ नये असं त्यान ठरवलं. आणि फार गवगवा न होता काय करावं, ह्यासाठी त्यानं वकिलाचं घर गाठलं.

मायेच्या स्वप्नात जयंत उभा राहून विचारीत होता. " अनैतिक संबंधानं जन्मलेल्या मुलाचा बाप मी होऊ का ?"

मायाच्या अंगाला दरदरून घाम फुटला. ती पूर्ण जागी झाली मिरा जयंताचा संसार तिच्यापुढं उभा राहिला. तिनं दिवा लावला. आणि मग नवऱ्याकडून घेतलेली फाईल व्यवस्थितपणं कपाटात ठेवली.

मिरा येऊन गेल्यास आठ दहा दिवस झाले होते. चारपाच दिवसात ती येईल असं वाटत होते. ती आली नाही. पण एक दिवस जयंताकडून तार आली.

" मिरेनं नदीत उडी घेऊन जीव दिला. आज तिसरा दिवस."

□ □ □

निशिकांत मिरजकर

# पुस्तके

## शिदोरी

### एक फसलेली कलाकृती

'शिदोरी ' ही एक फसलेली कादंबरी आहे, असे माझे मत झाले आहे. तसा या कादंबरीचा बोलबाला पुष्कळच झाला. (आणि पिटक्यांचे अन्य लेखन मला बरेच आवडले असल्याने मीही ती खूप उत्सुकतेने वाचली.) या कादंबरीचा आत्मा 'गोमा 'मध्ये आहे, की तो कारखान्याच्या वातावरणातील विशिष्ट जीवनदर्शनात आहे, लेखकाला हा आत्मा कुठे नि कसा सापडला आहे, त्यामुळे कादंबरीचे वाङ्मयीन मूल्य कसे नि कितपत उंचावले आहे, यावद्दल पुष्कळच चर्चा झाल्या. मला त्यापैकी कुठलीच बाजू पूर्णपणे पटली नाही. ही कादंबरी फसली आहे असे मी म्हणतो, ते अर्थातच वाङ्मयीन मूल्यांच्या चिकित्सेतूनच. पण कादंबरीचा आत्मा कुठे नि कसा आहे ही माझ्या चिकित्सेची दिशा नाही.

कादंबरीच्या वाङ्मयीन मूल्यांची निश्चिती आपण कोणत्या स्वरुपात करणार आहोत हे थोडेसे पाहिले पाहिजे. कादंबरी ही मुळातच एक बहुकेंद्री कला आहे. लेखकाचा जीवनानुभव, कथानकाची सुसूत्रता, पात्रांचे स्वभावदर्शन, समस्या, त्यांची हाताळणी, हे आणि यासारखेच कितीतरी परिघ कादंबरीमध्ये विविध केंद्राभोवती गरगरत राहतात. या परिघाची परिवर्तुळे लेखकाची अनुभवव्याप्ती आणि आस्वादकाची ग्रहणशक्ती अशा दुहेरी त्रिज्यांवर तोलली जातात. त्यामुळे यांतील पौर्वापर्य ठरविणे काहीसे जिकिरीचे असते. कधी एखाद्याच सर्वसमावेशक वर्तुळात ही सर्व मूल्यकेंद्रे सामावलेली असतील, तर कधी परस्परांच्या संघटित रचनेतून एखादी विशेषाकृती रेखली जात असेल. लेखकाच्या दृष्टीने त्यातल्या एखाद्या अथवा अनेक भागांना किंवा त्यांच्या परस्परसापेक्ष संश्लेषणाला त्या त्या ठिकाणी महत्त्व असू शकेल; त्याच्या कादंबरीच्या रचनेच्या विवक्षित पद्धतीचा उगम त्याच्या या महत्त्व कल्पनेत असू शकेल. पण आस्वादकापुरते बोलायचे झाले तर कादंबरीच्या या विविध मूल्यकेंद्रांची रचनाकृती त्याला सुसंगत आणि तालबद्ध वाटली पाहिजे हे एक, आणि दुसरे म्हणजे या सगळ्या परिवर्तुळांच्या बाह्यांतर कक्षा एकसंधपणे रेखल्या गेल्या पाहिजेत. कादंबरीतील अनुभवाच्या मांडणीतील सुसंबद्धता आणि

त्या अनुभवाच्या तीव्रतेची व कलांतर्गत खरेपणाची प्रतीती या दोन्हींचा समावेश यामध्ये होतो.

'शिदोरी' या कादंबरीतून एका वेगळ्या जीवनाच्या अनुभवाचा आलेख मांडण्याचा प्रयत्न पिटके यांनी केला आहे. 'आलेख' असे मुद्दाम म्हणण्यास कारण असे की या अनुभवाच्या प्रवासाला एक सूत्र आहे, गती आहे. स्पष्ट, रेखीव, स्थिर चित्राच्या स्वरुपाचा हा अनुभव नाही. एका नवेपणाने या अनुभवाच्या अभिव्यक्तीला प्रारंभ होतो आणि पाकळीमागून पाकळी उलगडत जाऊन त्याचे बारकावे हळूहळू स्पष्ट होऊ लागतात. कारखान्यामधील नव्याने नोकरी करावयास आलेला वासू हा या प्रवासाचे माध्यम म्हणून लेखकाने वापरला आहे. एका तऱ्हेने हे अनुभवाचा शोध घेणे आहे. वासू या वातावरणात नवा आहे. बऱ्याचशा पूर्वगृहीत वृत्तीने व काहीशा स्वच्छ मनाने त्याचे मन निरीक्षण करते आहे. त्यामुळे हा आलेखातला प्रवास अत्यंत स्वाभाविक रीतीने उमटत चालला आहे, अधिकाधिक गडद बनतो आहे. अर्थात वासूच्या स्वतःच्या काही पूवकल्पना, त्याच्या अनुभवाची शिदोरी ही या नव्या प्रवासामध्ये त्याच्याबरोबर आहेच. पण ती या ताज्या अनुभवाचे स्वरूप विकृत न करता विशिष्ट आकारात त्यांना पकडून ठेवायला मात्र कारणीभूत होते.

आपल्या भावाकडे नोकरीसाठी येऊन राहिलेल्या या हळव्या मनाच्या तरुणाचे एक वेगळे जीवन इथे सुरू होते. प्रारंभीची दादांशी झालेली फटकळ मुलाखत आणि बर्वेसाहेबांनी वासूची केलेली व्यवस्था इथूनच हे वेगळेपण सुरू होते. त्या कोऱ्या मनावर एकदम दोन विरोधी चित्रे उमटविली जातात. आणि नंतर अकस्मात् पण अगदी नकळत हा आलेख गतीमान होऊ लागतो. अर्थात केवळ गती हे या अनुभवशोधनाचे वैशिष्ट्य कधीच राहत नाही. किंबहुना अगदी न जाणवता वेगाने पुढे सरसावणारी गती या कादंबरीला लाभवून देण्यात पिटके खरोखरीच यशस्वी झाले आहेत. ही गती नेहमीच कथानकाच्या विकासाची असते असेही नाही. वासूचे निरीक्षण आणि त्या निरीक्षण क्षेत्रातील घटना यांची अशी काही बेमालूम गुंफण घातली जाते की त्या निरीक्षणाची सखोलता आणि त्यातून अनुभवाचा गडदपणा चित्रित होत असतानाच कथानकही पुढे पुढे सरकत राहते.

त्या कारखान्यातील परिसरातील एकंदर जीवनाला आलेला साचेबंदपणा, अतिशय सामान्य पातळीवर वावरणारी साधीसुधी एकसुरी पण जिवंत माणसे, त्यांचे क्षुद्र रागलोभ आणि हर्षामर्षाचे पेचप्रसंग, ठराविक मर्यादांतीलच परंतु त्या जीवनाच्या संदर्भात महत्त्वाच्या वाटणाऱ्या नाट्यमय घटना या सगळ्या अतिशय वास्तव आणि कुठेही ढोबळ भडकपणाचा आश्रय न करणारे असे मर्मग्राही चित्रण लेखकाने केले आहे. शिवाय महत्त्वाचे असे की इथे एक वासू घडतो आहे. केवळ किलकिल्या डोळ्यांनी पाहणारा वासू त्या जगाची ओळख करून घेतो आहे. हळूहळू

त्या जगामध्ये त्याचे स्वतःचे असे स्थान प्राप्त करून घेतो आहे. इतरांच्या दृष्टीने ते स्थान काहीसा हेवा करण्यासारखे महत्त्वाचे आहे. पण स्वतः वासूला मात्र त्यात थोडासा आनंद असला तरी सफलतेची पूर्णता लाभत नाही. आत कुठेतरी हा वासू अजून कुतूहलाच्या, अलिप्ततेच्या, 'विस्मयाच्या नजरेने, स्वतःला गुरफटून टाकणाऱ्या भोवतालच्या जगाकडे (आणि स्वतःकडेही) पाहतो आहे. त्या जीवनात तो जास्त जास्त गुंतत चालला आहे. पण त्याची काहीशी शोधक अलिप्त वृत्ती नाहीशी होऊ शकत नाही. आजूबाजूच्या माणसांचे विक्षिप्त आणि विलक्षण नमुने तो त्यामुळेच थंड कुतूहलाने टिपू शकतो. सगळ्या नाट्यप्रसंगात आणि प्राणसंदर्भात भाग घेऊनसुद्धा त्याविषयी काहीशा वेगळेपणाने तो विचार करू शकतो. कारखान्याच्या आणि कॉलनीच्या वातावरणात वासूभोवती हळूहळू माणसे, घटना आणि छोटेमोठे संघर्ष यांच्या आकृती गुंफत जातात. कादंबरीच्या गतीची दिशा एकमार्गी, पण वास्तवाच्या दृष्टीने पक्की राहते.

कादंबरीत आणि वासूच्या जीवनात पिग्मीची बायको शोभा येते आणि वरील सर्व पार्श्वभूमीवर कादंबरीच्या आकृतिबंधनाविषयी काही अपेक्षा निर्माण होतात. वासू आणि शोभा यांचा परिचय वाढत जातो, मनाविद्धरु पिग्मीशी लग्न झालेली शोभा परिचयवृद्धीमुळे आणि भोवतालच्या कुजक्या रुक्ष वातावरणात एकटा वासूच सुसंस्कृत तरुण असल्यामुळे त्याच्या अधिक निकट येते, परस्परांत काही भावना निर्माण होतात, भोवतालच्या जगाकडून त्या भावनांचे वाभाडे निघतात, पिग्मीचे वासूशी भांडण होते, आणि वासू नोकरीचा राजीनामा देऊन जायला निघतो. अगदी सर्वसामान्य ठोकताळ्याप्रमाणे कथा घडत जाते. कादंबरीच्या पूर्वार्धात सर्वस्वी वेगळ्या वातावरणाची पार्श्वभूमी आणि नवखेपणाकडून प्रतिष्ठितपणाकडे झालेला वासूचा, अनुभव धांडोळणारा प्रवास जशी सतत एक नावीन्याची पकड कादंबरीवर ठेवतो, तसे उत्तरार्धात होत नाही. उत्तरार्धात ही कादंबरी धड वासूच्या अनुभव घेण्याच्या वेगळेपणाचे प्रत्ययकारी दर्शन घडवत नाही, धड वासू शोभाच्या अनोख्या भावनांवर स्थिरकेंद्र होत नाही, की धड सगळ्या घटकांना पेलून धरणारा विशाल संश्लेषणात्मक आवाका धारण करीत नाही. कादंबरीच्या पूर्वार्धात तिने दिलेला प्रत्यय रोकडेपणाचा आहे, वास्तवातून घेतलेल्या अनुभवाकृतीचा आहे, विविध संदर्भांत हळूहळू इच्छेअनिच्छेने गुंतत जाणाऱ्या अलिप्तपणाचा आहे. उत्तरार्धात हे अवधान सुटून कादंबरीची नुसतीच खिचडी बनलेली आहे. तीही खमंग खिचडी नाही.

या कादंबरीच्या आकृतीची एकसंधता ढळली आहे; हा माझ्या तिच्यावरचा मुख्य आक्षेप आहे. ती विस्कळीत झालेली आहे. कोणी म्हणेल, यातला अनुभवच विस्कळीत स्वरुपाचा आहे, म्हणून कादंबरीची आकृती तशी झालेली आहे. पण

पृष्ठ ५८ वर

# दुखण्याची माया आणि बोटांची किमया

बोटांच्या किमयेने दुःख दूर करणाऱ्या डॉ. केर्स्टेनला त्या यमदरबारातही एक वेगळाच ' रोल ' मिळाला..."

**जिप्सी मधुकान्त**

जाणारा येणारा त्या इमारतीसमोरून बिचकून, सावधगिरीने चालत असे. केव्हा एकदा इमारत ओलांडतो असे होई. भक्कम, करडी आणि स्वस्तिक ध्वज फडकत असलेली ती इमारत युद्धपूर्व काळातील बर्लिनमधल्या इमारतींपेक्षा वेगळी नव्हती. नजरेत भरायचे ते तिचे अवाढव्य रूप, काहीसे कळकटपण आणि यंत्रासारखे अष्टौप्रहर सज्ज असलेले शस्त्रधारी संत्री ! जर्मनीतल्या सर्वात भयकर माणसाचे–एसएस–शुल्झस्टाफ्फेल–गेस्टापोच्या प्रमुखाचे – हाईन्रीश हिमलरचे ते कार्यालय होते !

१९३९ च्या मार्चमधल्या एका दुपारी एक शानदार कार या पत्त्यावर येऊन उभी राहिली. त्यातून एक चाळीसेक वयाची, काहीशी स्थूल वाटणारी असामी उतरली. त्या इमारतीच्या दराऱ्याकडे लक्ष न देता त्या गृहस्थाने राईशफ्यूरर हिमलरची भेट मागितली. (अत्यंत कर्तबगार अशा निवडक सहकाऱ्यांना हिटलरने राईशफ्यूरर हा किताब दिला होता.) ◘

' एसएस च्या कर्नलचा हुद्दा मी तुला बहाल करतो, आत्ताच्या आत्ता...कुठल्याही औषधाचा इतका गुण आजवर आला नाही–इतक्या थोड्या वेळात; माझा विश्वासच बसत नाही...बोल, तू कायम माझ्याजवळच रहावेस...'

त्या इमारतीत शिरलेल्या एखाद्या विदेशी इसमावर इतक्या सन्मानाचा वर्षाव होणे हे कुणाच्याही कल्पनेत शक्य नव्हते !

मघाशी उतरलेल्या गृहस्थाची वर्दी संत्र्याने आता दिली. ताबडतोब एका गण-वेशधारी ऑफिसरने येऊन त्याला कडक सलाम ठोकला. 'हाएल हिटलर' करीत हस्तांदोलन केले. गुबगुबीत गालाच्या त्या गृहस्थाने हॅट काढून विनयाने त्याचा स्वीकार केला. आपल्या मागोमाग येण्याचा संकेत करीत त्या ऑफिसरने त्याला आत नेले. त्यांच्या मागे दरवाजा बंद झाला. जबरदस्त वजनदार असामी आहे, हे संत्र्यांनी ताडले. तेथे येणाऱ्या इतर ऑफिसर गुप्तहेर, खबरे इ. हून त्याचे सारेच वेगळे होते आणि त्याच्याही चेहऱ्यावर या वातावरणाचा दबदबा नव्हता की तिट-कारा नव्हता. एकदम अपरिचित असा त्याचा नूर होता.

शस्त्रसज्ज सैनिकांचे पहारे ओलांडून ही दुक्कल पुढे सरली. एका दालनातल्या दरवाजावर त्या ऑफिसरने टकटक करण्याआधीच आतून खुद्द हिमलरने दार उघ-डून त्यांचे स्वागत केले ! एस एस जनरल गणवेश त्याच्या अंगावर होता. चष्म्या-आडचे त्याचे डोळे गडद घारे होते. मेणासारखे गाल. रुबाबदार हाताने त्याने या नवख्या पाहुण्याचा हात धरून आत नेलें.

"थँक यू डॉक्टर : तुम्ही आलात, खूप बरे झाले. बरेच ऐकलय मी तुमच्याबद्दल. हे माझे पोटाचे दुखणे धड मला बसू देत नाही, फिरू देत नाही. आता चालवा तुमची किमया आणि करा मला मुक्त." हिमलरचा चेहरा बोलताना अधिकच त्रासला होता. "येथल्या एकाही डॉक्टरची दवादारू मला लागू झाली नाही. तुम्ही अशा केसेसवर विजय मिळवला अशी मला खात्री पटवून देण्यात आली आहे. इत-रांनी हात टेकले. माझ्याबाबतीत काही करता येईल का तुम्हाला ?"

## "खूप दुःख होते नाही ?"

काहीही न बोलता डॉ. फेलिक्स केर्स्टेनने त्याच्या चेहऱ्याचे निरीक्षण केले. जर्मनीतल्या हजारो लोकांची पाचावर धारण बसवणाऱ्या, जिवंतपणी नरकाची वाट दाखवणाऱ्या कर्तुमकर्तुम पोलादी माणूस गाय बनल्यासारखा त्याच्या समोर बसला होता...

त्या उग्र चेहऱ्यावरही वेदना दडलेली डॉ. केर्स्टेनला आढळली. त्याने खोलीत नजर टाकली. ऐसपैस आणि शानदार व्यवस्था होती. काही खुर्च्या, एक लांब दिवाणही होता. "हेर राईशफ्यूरर, कृपा करून पट्टा ढिला करून येथे जरा पाठी-वर आडवे होता का ?" त्याने विनंती केली.

हिमलरने त्वरित ती मान्य केली. आपली खुर्ची जवळ ओढून डॉ. केर्स्टेनने आपली लांबसडक मांसल बोटे त्याच्या पोटावर फिरवली. त्यासरशी केर्स्टेनच्या चेहऱ्यावर विस्मय उमटला. त्याने बुद्धासारखे डोळे मिटून घेतले. हिमलरचा घसा, छाती, हृदय, पोट यावरून बोटे फिरवत काही निश्चित जागा टिपण्याचा प्रयत्न करत होता. काही ठिकाणी ती बोटे दबत, काहीतरी शोधल्या ऐकल्यासारखे करीत...

एकाएकी हिमलरने किंचाळी मारली. त्या मऊशार बोटांनी एका जागी असे काही सहज दाबले की त्यात अग्निवेदना जणू हिमलरला अनुभवली. " वा : छान, जरा धीर धरा " केर्स्टेनने म्हटले. हळुवारपणे आणखी काही ' स्पॉटस् ' सापडले. ओठ गच्च आवळत हिमलर कण्हत होता. भुवयांपाशी घाम निथळला...

" खूप दुःख होते नाही ?"–केर्स्टेन.

" भयंकरच."–हिमलर.

आपल्या वाकबगार बोटांनी केर्स्टेनने त्या पेशंटच्या पोटातील आतडी पकडून आवळली. क्षणोक्षणी हिमलरचा प्राण बाहेर पडू पाहत होता...बऱ्याच वेळाने मग केर्स्टेनने ही झटापट थांबवली. " आता कसे वाटते ?"

अंग झटकत हिमलर उभा राहिला. हालचाल केली. पण ती वेदना काही उसळली नाही. एकदम हलके वाटले.

एकाही औषधाचा असा दिव्य परिणाम झाला नव्हता. त्या देशात त्याने एस. एस.चे कर्नलपद केर्स्टेनला देऊ केले होते...त्या नवख्या आसामीला.

## केव्हाही यायला मुभा

या अकस्मात सन्मानाने केर्स्टेन गोंधळून, अवघडून गेला. म्हणाला, " हे कसे शक्य आहे. मी हॉलंडचा माणूस. तेथें माझी मुलंबाळं आहेत. धंदा आहे. मुख्य म्हणजें अनेक पेशंट्स वाट पहात असतात. या सन्मानामुळे मी कृतज्ञ आहे. पण केवळ मनातून. बरे, तुम्हाला गरज लागलीच तर येईन पुन्हा. आणखी दोन आठवडे मी येथें बर्लिनलाच आहे. तेथें काही पेशंटस्ना पहायचे."

" मलाही तुमचा पेशंट माना. डॉक्टर तुम्ही रोज या...मी भीक मागतो..." असे म्हणत हिमलरने टेबलावरची बझर दाबली. एक अधिकारी आत आला. सलाम ठोकला. हिमलरने त्याला आज्ञा केली, " हे डॉक्टर केर्स्टेन. यांना केव्हाही येथे यायला मुभा आहे. प्रत्येकाला ही आज्ञा कळवा."

नंतरचे दोन आठवडे नं. ८, प्रिन्स आल्बर्ट स्ट्रीटवर डॉक्टरांची हजेरी रोज सकाळी रुजू झाली. ही कामगिरी काही खुषीने केर्स्टेनने स्वीकारली नव्हती. त्याच्या जुन्या धनिक पेशंटस्पैकी, ऑगस्ट दीएन या उद्योगपतीने १९३८ मध्ये हिमलरला ' ट्रीट ' करण्याची गळ घातली होती. पोटॅश उद्योगाचे हिमलर राष्ट्रीकरण करणार होता. त्यात पहिले लक्ष्य दिएन ! ' निदान माझ्यासाठी तरी या ' म्हणून दिएनने अगदी पदर पसरला होता...

आणखी कित्येक अभाग्यांच्या नशिबी नरकजन्य कान्सेनट्रेशन कँपची दुर्दशा येणार होती हिमलरच्या तंदुरुस्तीने !

खरे पाहता फेलिक्स केर्स्टेन हा काही डॉक्टर नव्हता. निव्वळ मसाजिस्ट. पण त्या निव्वळपणा पलीकडे त्याच्या हातात काही विलक्षण गुण होते. इस्टोनियात १८९८ मध्ये त्याचा जन्म झाला. पहिल्या महायुद्धानंतर त्याने फिनिश नागरिकत्व

पत्करले. हेल्सिकी येथे मसाजचा अभ्यास केला. तेथे या पद्धतीची प्राचीन परंपरा. जाणकारही अनेक. डॉ. कोलान्देर या विख्यात तज्ञाला केर्स्टेनचे अभिजात गुण उमजले आणि तरुण पोराला त्याने आपला गंडा बांधला. २ वर्षानंतर अधिक अनुभवासाठी तो बर्लिनला आला. तेथे डॉ. को या चिनी डॉक्टरला त्याच्या हुषारीचा प्रत्यय आला. तोही तिबेटी पद्धतीचा तज्ञ होता- त्याने केर्स्टेनला म्हटले, "पोरा, खरे तर तुला ओ का ठो कळत नाही! पण मी तुला तयार करतो बघ." या लामा डॉक्टरपाशी केर्स्टेनने तीन वर्षे घालवली. त्याला मदत केली. या किमयेतली गुणकारी त्याने अवगत केली. पेशंटच्या किचाळण्याकडे लक्ष न देता आधी रोगाचे स्वरूप नक्की करणे, ही डॉ. कोची पहिली शिकवण. केवळ बोटाने चाचपून पेशींची, नसांची अवस्था तो जाणत असे. १९२५ मध्ये तिबेटला जाण्यापूर्वी कोने त्याला पुरता तयार केला. आपला धंदा त्याच्यावर सोपवला होता. त्यानंतर केर्स्टेनची अवघी दशाच बदलली. युरोपातल्या मोठमोठ्या शहरातून त्याला बोलवणी आली. त्याचे कौटुंबिक जीवनही समृद्ध–संपन्न होते. त्याच्या लग्नाच्या वेळी हिटलरने ऑस्ट्रियावर हल्ला केला होता. त्याच्या पहिल्या मुलाचा जन्म झाला तेव्हा हिटलरने झेकोस्लोव्हाकियाचा लचका तोडला.

पण केर्स्टेनने या साऱ्याच घटनांकडे डोळे मिटून पाहिले. आपला धंदा, कुटुंब, सुख या पलीकडे त्याने राजकारण पाहिले नव्हते.

हिमलरच्या दृष्टीने ते दिवस बिकट जबाबदारीचे. गुप्तहेर, सैनिक, खबर यांचाच त्याच्याभोवती सुळसुळाट होता. अतिशय दक्ष रहावे लागे. डॉ. केर्स्टेनच्या किमयेने त्याला आराम पडला होता. दोन आठवडे केर्स्टेनने त्यांच्यावर प्रयोग केले. या काळात त्याचा हिमलरशी संवादही चाले. हिमलर स्वतःच्या असाध्य आजाराबद्दल बोले. जर्मनीच्या सार्वभौम सत्तेबद्दल, विजयाच्या धुंदीबद्दल, एसएसबद्दल तो नितांत गौरवाने उल्लेख करी. हिटलरचा विषय आला म्हणजे खंडच नसे.

पण केर्स्टेन नुसते ऐकत असे. हिमलरकडे केवळ एक पेशंट म्हणूनच तो पहात असे. एके दिवशी, हिमलरने सांगितले–" लौकरच युद्ध सुरू होईल... "

" युद्ध ? " उसळून केर्स्टेनने म्हटले, " बापरे, देवा...का म्हणून ?"

हिमलरही उसळला, " युद्ध होईलच, कारण हिटलरला ते हवे आहे! युद्धाने माणसं अधिक समर्थ निपजतात."

मग जरासा शांत होऊन खाली रेटत त्याने म्हटले, " काही असो, ते छोटेसे पण विजयशाली युद्ध असेल. दुबळ्या शक्तींना शरण आण हुकुमशाहीने. "

ते बोलणे तेवढ्यावरच थांबले.

हिमलरने केर्स्टेनला आदरातिथ्याने निरोप दिला.

पुन्हा तीन महिन्याने केर्स्टेन बर्लिनला आला असताना हिमलरला त्याची तंदुरुस्तीसाठी गरज भासली. पुन्हा अधून मधून युद्धविषय निघे. केर्स्टेन त्याची घृणा दाखवी. पण हिमलरचा एकच धोशा–" फ्यूरर म्हणतो..."

## फिनिश दूतावासाशी संपर्क

त्या हिवाळ्यात हिटलरने पोलंड चेचले. फ्रान्स, इंग्लंड सारखी बडी राष्ट्रेही अडचणीत सापडली. केर्स्टेनच्या दृष्टीने परतणे अवघडच होते. त्याने फिनीश दूतावासाशी संपर्क साधला. हिमलरशी पूर्ववत् संबंध ठेवून आणखी काही माहिती मिळाल्यास पहा, असे त्याला सुचवण्यात आले. केर्स्टेन आता नकळत खोड्यात अडकला. पण हिमलरला तोच कावूत आणू शकत असे वेदनेच्या क्षणी !

१९४० मध्ये केर्स्टेनला खूपच अवघड अवस्थेला तोंड द्यावे लागले. इस्टोनिया रशियाच्या दडपणात होता. हॉलंड हिटलरच्या टाचेखाली. फिनलंडची दारे बंद होती. जर्मनीत त्याच्या हालचालींवर कडक नियंत्रणे. युद्ध पसरत चालले.

या धकाधकींत केर्स्टेन हिमलरच्या ग्रंथालयात जाऊन बसे. तेथे धार्मिक पुस्तके पाहून त्याला आश्चर्य वाटले. वेद, जुना करार, कुराण आणि याशिवाय नानातऱ्हेची धर्मचर्चा करणारे ग्रंथ. नवलच होते. यावर केर्स्टेनने छेडले असता, हिमलर म्हणे, " माझा या भाकडावर विश्वास नाही. पण फ्यूररने नवे नाझी बायबल बनण्याची कामगिरी मला सोपवलीय. तिसऱ्या राईशच्या पूर्ण विजयानंतर सारे धर्म कोसळतील. तेव्हा सारे लोक हिटलरचेच नाव घेतील. "

मेसमधल्या फ्रान्सच्या पाडावाच्या चर्चा ऐकून केर्स्टेनचा घास उतरत नसे. एस-एसचे अधिकारी त्यांचा द्वेष करीत. पण केवळ हिमलरपायी...केर्स्टेनला हिमलर केव्हाही भेटतो, आणि आम्हाला मात्र प्रोटोकोल ! '—ते जळफळत.

एक व्यक्ती मात्र या जळफळाटात सामील होत नसे...हिमलरचा प्रायव्हेट सेक्रेटरी से. लेफ्टनंट रुडोल्फ प्रान्डट शांत मनमिळावू स्वभावाचा रुडोल्फ या खाकी भेजांच्या गर्दीत एक नवलच होते ! कायद्याची डॉक्टरेट त्याने मिळवलेली. युद्धापूर्वी तो प्रमुख क्लार्क होता. पण हिमलरचा सेक्रेटरी बनूनही त्याला नाझींबद्दल आस्था अशी कमीच. तरीपण त्याला तो हुद्दा नाकारण्याचे धैर्य नव्हते. आपल्या गुणांनी त्याने त्या खात्यात राईशफ्यूररची चांगली मर्जी संपादली. रुडोल्फला सुद्धा पोटाचा विकार होता, म्हणून हिमलरने केर्स्टेनला त्याच्याकडेही लक्ष द्यायला सांगितले.

परस्परांची लवकरच पहचान झाली. दोन एकेकटी माणसे अशी एकत्र आली; माणुसकीचा अर्थ न विसरलेली.

फ्रान्सचा पाडाव झाल्यावर काही दिवस स्वस्थतेत गेले. ऑगस्टच्या अखेरी त्याचे दुखणे उफाळले. त्वरित केर्स्टेन धावत नं. ८ वर आला. मालिश केल्याने हिमलरला आराम वाटला. त्याने म्हटले, " केर्स्टेन, तू आहेस म्हणून मला आधार. नाहीतर... तुझे उपकार कधीच फिटणार नाहीत. अद्यापि मी तुला एक पैही दिली नाही..."

केर्स्टेन सावरला. हिमलरने फी दिली असती म्हणजे तो एक साधारण दर्जाचा 'पेड' नोकर ठरला असता ! विकत घेतलेला ! आणि हिमलरलाही आपण पैसे देतो म्हणून काही वाटले नसते. केर्स्टेनला माहीत होते, हिमलरची मिळकत काही

फार नाही. केवळ २ हजार मार्क. त्याचा परिवारही मोठा होता.

त्याने हिमलरला म्हटले, " मी व्हिजिटची फी घेत नसतो. दुखणे पुरते बरे झाले म्हणजे मग फी घेतो. शिवाय, मला देवाने भरपूर दिले आहे. "

" तरी मी तुझा ऋणी आहे. तुला काहीतरी दिले पाहिजे. बोल, काय देऊ..." —हिमलर.

केर्स्टेनने हात हलवीत म्हटले, " आता काही नको. ह्या गोष्टी सोडून देऊ. पण तू संपूर्ण बरा झाला म्हणजे, पुरती वसुली घेईन..."

हिमलर गहिवरला होता !

तेवढ्यात केर्स्टेनला एक आठवण झाली. त्याचा एक जर्मन पेशंट उद्योगपती होता. खूप चांगला. पण सक्तीने त्याला कँपवर डांबण्यात आले होते. त्याचा गुन्हा एवढाच की तो लोकशाहीवादी होता. शेस्टेंगने केर्स्टेनला त्याच्यासंबंधी सांगून ठेवले होते. " हेर राईशफ्यूरर, या माणसाला मुक्त करावे, अशी माझी विनंती आहे. "—केर्स्टेन म्हणाला.

हिमलरने त्याची कागदपत्र बोलावले. वाचून म्हटले, " केवळ तू सांगतोस म्हणून मी मानतो..." ताबडतोब त्याने ब्रान्डटला हाक मारून म्हटले, " डॉक्टर म्हणतात म्हणून या माणसाला सोडून द्या..."

ब्रान्डट लगेच कामाला लागला. एक क्षणभर थबकून त्याने केर्स्टेनच्या दिशेने पसंतीचा गूढ कटाक्ष टाकला. केर्स्टेनने हे ओळखले. गेस्टापोच्या क्रूर झमेल्यातही त्याला एक ' सिपथायजर ' भेटला होता.

## निगराणीचा फेरा

हिमलरच्या रक्तातला कावेबाजपणा नि सावधवृत्ती काही लोपली नव्हती. तंदुरुस्त झाल्यावर तो अधूनमधून केर्स्टेनला भेटत असे: माझ्या हस्तकांनी सांगितलंय, तू हॉलंडला जातोस तेव्हा डचांशी तुझा वेगळा संबंध असतो. तुझ्या हालचाली त्यांना संशयास्पद वाटतात म्हणे. तू यातून लवकर सुटका करून घेतली नाहीस, तर तुला पाठीशी घालणे मला जड जाईल !"

हॉलंडमध्ये गेल्यावर तेथे गेस्टॉपोच्या मुख्यालयात रोज हजेरी लावण्याची ताकीद केर्स्टेनला दिली गेली. " ही केवळ धोरणाची बाब आहे. सध्याची हवा जरा वेगळी म्हणून " असे सांगून हिमलर वेळ मारून नेई. तरी त्याच्यावर कडक निगराणी ठेवली गेली.

मात्र या निगराणीतही एके दिवशी बिग्नेल या एका आपल्या मित्राला केर्स्टेनने सोडवले. त्याच्या निरपराधी वृत्तीला स्वतःची जमानत देऊ केली. तेथल्या गेस्टॉपो अधिकाऱ्याला राऊटरला सांगितले, सरळ हिमलरला फोन लाव, माझे नाव सांगा ! राऊटर अवाक् झाला !—कारण एरवी हिमलरला फोनवर गाठायचे तरी दहावीस कानांतून जावे लागे ! पण केर्स्टेनची गोळी लागू पडली...

त्याच वेळी हिमलरचा पोटशूळ पुन्हा उमळला होता. ही गोष्ट योगायोगाने पथ्यावर पडली. ब्रिग्नेल सहीसलामत सुटला.

थेट हिमलरच्या पो. बॉ. नंबरवर केर्स्टेनची पत्रे येत ! आणि ब्रॉन्ड्ट ती सॉर्ट करील असे. त्यामुळे धोका उद्‌भवत नव्हता. हॉलंडशी त्याचा संपर्क चालू राहिला. बरीच माहिती त्याला पुरविण्यात येई. 'प्रेमपत्रा'च्या संकेनातून हा कारभार चाले. कधी अशा निरागस प्रेमपत्रांची चुणूक केर्स्टेन हिमलरलाही दाखवत असे. त्याची करमणूक होई. हिमलरचे दुखणे असह्य झाले आणि केर्स्टेनच्या बोटांचाच-मालिशाचा केवळ आधार असे, अशा वेळी केर्स्टेन एखादी विनंती पुढे करी. कुणाची सुटका, कुणावर बजावलेल्या हुकुमाची तामिली रद्द इ. पण असे प्रसंग क्वचितच. आणि कधी त्याची 'सुप्रीम हीरो' म्हणूनही भलावण करावी लागे, भविष्यातले ते श्रेष्ठ स्थान भूषवण्यासाठी, ती कीर्ती मिळवण्यासाठी आतापासून उदारता, दया दाखवली पाहिजे, असे केर्स्टेन त्याला फुलवीत असे. या हरभऱ्याच्या झाडावर चढण्यात कधी कधी हिमलरलाही रस वाटे ! मग तो सही घोटून देई...ब्रॉन्ड्ट एखादे वेळी त्यात जास्तीची नावे भर घालून देई. हुकूम रद्दबातल होत. छळातून काही जीव बचावत.

पण येथेच छतिसाचा आकडा आकार घेई ! इतर वरिष्ठ गेस्टॉपो अधिकाऱ्यांना वाटे : इतक्या तडकाफडकी हिमलर हे हुकूम का बाद करतो ? केर्स्टेनच्या हालचालीत हे पाणी मुरते याचा सुगावा त्या अधिकाऱ्यांना लागल्यावाचून राहत नसे.

## केर्स्टेनची 'जामिनकी' पत्करली !

नंतरचा बराच काळ केर्स्टेन एकाकीच पडला. १९४१ च्या जानेवारीत एके सकाळी त्याच्या बर्लिनमधल्या फ्लॅटवर गेस्टॉपो येऊन उगवले !

"तुझ्याशी आम्हाला बोलायचं" उपहासाने एकजण म्हणाला.

केर्स्टेन पायजम्यातच होता. त्याने आपल्या 'स्टडी'त त्यांना नेले. केर्स्टेनच्या मनात काहूर उठले.

"तुझे कोणी ज्यू पेशंट आहेत का ?"–दुसऱ्या अधिकाऱ्याने स्टडीत गेल्यावर विचारले.

"अर्थातच"–केर्स्टेनला या विषयाने जरा धीर आला.

"पण जर्मन डॉक्टरांनी ज्यू ना ट्रीट करण्यास सक्त मनाई आहे, हे माहीत आहे ना ?"–अधिकारी.

"मी जर्मन डॉक्टर नाही, फिनीश नागरिक आहे" केर्स्टेनने नम्रपणे म्हटले. त्याने आपला पासपोर्ट त्यांना दाखवला. गेस्टॉपोना ते मान्य करावे लागले.

ते निघून गेले. वस्तुतः केर्स्टेनची साद्यंत माहिती गेस्टॉपोला होती. मग हा डाव कशासाठी ?

हिमलरच्या कानी ही घटना केर्स्टेनने कथन केली. तडक उसळून हिमलरने फोन हाती घेतला. "धिस इज अॅन ऑर्डर. द डॉक्टर इज रिस्पॉन्सिबल टू मी अँड मी अलोन !"

पण लवकरच रुडॉल्फ ब्रान्ड्टने केर्स्टेनला सावध केले. हिमलरच्या खालचा अधिकारी राईनहार्ड हेड्रीचने त्याचा पिच्छा पुरवला आहे. केर्स्टेनवर त्यांचा संशय आहे. हिमलरला भरीस घालून गद्दारी केली जाते, याचा त्यांना संशय होता. पुराव्यासाठी केर्स्टेनच्या मागावर हेड्रीचचे हस्तक लागले होते.

थोड्याच दिवसात हिमलरच्या ऑफिसबाहेरच हेड्रीचने त्याला गाठले नि शहाजुकपणे म्हटले, "जरा गप्पागोष्टी कराव्यात अशी इच्छा आहे."

"केव्हाही. म्हणाल तर आज..."–केर्स्टेन.

संध्याकाळी गेस्टापोच्या ऑफिसात भेटायचे ठरले. त्या अर्ध्या तासाच्या मुलाखतीत वेड पांघरून पेडगावला जाण्याचे सोंग करीत हेड्रीचने सूचकपणे केर्स्टेनला दणकवून दिले ! त्याचे हॉलंड-फिनलंडमधील संबंध जाणून घ्यायची हेड्रीचला उत्सुकता होती. "हिमलरजवळ आपले गाऱ्हाणे लोक तुझ्यामार्फत मांडतात. त्यांच्या अडचणींचा कानोसा घेण्यासाठी आम्ही एक सर्व्हे करायचे ठरवले आहे !"

केर्स्टेनने वरवर होकार दर्शवल्याचे सोंग केले. ब्रॉन्ड्ट जवळ त्याने हकिगत सांगितली. ब्रॉन्ड्ने धोक्याचा इशारा दिला. बाबरे, शिकारी कुत्रे मागे लागले आहेत. पण केर्स्टेनने बेफिकीर राहून पूर्वतयारी केल्याचे सांगितले.

## एक दुर्घट क्षण–

एकदा मेसमध्ये हेड्रीच–राऊटर यांच्या गुफ्तगूजन हॉलंडवरच्या भयानक हल्ल्याच्या पूर्वनियोजित बेताचा केर्स्टेनला सुगावा लागला. त्याने मृत्यूच्या जबड्यात जायच्या तयारीने सरळ हिमलरला विचारायचे ठरवले. एकदा मालिशच्या प्रसंगी वेळ साधून केर्स्टेनने विचारले, तेव्हा हिमलरने उत्तर दिले. "हिटलरच्या वाढदिवसाची भेट म्हणून २० एप्रिलला हा मुहूर्त आहे !–पण तुला हा बेत कसा कळला ?"

स्तब्ध शांतता पसरली. काही क्षणानंतर केर्स्टेन उत्तरला, "राऊटर-हेड्रीच चर्चा करीत होते मेसमध्ये."

"मूर्ख लेकाचे" हिमलरने शिवी हासडली. त्याचबरोबर आपला डॉक्टर या झमेल्यात निष्पाप असल्याचे समाधानही त्याच्या चेहऱ्यावर उमटले होते ! केर्स्टेनला ही गुप्त घटना माहीत झाल्याचे हिमलरने मान्य केले. एक दुर्घट क्षणातून केर्स्टेन बचावला. काही वेळानंतर केर्स्टेनने आणखी धैर्य करून म्हटले, "तुझ्या करीयरच्या दृष्टीने ही मोठी चूक आहे."

हिमलर ढिम्म होता. त्याने हे बोलणे उडवून लावत म्हटले, "तुला राजकारणातले काय कळणार ! फ्यूररचा प्लॅन खराच अलौकिक आहे." असे म्हणत

हिमलरने पोलिश जनतेचा जर्मनांवरचा राग निपटण्यासाठी पोलिश, डच यांच्यात कलह पेटवून त्यांना कसे वळवता येईल याची कल्पना दिली.

"ते शक्य आहे" केर्स्टेनने निर्विकारपणे म्हटले. "मी तुझ्या प्रकृतीचा विचार करीत होतो. खूप दिवसांपूर्वी तू सांगितले होते हिटलरने तुझ्यावर 'एसएस'ची संख्या १ कोटीवर नेण्याची जबाबदारी टाकली आहे म्हणून. सध्याच कुठे ते १० लक्ष असतील. आणखी ९० लक्षांचे ट्रेनिंग, खाणेपिणे, शस्त्रे इ. बाबी पहायच्या म्हणजे प्रकृतीवर केवढा ताण पडेल. त्यात पुन्हा ही मोहिम म्हणजे –"

"माझ्या आवडीनिवडीचा प्रश्न नाही. फ्यूररचा तो व्यक्तिगत हुकूम आहे."– हिमलर.

"पण एक पेशंट म्हणून खरं सांग – डॉक्टरजवळ – या दोन प्लॅन्डपैकी अधिक जबाबदारीचा कोणता? 'एसएस'ची ताकद वाढविणे की डचांवरचा हमला?"

"निःसंशयपणे – 'एसएस' हे पहिले ध्येय."

"तर मग हॉलँडची योजना लांबणीवर टाकावी! –या दोन्ही दगदगी पेलतील अशी तुझी तंदुरुस्ती ठेवायला मी असमर्थ आहे." – केर्स्टेन.

"अशक्य. हॉलंड मोहिम ही केवळ हिटलरची इच्छा आहे?"

एका फेरीतच नाऊमेद होण्याची जिद्द केर्स्टेनची नव्हती. त्याला आनक एक कल्पना सुचली. अस्वस्थचित्ताने त्याने विचारले.

"ही मोहिम दुसऱ्या कोणाला नाही का सोपवता येणार?"

"इतक्या महत्वाच्या कामाकरीता फ्यूररचा केवळ माझ्याचवर विश्वास आहे. अन्य कुणीही हे करू शकणार नाही. दुसऱ्या कुणाला परवानगी नाही..."– हिमलर.

## मोहिम लांबणीवर टाकण्याचा आग्रह

नंतरचे काही आठवडे केर्स्टेनने हिमलरला प्रकृतीचा जवळ जवळ धाक पाडून धोशाच लावला. पण हिमलर अढळ होता.

मार्चच्या अखेरीस एक अकल्पित घटना घडू लागली.

गेली दोन वर्षे रामबाण म्हणून गाजलेली केर्स्टेनची बोटे ट्रीटमेंट देऊ शकत नव्हती. मुद्दाम घडले की त्याचे कौशल्य उणावले न कळे! हिमलर व्यथित होता.

केर्स्टेने सबुरीचा सल्ला देत होता. दगदग टाळावी, असा त्याचा हेका "मी प्रयत्न करतो. पण आता ते अशक्य आहे" – हिमलर म्हणे.

१९४१ या एप्रिलमध्ये हिटलरने युगोस्लाहियाची मोहिम सुरू केली. आपले ठाण त्याने बॉर्डरवर मांडले. हिमलरही अर्थात होताच. त्याला भयंकर त्रास जाणवत होता. केर्स्टेनही होता. "पागलपणा करू नको. एकाच वेळी अनेक गोष्टी करता येणार नाही तुला. डच मोहिम लांबणीवर टाक"– केर्स्टेनचा एकच आग्रह होता

हिमलरचा चेहरा पांढराफटक पडला होता.

एके दिवशी दुपारी त्याला श्वास सागला. घरघर सुरू झाली. केर्स्टेनने दिलासा दिला. त्याच्यापाशी येऊन स्नेहाने त्याने उपचार केले. मनावरचा ताण कमी करण्यासाठी, खुद्द हिटलरपाशी वजन खर्चून ही मोहिम लांबणीवर टाकल्याशिवाय आता गती नाही. अन्यथा उपचार लागू होणे अवघड.—केर्स्टेनने पुन्हा त्याला सुचवले.

हिमलर आता दुखण्यापायी गरीब कोकरू बनला होता. त्याने हिटलरला भेटायचे ठरवले.

आणि केर्स्टेनच्या बोटात पुन्हा जादू संघटली ! हिमलरला खूप आराम वाटू लागला. " केवळ तू आपल्या मनावरचा ताण कमी केलास, त्याचा हा परिणाम ! " – केर्स्टेनने सांगितले.

त्याच क्षणी फोनवर युगोस्लाव्हियाच्या विजयाची वार्ता आली. बर्लिनला निघायची तयारी सुरू लाली ..

खूप लवकर गुण आल्याने हिमलर पुन्हा विसरणार तर नाही, याची केर्स्टेनला काळजी होती. पण दैव त्याच्याकडून होते. परतताना हिमलरला पुन्हा वेदनेने गाठले ! केर्स्टेन ते पुन्हा बजावले." अजूनही तू मोहिमेच्या तणावातून स्वतःला मोकळे करून घेत नाहीस. "

आता सोक्षमोक्ष लावल्याशिवाय हिमलरला गत्ती नव्हती·

परतल्यावर त्याने सरळ हिटलरची गाठ घेतली. दोन तासानंतर केर्स्टेनला फोन आला, " मोहिम लांबली. फ्यूरर उदार आहे. लेखी हुकूम मिळाला ! "

## हिमलर फुफाट्यात !

पण हेड्रीचला या बनावाचा सुगावा लागला. एकदा हिमलर ब्रान्ड्ट म्युनिचला गेले असताना त्याने केर्स्टेनला बोलावून गिरफदार करायचा घाट घातला. ड्यूटीवरच्या एसएसला केर्स्टेनने ही बातमी तात्वडतोब हिमलरला कळवायला सांगितली. हिमलरने त्वरित हेड्रीचला फोनवर बोलावले ! केर्स्टेनची पूर्ण जबाबदारी पत्करली...हेड्रीचचा नाइलाज होता. पण तो म्हणाला, " केवळ हिमलरपायी तुला सोडतो. पण घडा भरल्यावर येथे पुन्हा आपण भेटूच...तयारी ठेव. "

पण हे अशक्य होते ! बोहेमियात एका कामगिरीवर असताना हेड्रीचचा १९४१ च्या सप्टेंबरात निकाल लागला. गेस्टापो प्रमुखाची ती जागा एर्न्स्ट काल्टेनब्रुनरने घेतली.

जून १९४१ च्या सुमारास रशियावरची मोहिम सुरू होती. हिटलरने ज्यूंचा पुरा निःपात करायचे ठरवले. ही कामगिरी एसएस व हाईन्रीश हिमलरवर सोपवण्याचे फ्यूररने ठरवले. पण हिमलरने म्हटले, " आम्ही तुझ्या शब्दासाठी प्राण द्यायला तयार आहोत. पण हे ' मिशन ' आमच्यावर टाकू नको ! "

त्या क्षणी हिटलरने उग्रावतार धारण केला. यापूर्वी कधीही तो इतका भडकला

नव्हता. हाईन्रीश हिमलरची त्याने मानगूटच धरून हादरवले. " तू जो आहेस तो मी बनवला...आणि आता तू नाकारतोस...गद्दार आहेस."

हिमलरचा थरकाप उडाला. भीतीने, निराशेने तो हादरला. चाचरत त्याने म्हटले, " फ्यूरर...फ्यूरर...काय वाटेल ते मी करीन, पण मला गद्दार म्हणू नका देशद्रोही म्हणू नका."

पण हिटलरचा संताप निवला नव्हता. आणि ज्यूंचे हत्याकांड करायला हिमलर आता हिचकिचत नव्हता. पण फ्यूररचा विश्वास तो गमावून बसला होता.

## तो गुप्त रिपोर्ट

१९४२ च्या हिवाळयात हाईन्रीश हिमलरने एक आश्चर्यजनक घटना कथन केली. केर्स्टेनला त्याने विचारले, " भयानक डोकेदुखी, सिफिलिस, थकवा असलेल्या एका पेशंटवर तू इलाज करशील का ?"

" मला त्याची प्रत्यक्ष परीक्षा करावी लागेल. लक्षणे पाहिल्यावाचून मला ते शक्य नाही." —केर्स्टेन.

" पण तुला ते अतिशय गुप्त ठेवावे लागेल." हिमलर.

" आमच्या वैद्यकशास्त्राचा तो धंद्यातला पहिला नियमच आहे."

हिमलरने आपल्या सेफमधून एक जाडजूड कागदावरचा अत्यंत गुप्त रिपोर्ट केर्स्टेनच्या हाती दिला. २६ पानांच्या त्या बाडात हिटलरची केस हिस्ट्री होती ! —सिफिलिटीक पॅरॅलिसिसने हिटलरचा पिच्छा पुरवला होता.

ते वाचून केर्स्टेन काही क्षण भीतीने अवाक् राहिला.

" मग, काय करता येईल ?" —हिमलरने पृच्छा केली.

" मोठं दुःख आहे. शारीरिक व्याधी मी दूर करू शकतो. पण हा 'मेंटल इलनेस' — माझी काहीच मात्रा चालणार नाही. फ्यूररवर उपचार चालू असतीलच..."

" हो, पण त्याला कुठल्याही क्लिनिकमध्ये वा कुठल्याही तज्ज्ञाजवळ नेणं म्हणजे बातमी षटकर्णी होण्याचा धोका आहे. त्याचा खाजगी डॉक्टर मोरेल हा उपचार करतोय. फ्यूरर खरेच 'सुप्रीम आहे. आजारी असला म्हणून काय झाले ? इतिहासात त्याचे स्थान राहीलच. आता त्याचा 'रोल' तडीस जात आहेच."

ही वार्ता केर्स्टेनने रुडॉल्फ ब्रान्ड्टला कथन केली.

तू तर मृत्यूच्या दाराचे दर्शन घेतलेस...कुणाजवळही पुन्हा बोलू नकोस या सर्वोच्च गुपिताबद्दल. हिमलर, फारतर गोबेल्स आणि बोरमनलाच हे माहिती आहे. विसरून जा हे. हिमलरशीही बोलू नकोस." —रुडॉल्फने भयभीत होत शारा दिला.

केर्स्टेनने ही घटना पुसून टाकली. पण एकदा पुन्हा हाईन्रीश हिमलरनेच विषय काढला. फ्यूररचे निर्णय एकदम टोकाचे, अवास्तव वाटत होते म्हणून की काय ? पण

आता तर्काचेही क्षेत्र संपले होते. बाण कधीच निसटले होते. एसएसचे ब्रीदच होते "ऑनर इज लायल्टी."

## तू मदत करशील का ?

१९४३ मध्ये फिनलंडही दोस्तांच्या बाजूने युद्धात उतरला. सप्टेंबरमध्ये फिनीश सरकारने केर्स्टेनशी संपर्क साधायची इच्छा व्यक्त केली. चार वर्षांच्या काळानंतर केर्स्टेन सुट्टीवर निघाला होता. त्याची मुलंबाळं जर्मनीतच होती. त्यामुळे तो परत येणार याबद्दल हिमलरला शंका नव्हती. केर्स्टेनच्या बाबतीत शंका घेण्याइतपतही त्याला किंतु दिसत नव्हता. पण त्याचे कामच हेरगिरीतल्या झमेल्यातले. आपली पत्नी व लहान मुलगा यांच्यासह केर्स्टेन निघाला. दोन मुले बर्लिनलाच होती.

वाटेत स्टॉकहोमला स्वीडनच्या तटस्थ सरकारने त्याच्याशी वार्तालाप केला. ख्रिश्चन गुंथर या स्वीडीश परराष्ट्रमंत्र्याने सांगितले, "दोस्तांकडून आमच्यावर विलक्षण दडपणे येत आहेत. पण आमच्या परंपरेला नि हेतूंना ते बाधक ठरेल. युद्धात सामील होताच स्टॉकहोम धुळीला मिळेल. त्याऐवजी दोस्तांना माणुसकीच्या पातळीवर काही मदत करावी. कॉन्सन्ट्रेशन कँपच्या छळातून वाचवता येतील तेवढ्यांना वाचवायचे. तू मदत करशील का ?

शक्य होईल ते करण्याचे आश्वासन केर्स्टेनने दिले. त्या दुर्दैवी निर्वासितांना स्वीडनमध्ये कसा आश्रय देता येईल, याची त्यांनी चर्चा केली. यात केर्स्टेनची भूमिका सर्वांत महत्त्वाची होती. हिमलरकडून जास्तीत जास्त सवलती मिळवायची. हेल्सिंकीला जाऊन केर्स्टेन परतला. आपल्या पत्नीला, मुलाला स्टॉकहोमला ठेवायचे त्याच्या खप मनात होते, पण...

परतल्यावर त्याने हिमलरला फोन केला. हिमलरने पहिला प्रश्न विचारला, "तू आपली पत्नी नि मुलगा याना स्वीडनला सोडून आला असशील अर्थातच..."

"नाही. माझ्याच बरोबर आहेत ती." केर्स्टेन.

"खरंच ?–तर मग जर्मनीच्या विजयावर तुझी श्रद्धा आहे! माफ कर, पण तुझ्याबद्दल बरीच वदंता पसरली होती. आता तू खरा मित्र आहेस." –हिमलर.

बर्लिनमधले नित्याचे कामकाज सुरळीत चालू झाल्यावर केर्स्टेनला आपल्या कामाच्या अफाट व्यापाची कल्पना आली. गेस्टापोचे कराल दात चुकवण्यासाठी आणखी कुणाची तरी गरज होतीच. आपल्याला हवे तसे सावज केर्स्टेनने हेरले. कर्नल वॉल्टर शेलेनबर्ग आणि जनरल गोत्लाब बर्जर. दोघेही हिमलरच्याच हाताखाली होते. निष्ठावान, करड्या शिस्तीचे पण अतिशय महत्त्वाकांक्षी होते. बर्जरला हिमलरने वाफ्फेनचा म्हणजे एसएसच्या शस्त्रदलाचा प्रमुख नेमले होते. कॉन्सेन्ट्रेशन कँपच्या हुकुमाची अंमलबजावणी करण्याचे त्याचे काम होते. सुरुवातीला केर्स्टेनसारख्या 'सिव्हिल' माणसाचा त्या कार्यालयातला वरचष्मा त्याला सलत होताच. पण एकदा हिमलरने बर्जरची प्रकृती पाहण्याची कामगिरी केर्स्टेनला दिली. आणि

केर्स्टेनने जिंकले...,शेलेनबर्ग अवघ्या तिसाव्या वर्षी कर्नल झाला होता. त्याचीही कर्तुकी शानदार होती. जनरलची स्वप्ने तो पहात होता.

त्यांच्या महत्वकांक्षेचा हिमलरला त्रासच होत होता.

तिसऱ्या राईशची उतरती कळा शेलेनबर्ग-बर्जूरला जाचत होती.

उद्या पारडे फिरलेच तर... शेलेनबर्ग आणि बर्जदने केर्स्टेनला मैत्रीचा हात पुढे केला.

काल्टेनब्रूनर – हेन्ड्रीचचा वारस – केर्स्टेनवर लक्ष ठेवून होता.

मधल्या काळात केर्स्टेनने हिमलरपाशी कुठलीच मागणी केली नाही विशेष अशी. डॅनिश, नार्वेशियन, आणि डच कॉन्सेन्ट्रेशन कॅंपमधील कैदी हेही जर्मनिक वंशाचेच आहेत, एवढेच तो हिमलरला पटवून देत असे. १९४४ च्या जूनमध्ये नार्मंडीच्या दोस्तांच्या कारवाईनंतर हिमलर म्हणू लागला, खरंच, अवघ्या जगावर हत्यार चालवणं ठीक नाही. जर्मन वंशाबद्दल उदार असायला हवं.

एके दिवशी हिमलरकडे जाताना, शेलेनबर्गकडून एक माणूस धापा टाकत आला. चिठ्ठीत लिहिले होते. आज जाण्याचा रस्ता बदलावा. धोका आहे. हिमलर-ऐवजी काल्टेनब्रूनर तुझाच काटा काढणार...

केर्स्टेनने ड्रायव्हरला सहजपणे वेगळ्या मार्गाने गाडी नेण्याची सूचना दिली. सर्व काही सुरळीत झाले.

मग हिमलरशी बोलताना संधी साधून या चिठ्ठीचा उल्लेख केला.

ताबडतोब काल्टेनब्रूनरला बोलावून फाईलावर घेतले. तू आणि डॉक्टर दोघेही मला हवेत. पण हे अपघात मला खपणार नाहीत. अन्यथा परिणाम फार वाईट होईल.

काल्टेनब्रूनर फिक्का पडला.

## आणि यांचे जीव वाचले...

केर्स्टेनला या घटनेने आणखी बळ आले. हिमलरची प्रकृतीही बिघडली होती. त्याचा योग्य तो फायदा केर्स्टेनने घेतला. पण वेन्झेल या इसमाला फाशीवरून त्याला वाचवता आले नाही. हिटलर विरुद्धच्या कटात तो सापडला होता. तेथे हिमलरही काही करू शकत नव्हता. मग त्याऐवजी हिमलरच्या कक्षेतली कामे केर्स्टेनने पुढे केली, ५० नार्वेजियन विद्यार्थी, ५० डॅनिश पोलिस. ३ हजार डच्फ्रेंच बेल्जियन पोलिश स्त्रियांना त्वरित स्वीडनच्या हवाली करण्यास हिमलरने मान्यता दिली. दोस्तांच्या बॉंबिंगपासून दूर तळावर स्कॅंडिनेव्हियन कैद्यांना हलवण्याचे कबूल केले. २७०० ज्यूंना स्विस सीमेवर तेडक्रॉसच्या आधीन केले. केवळ डॉक्टर केर्स्टेनच्या मर्जीपायी!

युद्धाचे पारडे आता स्पष्ट होऊ लागले होते. सारेच कैद्यांचे तळ उडवून द्यायचे ठरवले आहे. असे दोस्तांच्या गुप्तहेरांना कळले. ऐंशी हजार कैदी होते. दोस्तांनी

स्वीडनला मध्यस्थीस घातले. त्यांनी केस्टेनला संदेश दिला.

"अर्थातच आमच्याबरोबर आमचे शत्रूही रसातळाला जातील" हिमलरचे केस्टेनला त्यावर सांगणे होते. पण केस्टेनने म्हटले की जर्मनीच्या वीरांनी असे केलेले नाही. आणि आज सारे हतबल झाले असताना तूच एक समर्थ जर्मन वीर आहेस...

हाईन्रीश हिमलर काहीच बोलला नाही.

नंतरच्या दिवशीही केस्टेनने विषय काढला, ८० हजार जीव वाचवण्याचे श्रेय इतिहास तुला देईल.

अखेर काही दिवसांनी १२ मार्च ४५ ला एक मानवतेचा करारनामा केस्टेनने त्याच्याकडून करविला. कान्सेन्ट्रेशन कँप डायनामाईटने उडवायचे नाहीत. ज्यूंचे शिरकाण थांबवायचे. ज्यू कैद्यांना पार्सले पाठवण्यास स्वीडनला संमती द्यावी.— हिमलरने मान्यता दिली.

## दयेची भीक

पण हिमलरवर मार्टिन बोरमान — हिटलरचा सेक्रेटरी आणि नाझी पार्टीचा श्रेष्ठी याचे दडपण येत होते. बर्लिनच्या सीमेवर रशियन रणगाडे गरजत होते. तरी श्रेष्ठींचा हेका कमी झाला नव्हता. शेलेनबर्ग आणि बर्जर यांनी मात्र ज्यूंच्या हुकुमांची तामिली रोखून धरू असे सांगितले. १९–२० एप्रिलला हिमलरने भीत-भीतच मान्यता दिली. हिटलर आपल्याला हुडकून काढील. या प्रकरणातही त्याच्या डोक्यावर टांगती तलवार होती. त्या दिवशी केस्टेनशी त्याची अखेरची भेट झाली. "माझ्याबद्दल तू वाईट ग्रह ठेवू नकोस. प्रचंड गुन्हे माझ्या हातून झाले असतील, पण फ्यूरर मी अधिक कठोर व्हावे असे वाटत होते." आणि पुढे मोटारीत बसत त्याने म्हटले, "माझ्यावर दया कर. माझ्या कुटुंबियांची मला काळजी वाटते."

इतिहासातला एक सर्वेसर्वा आणि लाखोंचे शिरकाण करणाऱ्याच्या डोळ्यात आसू होते!

मोटारीचे दार लागले आणि ती निघून गेली.

दोन आठवड्यानंतर दोस्तांची पूर्ण सरशी झाली. अनेक जर्मन अधिकाऱ्यांना अटक झाली. हिमलरचा पत्ता नव्हता. नाक्यानाक्यावर तपासणी सुरू झाली. हाईन्रीश हित्सींगर नावाच्या व्यक्तीचे संपूर्ण कागदपत्र टिपटाप होते. म्हणूनच शंका आली. हजारो-लाखो निर्वासितात क्वचितच इतके स्वच्छ नेटके परवाने, कागदपत्र असायचे! तो हिमलर होता!...त्याच्यावर खटला गुदरण्यापूर्वीच तुरुंगात त्याने विषाची कॅप्सूल मिळवून कायमची सुटका करून घेतली.

युद्ध खटल्यात बर्जरला पंचवीस आणि शेलेनबर्ग यास सहा वर्षांच्या शिक्षा झाल्या. बर्जरची पाच वर्षांनंतर सुटका झाली. शेलेनबर्ग त्यानंतर वर्षभरातच वारला. रूडाल्फ–ब्रान्डटला वाचवण्याची केस्टेनने खूप कोशीस केली. पण

हिमलरच्या साऱ्या हुकुमांची लिखापटी, अंमलबजावणी करण्याचा आरोप ब्रान्ड्ल-वर ठेवून त्याला फाशी दिले.

युद्धानंतर डॉ. फेलिक्स केर्स्टेन स्वीडनमध्ये स्थायिक झाला. त्याच्या पूर्वायुष्याबद्दल १९४९ मध्ये एक कमिशन नेमून चौकशी झाली! पण हजारो साक्षी, कागदपत्र पुरावे देऊन तो निर्दोष सिद्ध झाला. डच सरकारने त्याचा सन्मान केला. १९५३ मध्ये त्याला स्वीडीश नागरिकत्व लाभले. 'श्वेतपत्रिके'त त्याच्या कार्याचा स्वीडीश सरकारने गौरव केला. त्याने नंतर पूर्वीचाच वैद्यकीय व्यवसाय सुरू ठेवला. १६ एप्रिल १९६० ला हृदयविकाराने त्याने जगाचा निरोप घेतला.

युद्धाच्या कराल धामधुमीतही त्याच्या वैद्यकीय कौशल्याने एक वेगळा 'रोल' त्याला लाभला होता.

□ □ □

---

## पुस्तके

पृष्ठ ४३ वरून

यातला अनुभव बहुकेंद्री असला, तरी तो विस्कळीत नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

मग या कादंबरीतली जमेची बाजू कोणती? वास्तव अनुभवाची कलात्मक मांडणी करणारा उत्कृष्ट पूर्वार्ध हे एक. दुसरे, उत्तरार्धातही, कादंबरीच्या आकृतीवरची लेखकाची पकड ढळलेली असली तरी वेधक आणि चित्रमय प्रसंगवर्णनाचे वैशिष्ट्य सर्वत्र कायमच राहिलेलें आहे. प्रत्येक प्रसंग पिटके अशा करकरीतपणे सांगतात की सावलीत उन्हाचा कवडसा पडावा तसा तो प्रसंग अगदी रेखून उठतो. त्यात पाल्हाळ नसतो, त्यात भाष्य नसते, त्यात भडकपणा नसतो. जेवढ्या आणि जशा सौम्यगडदपणाने प्रसंग साकार व्हायला हवा, तसाच तो होत राहतो. आणि त्यातूनच पिटके अशी मार्मिक अधोरेखिते करतात की त्यातून सगळे काही व्यक्त होत राहते. पिटक्यांची भाषा मोठी वैशिष्टचपूर्ण आहे. अंगाबरोबर वेतलेल्या कपड्यासारखी बेतशीर. केवळ लक्ष्यवेध करणारी. सहजपणे प्रमेये मांडणारी. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अनुभवाला सरळपणे सामोरे जाण्याची वृत्ती पिटक्यांच्यापाशी आहे.

एवढे सगळे असल्यामुळेच, या कादंबरीच्या आकृतीविषयी फार मोठ्या अपेक्षा पूर्वार्धात निर्माण होतात, आणि नंतर त्या कोसळतात. फार मोठे सामर्थ्य असलेल्या एका लेखकाची ही एक फसलेली कलाकृती आहे असे मला वाटते, ते यामुळेच. □

'शिदोरी' : व. ह. पिटके : मौज प्रकाशन : पृष्ठे १५८ : कि. ८॥ रु.



# रामभाऊ लेले

## एका
## रगेल आयुष्याचा
## शेवट

"He was a man of discipline, devotion towards the game and determination to win the match."

असे उद्गार रामभाऊ लेले यांच्या निधनानंतर एकाने मजजवळ काढले. किती यथार्थ वाक्य होते ते. एका वाक्यातच आमच्या लेले सरांच्या साऱ्या जीवनाचे सार होते.

रामभाऊंचे जीवन म्हणजे मूर्तीमंत चैतन्य होते. खडकाळ डोंगरमाथ्यावरून खळखळणाऱ्या स्वच्छंदी शीतल, निर्मळ झऱ्याप्रमाणे आमचे रामभाऊ होत. आजदेखील रामभाऊ आम्हाला सोडून गेल्यासारखे वाटत नाही. रामभाऊंचे वागणे, बोलणे, चालणे सारे कसे जसेच्या जसे डोळ्यासमोर उभे राहते. त्यांची प्रतिमा आजही डोळ्यासमोर उभी राहते.

उन्हाने तांबूस झालेला थोडक्यात म्हणजे रणरणत्या उन्हाने करपलेला त्यांचा चेहरा, मध्येच चमकणारे निळसर डोळे, रुंद बाहू आणि कमावलेली बळकट शरीरयष्टी, भरदार छाती पुढे काढून मोठ्या दिमाखाने 'झोकात' चालण्याची त्यांची ती पद्धत. कधीही इस्त्री न केलेला आखूड बाह्याचा फॅनेलचा चुरगळलेला शर्ट, पायघोळ काळी पॅंट, लाल रंगाचे पायमोजे आणि पायात पठाणी चप्पल, एका हातात कधीही तेल न घातल्याने कर, कर असा आवाज करीत कुरकूर चालणारी त्यांच्या बरोबरची सायकल, दुसऱ्या बाजूला खांद्यावर 'शबनम' पिशवी अशा थाटात चालताना जगातील इतरांकडे अगदी बेदरकारपणे आणि बेफिकिरीने पाहणारी नजर आणि डोक्याला तेलाचा स्पर्शही न झाल्याने भुरकट रंगाचे त्यांचे

केस वाऱ्याने भुरभुर उडत असत. स्वारी रस्त्याने चालली म्हणजेच इतरांना त्यांच्याबद्दल निष्कारण एक प्रकारची भीति किंवा मनावर दबाव येत असे. आणि त्यामुळे बरेच जण त्यांच्याजवळ जाण्यास थोडेफार कचरत असत हे मला चांगले माहीत आहे. माझी स्वतःची देखील आमच्या रामभाऊंबद्दल अशीच कल्पना होती.

सर्वात प्रथम मी नूतन मराठी शालेय क्रिकेट संघाकडून खेळताना रामभाऊंना पाहिले. न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग आणि आमची शाळा म्हणजे सामन्यात एक प्रकारची जिद्द आणि विलक्षण चुरस असे. वर्षानुवर्षे या दोन शाळातील क्रिकेट सामना एक छोटेसे का होईना पण युद्धच भासे.

या सामन्यात आमची फलंदाजी सुरू असताना मैदानाबाहेर बसून रामभाऊ मोठ्याने ओरडून आपल्या खेळाडूंना सूचना देत होते. त्यावेळी त्यांचे वागणे पाहून रामभाऊ खिळाडू वृत्तीचे नसावेत अशीच माझी समजूत झाली. पण आमच्या सुदैवाने आणि प्रयत्नाने त्या वर्षी आम्ही सामना जिंकला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे रामभाऊ सामना संपताच आमचे अभिनंदन करण्यास आले. तेव्हा मी त्यांना जवळून पाहिले.

पुढे शाळेनंतर महाविद्यालयात गेल्यावर फर्ग्युसन महाविद्यालयाचे क्रिकेट कोच म्हणून रामभाऊ आले. तेव्हापासून त्यांचा माझा परिचय झाला. हळू हळू मी क्रिकेट खेळण्याऐवजी शालेय सामन्यासाठी पंच म्हणून काम करू लागलो. त्यावेळी अनेक वेळा माझ्या शंकांचे योग्य ते उत्तर मला रामभाऊंच्याकडूनच मिळाले. स्वतः रामभाऊ उत्तम दर्जाचे क्रिकेट पंच असल्याने मला त्यांचे अमूल्य मार्गदर्शन अतिशय उपयुक्त ठरले. क्रिकेट सामन्यात अनेक वेळा पंचांना निर्णय देताना मोठी चमत्कारिक परिस्थिती निर्माण होते. बऱ्याच वेळा कोणता निर्णय योग्य आहे हे समजू शकत नाही. अशा वेळी पंचाने किती जागरूक राहून न्याय दिला पाहिजे हे रामभाऊंनी मला समजावून सांगितले.

क्रिकेट खेळणे आणि क्रिकेट पंच म्हणून काम केल्यामुळे अभ्यासाकडे माझे दुर्लक्ष होऊ लागले आणि म्हणून मी या दोन्ही गोष्टींना रामराम ठोकला, तरी देखील माझे मन या खेळाभोवती घिरट्या घेत होतेच. हे जेव्हा मी रामभाऊंशी बोललो तेव्हा त्यांना माझा निर्णय पटला नाही.

योगायोगाने पुढे मला दै. तरुण भारतमध्ये क्रीडा वार्ताहर म्हणून नोकरी मिळाली. महाविद्यालयात असतानाच मी क्रीडा-प्रतिनिधी म्हणून काम करू लागलो. हे रामभाऊंना मी सांगितल्यावर त्यांना फारच आनंद झाला. 'तुला कोणतीही माहिती लागल्यास तू माझ्याकडे कधीही ये' हे सांगण्यास रामभाऊ विसरले नाहीत.

क्रीडा वार्ताहर म्हणून काम करताना मला अनेक वेळा रामभाऊंनी मार्गदर्शन केले आहे. त्यानंतर मी क्रिकेटवर पुस्तक लिहिण्याचा माझा विचार असल्याचे

रामभाऊंना खरोखरच अत्यानंद झाला. हे माझ्या नजरेतून सुटले नाही. "अधिक वेळ न दवडता चटकन कामाला लाग आणि हे बघ मी आहे ब्रह्मचारी, माझ्या घरी बायको आणि पोरं नाहीत. तेव्हा अगदी मध्यरात्री जरी तुला काही माहिती हवी असल्यास माझ्या दारावर थाप टाकण्यास विसरू नकोस' असे मला अगदी बजावून सांगितले. वेळोवेळी मी माझ्या पुस्तकाचे कच्चे लिखाण रामभाऊंना नेऊन दाखवीत असे. प्रत्येक वेळा मला त्यांनी अगदी आपलेपणाने आणि आत्मीयतेने माहिती दिली. एकदा तर मला खरोखर रामभाऊंना मध्यरात्री तसदी द्यावी लागली. माझ्या पुस्तकाची छपाई सुरू होती. दुसऱ्या दिवशी काही मजकूर सकाळीच छापला जाणार होता आणि त्यांनी आवश्यक असलेली माहिती राम-भाऊंच्या घरी असलेल्या 'विझडेन'मध्येच नक्की सापडणार हे मला माहीत होते. पण रात्रीचे अकरा वाजून गेले होते. तेव्हा अशा वेळी रामभाऊंना त्रास देणे कितपत योग्य होईल असा विचार मी करीत होतो. शेवटी हो-ना करता करता मी रामभाऊंच्या घरी गेलो. थोड्या संकोचानेच दारावर थाप मारली आणि आतून आवाज आला 'कोण रे?' मी आल्याचे सांगताच रामभाऊंनी दरवाजा उघडला. मी अवेळी येऊन त्रास देत असल्याबद्दल म्हणताच रामभाऊ मला म्हणाले,

"मूर्खा त्रास कसला आला, तू आज क्रिकेटची एक प्रकारची सेवा करतो आहेस. तेव्हा परत असे बोलू नकोस. तुला जे काही हवे असेल ते घे आणि कोणतीही घाई करू नकोस. तुझे पुस्तक नक्कीच चांगले होणार आहे." रामभाऊंच्या या परखड बोलण्यात आपलेपणा होता, ओलावा होता, जिव्हाळा होता. खेळाबद्दलची त्यांची निष्ठा आणि विलक्षण प्रेम पाहून अगदी अवाक झालो. मला हवी असलेली माहिती घेऊन मी रामभाऊंच्या घरून निघालो तेव्हा माझ्या डोळ्यात या थोर माणसाने विचारांचे काहूर उठविले होते. घरदार, धन दौलत, बायका, पोरं कशाचाही मोह न करता अविरतपणे क्रिकेट आणि इतर खेळांना सर्वस्वी वाहून घेणाऱ्याला मी तरी महर्षीच म्हणेन.

त्यानंतर रामभाऊ कावीळीने आजारी असल्याचे मला समजले, पण काही तरी कारणाने मी त्यावेळी त्यांना भेटू शकलो नाही. पुढे एकदा ब्रिटिश कौन्सिल वाचनालयात माझी त्यांची गाठ पडली. मी क्षणभर स्तब्ध झालो. रामभाऊंची प्रकृती अगदी खालावली होती. मला अगदी राहवेना म्हणून मी त्यांना बोलताना सहज म्हटले, "सर तुमची तब्बेत फारच खराब झाली आहे. तुम्ही विश्रांती घ्यावयास पाहिजे." माझे वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच रामभाऊंनी मला ठणकावून सांगितले. "अरे, परत असे बोलू नकोस. प्रकृती खराब झाली म्हणून काय झाले परत सुधारेल." "सर माफ करा. तुम्हाला राग येत असेल तर मी परत असे बोलणार नाही" असे म्हणून मी निघालो. प्रकृती इतकी खराब झाली असताना देखील रामभाऊंचा बाणेदार स्पष्टवक्तेपणा पूर्वीसारखाच होता.

त्यानंतर गेली दोन तीन वर्षे ते आपल्या स्वतःशीच आंतर्यामी झगडत राहिले. दिवसे न दिवस त्यांची प्रकृती खालावत चालली होती, पण त्याविषयी बोलण्याचे माझ्यात ध्यैर्य नव्हते.

गेल्या महिन्यांत त्यांना दवाखान्यात मी भेटावयास गेलो. तेव्हा रामभाऊ बोलण्याच्या परिस्थितीत नव्हते. पण तरीदेखील त्यांच्या वागण्यात बोलण्यात काही फरक नाही असे तेथे जवळ असलेल्या त्यांच्या विद्यार्थ्यांकडून मला कळले. त्यांच्या निधनाने क्रिकेटचीच नव्हे तर हॉकी, फूटबॉलसारख्या खेळाची देखील अतोनात हानी झाली आहे. निधनापूर्वीच चार दिवस आधी त्यांचा वाढदिवस होता आणि रामभाऊंची स्थिती फार चांगली नव्हती. अशा वेळी त्यांच्या काही विद्यार्थ्यांनी त्यांच्यावरील निस्सिम प्रेमाचे प्रतीक म्हणून एक गुलाबाचे फूल दिले आणि रामभाऊंना अक्षरशः गहिवरून आले. मोडेल पण वाकणार नाही. या वृत्तीच्या या रगेल राकट वरून कठोर भासणाऱ्या रामभाऊंच्या मनात विद्यार्थ्यांवर, खेळावर, अतोनात प्रेम होते.

रामभाऊंच्या जुन्यापिढीतील त्यांच्या एका वर्ग मित्राला म्हणजे अडव्होकेट वसंतराव नाईक यांना भेटावयास गेलो. तेव्हा ते म्हणाले, " आमच्या रामसारखा स्वाभिमानी करारी, निष्ठावंत माणूस सापडणे कठीण आहे. मी त्यांच्या वर्गात अगदी पहिल्या इयत्तेपासून होतो. आम्ही दोघेही क्रिकेटवेडे होते. आमचा राम फलदांजी करताना अतिशय आकर्षक फटके मारत असे आणि गोलंदाजी करताना त्याचा लेगब्रेक चेंडू फलंदाजाला केव्हाच बनवत असे. इतकेच नव्हेतर मी त्यावेळी यष्टीरक्षण करीत होतो. कधी त्याचा लेगब्रेक मला देखील चकवत असे. आमचा राम खेळात कधी कमी पडला नाही. पण त्याच्या स्वाभिमानी स्वभावामुळे त्याला इतरासमोर झुकता कधीच आले नाही. म्हणून तो मागे राहिला. खेळाइतकीच रामला इतिहासाची फार आवड. डोंगरमाथ्यावर फिरणे, किल्ले आणि गड पायी हिंडून पाहण्याचा त्यास ध्यास. श्रीशिवाजी महाराज, लो. टिकळ आणि सावरकरही आमच्या रामची आद्य दैवते होती. म्हणून आम्ही मित्रमंडळी त्याला ' इतिहास पुरुष ' असे म्हणत असू. पण आमच्या रामसारखा निःस्पृह, निस्वार्थी माणसाच्या गुणाची व्हावी इतकी कदर झाली नाही. याचेच दुःख होते. "

रामभाऊंबद्दल बोलताना श्री. वसंतराव नाईकांच्या आवाजाची आर्द्रता मला जाणवत होती.

काही क्रिकेटमधील पदाधिकाऱ्यांकडून रामभाऊंवर अन्याय झाल्याचे माझ्या कानावर आले. तरीदेखील रामभाऊंच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्यावर अखंड, अविरत प्रेम केले म्हणूनच कदाचित् या आयुष्यभर अविवाहित राहिलेल्या माणसाला त्याच्या विद्यार्थ्यांकडून पुत्रप्रेम सतत मिळत राहिले आणि यातच खरे रामभाऊंच्या जीवनाचे सारे यश दडले आहे.

— प्रताप पटवर्धन

पृष्ठ ७ वरून

सुमारे १५ दिवसांपूर्वीच्या वार्तापत्रात म्हटल्याप्रमाणे एकप्रकारे त्यांनी आपल्या प्रत्येक कृतीतून कैरोतल्या मॉस्को वर्चस्वाला धक्के द्यायला सुरुवात केली. सत्तेवरून हुसकून लावले गेलेले बहुतेक सर्वच, साब्री गटातले होते. काही अंशी रशियन धार्जिणे होते. त्यानंतर, रशियन तंत्रज्ञांना ईजिप्त सोडून जायला सांगून, त्यांनी स्वतंत्र पवित्र्याचं मनोगतच व्यक्तविलं. तेल अविवबरोबर, काही अटींवर जमवून घ्यायची तयारी, अरब सोशॅलिस्ट युनियनच्या उच्च समितीच्या जागांसाठी खुल्या निवडणुकांचं आश्वासन, ईजिप्त–सिरिया–लिबिया ह्यांच्या अरब फेडरेशनच्या दिशनं टाकलेली पावलं–ह्या साऱ्यातनं ईजिप्तच्या बदलत्या राजकीय पवित्र्यांची चाहूल ऐकू येऊ लागली होती नि त्या अनुषंगांनी, ईजिप्तपासून रशियानं धडा घ्यावा असंही टीकाकार म्हणू लागले होते !

हे सारं अर्थातच रशियाच्या नजरेतून सुटलं नव्हतं. क. नासेरच्या उदयानंतर, प्रारंभीचं वितुष्ट येऊनही रशियानं ईजिप्तशी जुळवून घेतलं. क. नासेरनी आपल्या देशात कम्युनिस्ट पक्षावर बंदी घातली पण कम्युनिस्ट रशियाबरोबर मात्र जुळवून घेतलं. किंबहुना अमेरिकी धोरणांमुळे, इस्रायल बरोबरच्या संघर्षामुळे कम्युनिस्ट द्वेष्ट्या नासेरचा ईजिप्त रशियन वर्तुळात ढकलला गेला ! मध्य पूर्वेतलं ईजिप्तचं विशिष्ट स्थान, अरब जगावर नासेरनी घातलेली मोहिनी इत्यादिमुळे रशियानंही ह्या बिगर कम्युनिस्ट राष्ट्राशी ज्यास्तीत जास्त मैत्री संपादण्याचा प्रयत्न केला. कोटयावधी रुबल्स ईजिप्तमध्ये ओतले. हजारो रशियन तंत्रज्ञ, वैमानिक, लष्करी तज्ज्ञ ईजिप्तमध्ये राबवले. ह्या साऱ्याचं फळ साहजिकच रशियाला हवं होतं. हवं आहे ! मध्य पूर्वेवर निर्विवाद वर्चस्व रशियाला हवं आहे. वाढता व्यापार हवा आहे. सुएझ मार्गे भू-मध्य-हिंदी-महासागरात मुक्तद्वार हवं आहे ! आणि नेमक्या ह्याच वेळी ईजिप्तमधल्या उलथा पालथींना सुरुवात झाली होती. रशिया अशा वेळी स्वस्थ बसता तरच नवल !

रशियन अध्यक्ष पॉडगॉर्नी ह्यांनी नुकतीच ईजिप्तला भेट दिली. ह्या अनपेक्षित, बिनसरकारी (unofficial) तातडीच्या भेटी मागची पार्श्वभूमि वरीलप्रमाणे आहे. भेटीची योजना विचारपूर्वक आखली गेली होती. पवित्रे मोजून मापून टाकले होते. ईजिप्तमध्ये शासनात, सैन्यात, शासकीय पक्षात जोपर्यंत रशिया धार्जिणी मंडळी होती तोपर्यंत ईजिप्तला कुठल्याही बंधनात अडकवून ठेवायची आवश्यकता रशियाला भासली नाही. परंतु ही मंडळी तूर्त तरी पडद्याआड गेली आहेत. अशा वेळी पेरलेला रुबल वाया जाणं रशियाला तरी मानवण्यासारखं नव्हतं. त्याच दृष्टिकोनातून, संपूर्ण आराखडे तयार ठेवूनच पॉडगॉर्नी कैरोला पोचले. दोन्ही देशांच्या मैत्रीचं

गुणगान झालं. अमेरिका–इस्रायलची निर्भत्सना झाली नि त्याच वेळी रशियाबरोबरचा लष्करी करार ईजिप्तच्या गळयात बांधला गेला ! बिगर कम्युनिस्ट राष्ट्राबरोबरचा रशियाचा हा पहिलाच लष्करी करार ! त्यानं स्वतंत्र झेप घेऊ पाहणाऱ्या अन्वर सादत ह्यांचे पंख तूर्त तरी कापून टाकले आहेत. ईजिप्तच्या संरक्षणाला अर्थातच आता रशियानं स्वतःला बांधून घेतलं आहे. त्याची माणसं साहजिकच अधिक जबाबदारीनं कैरोत वावरणार. त्याचे काय परिणाम मध्य पूर्वेतल्या जळत्या ईजिप्त-इस्रायली प्रश्नावर घडणार हे जास्त विषद करून सांगायला नकोच !

नासेर ह्यांच्या मृत्यूला अद्याप तसा फारसा काळ लोटलेला नाही. ते व्यक्तिमत्त्व अद्याप ईजिप्शियन जनतेसमोर ताजं. प्रे. सादत आणि नासेर ह्यांची तुलना त्यामुळेच वेळोवेळी ओघानंच होणार. त्यातच प्रे. सादत ह्यांना अद्याप अंतर्गत शत्रूंचा समाचार पूर्णपणे घ्यायचा आहे. इस्रायलची टांगती तलवार सतत मानेवर आहे. अमेरिकेचा ओढा ईस्रायलकडे आहे. ह्या पार्श्वभूमिवर रशियन दबावापुढे मान तुकवण्याशिवाय प्रे. अन्वर सादत ह्यांना गत्यंतर उरलं नसावं ! ईजिप्तमधल्या नि म्हणूनच पर्यायाने मध्य पूर्वेतल्या रशियन वर्चस्वाला त्यामुळे तूर्त तरी जीवदान मिळालं आहे. प्रे. सादत अंतर्गत अस्थिरतेवर कशी मात करतात आणि रशिया ईजिप्तच्या अंतर्गत राजकारणापासून कितपत अलिप्त राहतो त्यावर पुढचे रूसो–ईजिप्शियन संबंध अवलंबून राहतील ! तूर्त तरी मैत्रीचा देखावा उभा करून, ईजिप्तला लष्करी करारात अडकवून प्रे. पॉडगॉर्नी रशियाला परतले आहेत ! जाता जाता त्यांनी कैरोत सूचक उद्‌गारही काढले आहेत. ते म्हणतात–'कम्युनिस्ट राष्ट्रांच्या मदतीशिवाय, भांडवलशाही राष्ट्रांच्या पिळवणुकीविरुद्ध झगडून आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य मिळवणंच मुळी विकसनशील राष्ट्रांना अशक्य होऊन बसलं आहे.'

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचें हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. M-H 649



“...रेल्वे भाड्यात ५ पैसे ते ५० पैसे वाढ ! ...हं ! ...मला तरी यात मोडीची टंचाई दूर करण्याची सरकारची केविलवाणी धडपड दिसते...”